**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**म.वि.प.नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसीजर आहे. आज मुंबईमध्ये महाराष्ट्रातील सर्व धनगर समाज रस्त्यावर उतरला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती मिळाव्यात यासाठी राज्यात आंदोलने केली जात आहेत. विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पक्षाचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष आणि विद्यमान मुख्यमंत्री सन्माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी बारामतीमध्ये धनगर समाजाचे आंदोलन सुरु असताना धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबतचा शब्द दिला होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी धनगर समाजाला एक महिन्याच्या आत अनुसूचित जमातीच्या सवलती लागू करण्याबाबत शब्द दिला होता. त्यावेळी आंदोलनकर्त्यांचे उपोषण सोडवित असताना, त्यांना पाणी पाजतांनाची सी.डी.माझ्याकडे आहे. महोदय, धनगर समाजाला आरक्षण मिळावे म्हणून आम्ही नियम 289 अन्वये सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला सारुन, या विषयावर चर्चा घ्यावी, अशी मी विनंती करतो.

महोदय, आज सबंध धनगर समाज मुंबईच्या रस्त्यावर उतरला आहे. हे आंदोलनकर्ते कोणत्या एका पक्षाचे वा विचाराचे नाहीत. या सरकारच्या माध्यमातून त्या समाजाला जो शब्द देण्यात आला होता तो या सरकारने पूर्ण करावा. महोदय, या सरकारने धनगर समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात एकदा नव्हे तर दोनदा शब्द दिला होता. महोदय, दिनांक 4 जानेवारी, 2015 रोजी नागपूर येथे धनगर समाजाच्या मेळाव्यात माननीय मुख्यमंत्र्यांनी शब्द दिला होता की, 15 दिवसांच्या आत धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती लागू करण्यात येतील. आज 23 मार्च आहे. धनगर समाजाच्या मतांवर राज्यात सत्तांतर झाले. राज्यात धनगर समाजाच्या मतांमुळे परिवर्तन झाले आणि आज मात्र त्याच धनगर समाजाला वाऱ्यावर सोडून दिले गेले. माझी विनंती आहे की, सबंध धनगर समाजाच्या भावना सभागृहाने लक्षात घेतल्या पाहिजे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय,...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे, आपला धनगर समाजाला आरक्षण देण्याला विरोध आहे काय ?

..2..



**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना सांगतो की, हा विषय 289 चा कसा होतो, हे सांगण्यासाठी मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना परवानगी दिली आहे. त्यामुळे आपण कृपया खाली बसावे. आपण त्यांना विनाकारण त्रास देऊ नका.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या सभागृहाच्या माध्यमातून समजले पाहिजे की,...

(सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना सांगू इच्छितो की, हा विषय 289 चा कसा होतो हे माननीय विरोधी पक्ष नेते डेव्हलप करीत आहेत. त्यामुळे आपण कृपया खाली बसावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या सभागृहाच्या माध्यमातून मी निदर्शनास आणून देतो की, गेल्या हिवाळी अधिवेशनात सन्माननीय सदस्य श्री.रामहरी रुपनवर यांनी धनगर समाजाला आरक्षण देण्यासंदर्भातील लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता की, धनगर समाजाला किती दिवसात अनुसूचित जमातीच्या सवलती लागू करण्यात येणार आहेत ? माझ्याकडे त्यावेळचे कार्यवृत्त आहे. माननीय आदिवासी विकास मंत्री श्री.विष्णु सवरा यांनी....

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवून एखाद्या विषयावर चर्चा घ्यावयाची असल्यास त्या विषयी अगोदर मेरिटवर बोलले पाहिजे. मी जाणून घेऊ इच्छितो की, माननीय विरोधी पक्ष नेते विधानपरिषद नियमावलीतील कोणत्या कलमाचा वा नियमांचा आधर घेऊन हे भाषण करीत आहेत ?

**सभापती** : या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी हरकत घेतली तेव्हा मी सांगितले होते की, सन्माननीय विरोधी पक्ष नेते हा विषय 289 चा कसा होतो हे सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे माननीय विरोधी पक्ष नेत्यांना आपले म्हणणे मांडू द्यावे असा मी त्यावेळी निर्णय दिलेला आहे. त्यामुळे आपण सुध्दा त्यांना बोलू द्यावे. तसेच सन्माननीय सदस्य

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे, आपण खाली बसून बोलू नका. उगाच सभागृहामध्ये चुकीचे पायंडे पाडू नका. तसेच दुसरी बाब अशी की, हा विषय संवदेनशील असल्यामुळे मी सर्व गटनेत्यांना दोन-दोन मिनिटे का होईना बोलण्याची परवानगी देणार आहे. माननीय विरोधी पक्ष नेते आपण आपले म्हणणे मांडावे.

..3..



श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, म.वि.प. नियम 289 अन्वये सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला ठेवून धनगर समाजाला आरक्षण देण्याच्या विषयावर चर्चा घेण्यास अनुमती द्यावी, अशी मी विनंती केलेली आहे. आज धनगर समाजाच्या लाखो लोकांनी विधान भवनावर मोर्चा आयोजित केला आहे. या सरकारने सत्तेत येण्यापूर्वी धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती एका महिन्यात लागू करु असे आश्वासन दिले होते. परंतु हिवाळी अधिवेशनात उपस्थित करण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेला माननीय मंत्र्यांनी काय उत्तर दिले होते ते मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो. या सभागृहामध्ये आदिवासी विकास मंत्री श्री.विष्णु सवरा यांनी सांगितले होते की, धनगर समाजाला अनुसूचित जातीच्या सवलती देणे शक्य नाही. या संदर्भातील सरकारची भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे. एका बाजूला बारामती येथील उपोषण सोडविताना आणि दुसरीकडे नागपूर येथील धनगर समाजाच्या मेळाव्यात दिनांक 4 जानेवारी, 2015 रोजी सबंध धनगर समाजाला आरक्षण देण्यात येईल सांगितले जाते आणि खुर्चीत बसल्यानंतर सबंध धनगर समाजाला विसरुन जाणे योग्य नाही. माझी विनंती आहे की, आम्ही म.वि.प. नियम 289 अन्वये दिलेली सूचना मान्य करुन, सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला ठेवावे व या विषयावर चर्चा घ्यावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझी विनंती एवढीच आहे की, या सभागृहाने पूर्वी निर्णय घेतला होता की, प्रश्नोत्तराचा तास पूर्ण होऊ द्यावा. नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाची सूचना महत्त्वाची असली तरी, प्रश्नोत्तराचा तास सुध्दा तितकाच महत्त्वाचा आहे. त्यामुळे अगोदर प्रश्नोत्तराचा तास पूर्ण होऊ द्यावा. कारण सन्माननीय सदस्य 30-30 दिवस अगोदर प्रश्न देत असतात. प्रश्नोत्तराच्या तासाच्या माध्यमातून जनतेचे बरेच प्रश्न मार्गी लागतात. माझी विनंती एवढीच आहे की, प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना मांडण्यास परवानगी दिली तर सन्माननीय सदस्य आणि जनतेला सुध्दा न्याय मिळेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : मला वाटते या विषयासंदर्भात गट नेत्यांचे विचार ऐकून घेतल्यानंतर निर्णय घेऊ या.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आमच्या पक्षाच्या वतीने सन्माननीय सदस्य ॲड.रामहरी रुपनवार बोलतील.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. रामहरी रूपनवर : सभापती महोदय, सन्मननीय विरोधी पक्षनेते सांगत आहेत की, सर्व कामकाज बाजूला ठेवून या तातडीच्या व निकडीच्या असलेल्या विषयावर चर्चा करण्यात यावी. मी विचारू इच्छितो की, हे राज्य चालले आहे ते जनतेच्या हितासाठी चालले आहे की जनतेला थापा मारून त्यांना दु:खी करण्यासाठी चालले आहे ? राज्यातील एवढ्या मोठ्या 14 टक्के धनगर समाजाला 15 दिवसांत आरक्षण देतो, इतर समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता आरक्षण देतो, 8 दिवसांत आरक्षण देतो असे सांगितले जात आहे. मी म्हणतो की, तुम्ही आरक्षण देऊ नका पण त्यांची फसवणूक तरी का करीत आहात ? शासन अतिशय कुचेष्ठेने बोलत आहे, हीनपणे बोलत आहे. राज्यात त्याबद्दल तीव्र भावना पसरलेल्या आहेत. आज लाखो लोक मोर्चा घेऊन आले आहेत. आपण या लोकांच्या भावनेशी खेळणे योग्य नाही. शासनाने आरक्षण देऊ नये पण त्यांची टिंगल करूनये. सभापती महोदय, राज्यात धनगर समाजाची टिंगल करण्याची परिस्थिती सुरूआहे. शासनो लेखी दिले आहे की, आम्ही 15 दिवसांत आरक्षण देतो. राज्याच्या (अडथळा) सरकार किती गंभीर आहे हे यातून लक्षात येते. (गोंधळ) यावरून सरकार किती गंभीर आहे हे लक्षात येत आहे. शासन माझ्या बोलण्यात अडथळे आणत आहे. एवढ्या निकडीच्या प्रश्नावर अडथळे आणून प्रश्न डायव्हर्ट करीत असतील तर सरकार किती गंभीर आहे हे समजत आहे. राज्याचे विद्यमान माननीय मुख्यमंत्री यांनी बारामतीमध्ये सांगितले होते की, मी हे आरक्षण कोळून प्यालो आहे, हे आरक्षण मला पूर्ण माहीत आहे, 'र' व 'ड' चा फरक मी जाणलेला आहे. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांनी देखील हिवाळी अधिवेशनात सांगितले की, धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश आहे हे सरकारला मान्य आहे. रेकॉर्ड आहे. आम्ही त्यांना आरक्षण देणार आहे. माननीय मुख्यमंत्री बारामतीत म्हटले की, हे शंभर टक्के खरे आहे. आदरणीय गोपीनाथ मुंडे म्हटले होते की, हे खरे आहे. सभापती महोदय, मी 25 वर्षे हेच म्हणत आहे. मग शासनाकडून आरक्षण का देण्यात येत नाही ? 1 महिन्याचा आत समिती नेमून धनगर समाजाला आरक्षण देणार असे त्यानी सांगितले. आपण लोकांना चुकीची आश्वासने का देत आहात ? जे तुम्हाला शक्य नाही ते बोलत आहात. माझी सर्व माननीय मंत्र्यांना हात जोडून विनंती आहे की,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. रामहरी रूपनवर ....

धनगर समाज काय म्हणत आहे ते आपण नीट ऐका. धनगर समाज म्हणत आहे की, आम्हाला घटना तयार होताना घटनेमध्ये आरक्षण दिले आहे. आम्ही नवीन आरक्षण मागत नाही. घटनेने आरक्षण दिले आहे. आपण आमचे आरक्षण घटनेमध्ये आहे की नाही हे फक्त बघायचे आहे, घटनेमध्ये आरक्षण असेल तर असेल आणि नसेल तर नसेल. आम्हाला कोणाच्याही आरक्षणाला धक्का लावायचा नाही. कोणाच्या आरक्षणाला धक्का लावून आम्हाला आरक्षण नको. आम्हाला कोणी देत आहे म्हणून आरक्षण घ्यायचे नाही. घटनेने धनगर समाजाला आरक्षण दिले असेल तर आम्हाला आरक्षण मिळालेच पाहिजे. धनगर समाजाचा हक्क इतकी वर्षे डावलला असेल तर आता तरी आरक्षण नको का ? घटना मानायची की नाही हा प्रश्न आहे. सभापती महोदय, आरक्षण नवीन द्यायचे नाही आणि राज्य सरकार ते देऊही शकत नाही. आमचीही तशी मागणी नाही आणि तुम्हालाही तसे आरक्षण देण्याचा अधिकार नाही. घटनेने धनगर समाजाला आरक्षण दिले आहे. तो समाज राज्यात राहत आहे. राज्य सरकारने केंद्र सरकारला फक्त शिफारस करायची आहे. धनगर समाजाचे आरक्षण इतरांपेक्षा वेगळे आहे. अनुसूचित जमातीमध्ये 26 नंबरला धनगर समाजाचा समावेश आहे. महाराष्ट्र सरकारने जे परिपत्रक काढले त्यातील 36 नंबरलाही धनगर समाजाचा समावेश आहे. जनजाती विभागानेही त्या संदर्भात परिपत्रक काढले आहे. (गोंधळ)

श्री. विनोद तावडे (बसून) : सभापती महोदय, आरक्षण अगोदर का दिले गेले नाही ?

ॲड. रामहरी रूपनवर : सभापती महोदय, सरकारने अशी बोलण्याची पध्दत नाही. आता माननीय मंत्री सत्तेत आहेत. 65 वर्षांपासूनची ही मागणी आहे.

**सभापती** : मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण खाली बसून बोलू नये. आपण मंत्री आहात हे लक्षात घ्यावे.

ॲड. रामहरी रूपनवर : सभापती महोदय, 65 वर्षांपासूनची ही मागणी आहे. शासनाने या संदर्भात त्यांची भूमिका सांगावी. आज आरक्षण मागितले, आरक्षण इतके दिवस का मिळाले नाही, आता का मागता हे बोलणे बरोबर नाही. असे बोलणे कोणत्या लोकशाहीमध्ये बसत आहे ? आपण सत्तेत आहात म्हणून आरक्षण मागत आहे. आपण मंत्री नसता तर तुमच्याकडे आरक्षण कशाला



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. रामहरी रूपनवर ....

मागितले असते ? आमचे सरकारविरूध्द बोलणे आहे. सभागृह सर्वोच्च आहे. सभागृहामध्ये मत मांडणे माझा अधिकार आहे. आम्ही माननीय सभापतींची परवानगी घेऊन मत मांडत आहो. तुम्ही आपली भूमिका मांडावी. तुम्ही लोकांना फसविले आहे.

**सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्यांनी आता खाली बसावे. आपली भावना पोहचली आहे.

श्री. रामराव वडकुते : सभापती महोदय, मला सर्व माननीय मंत्र्यांना विनंती करायची आहे. आम्ही अहिल्यादेवीचे वंशज आहोत, ज्यांनी प्रजेसाठी राज्य चालविले त्या प्रजेची आपण अशी चेष्टा करूनका. पूर्वी कोणी आरक्षण दिले नाही, ते दिले नाही, म्हणून त्यांना त्याचा धडा मिळाला आहे. परंतु, तुम्ही आम्हाला शब्द दिला होता. आपण आम्हाला किती दिवस उल्लू बनविणार आहात ? आपण सोलापूरमध्ये शब्द दिला. पंढरपूरमध्ये मोर्चाच्या वेळी उपोषण सोडताना शब्द दिला. दीड कोटी धनगर समाजाने तुमच्यावर विश्वास ठेवला. आपण त्यावेळी आम्हाला विनंती केली की, आमचे सरकार येऊ द्यावे, आमचे सरकार येण्यासाठी मदत करावी. आम्ही मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत प्रश्न सोडवू अशा प्रकारच्या आपण वल्गना केल्या. आमच्या भोळ्या भाबड्या समाजाने आपल्यावर विश्वास ठेवला. आम्ही वेगवेगळ्या पक्षात असलो तरी लोकांनी आमचे ऐकले नाही. आता 3 लाख लोक तुमच्यासाठी आले आहेत. 30 दिवसांपूर्वी दिलेला प्रश्न महत्वाचा आहे असे म्हणता. मग 65 वर्षांपूर्वीपासून आमच्यावर होत असलेला अन्याय महत्त्वाचा नाही का ? आपल्याकडून न्याय मिळणे गरजेचे आहे. आपण न्याय दिला नाही तर जनतला आपल्याला माहीतच आहे. आपण शब्द दिला आहे. आपण अशाप्रकारे जनतेला फसविणार असाल तर ते योग्य नाही. घटनेने सन 1956 ला घटनेमध्ये धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण दिले आहे. धनगर आणि धनगड एकच आहेत असे असताना आपण असे करीत आहात. आपण सुध्दा मान्य केले आहे. पूर्वी सुध्दा या संदर्भात सांगण्यात आले आहे. माननीय मंत्र्यांनी हिवाळी अधिवेशनात कबूल केले आहे. मी सुध्दा कबूल केले आहे. आपण या संदर्भात कबूल केले असेल तर मग आरक्षण

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रामराव वडकुते ....

द्यावे. आपण आता सत्तेवर आहात. आपण लोकांची भावना समजून घ्यावी. आपण लोकांमुहे सत्तेवर आला आहात. माननीय मुख्यमंत्र्यांनी 4 जानेवारीला नागपूरला कबूल केले आहे की, धनगर समाजामुळे मी मुख्यमंत्री झालो. माननीय मंत्री प्रा. राम शिंदे तेथे होते, त्यांच्यासमोर हे कबूल केले आहे. सन्माननीय सदस्य श्री. महादेव जानकर साहेब देखील होते, त्यांच्या समोर हे कबूल केले आहे. माननीय मुख्यमंत्री म्हणाले होते की, जनतेच्या मतांवर मी मुख्यमंत्री झालो, 10 दिवसांच्या आत एजींचा सल्ला घेतो आणि प्रश्न मिटवतो. मंत्रिमंडळाची पहिली बैठक झाली. 10 दिवस गेले. कोल्हापूरच्या घटनेस 10 महिने होऊन गेले. शासन आहाला किती दिवस न्याय देणार नाही ? धनगर समाज आपल्याला जाब विचारायला आला आहे. इतका महत्वाचा प्रश्न असताना सर्व कामकाज बाजूला ठेवून यावर चर्चा झाली पाहिजे असा समाजाच्या वतीने माझा आग्रह आहे. आपण आज लोकशाहीमध्ये सातत्याने सांगत असतो की, आपण लोकांच्या मतावर राज्य करतो. अहिल्याबाईंनी प्रजेच्या हिताचे निर्णय घेतले. अहिल्याबाईंच्या जमातीची अशी टिंगल-टवाळी करता कामा नये. आमची नम्र विनंती आहे की, आपण असे करू नका. घटनेमध्ये 36 नंबरवर धनगर समाजाला आरक्षण दिले आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्या भावना निश्चितपणे लक्षात घेतल्या जातील.

श्री. महादेव जानकर : सभापती महोदय, राष्ट्रीय समाज पक्षाने धनगर सामाजाच्या आंदोलनाबद्दल भरपूर प्रयत्न केला आहे. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी साहेबांनी देखील हा प्रश्न देश पातळीवर नेण्याचा प्रयत्न केला आहे. 65 वर्षे कोणी दिले नाही, काय दिले नाही या चर्चेत न पडता या समाजाला अनुसूचित जमातीची सवलत मिळाली पाहिजे अशी भूमिका आहे. मागच्या 4 दिवसांपूर्वी माननीय मुख्यमंत्री साहेबांनी मी, माननीय राज्यमंत्री प्रा. राम शिंदे आणि सर्व सचिवांना बोलावून बैठक घेतली होती. सेक्युलर म्हणणाऱ्या सरकारने पॉझिटिव्ह नोट्स 65 वर्षे दिल्या नव्हत्या. (गोंधळ)

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागा सोडून पुढे येण्याचा प्रयत्न करीत असतात.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण जागेवर जाऊन बसावे. सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 01.19 ते 01.39 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)**

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबतच्या मागणीसाठी मोठा मोर्चा मुंबईमध्ये काढण्यात आला आहे. धनगर समाजाला आदिवासींच्या सवलती मिळाल्या पाहिजेत, ही आमची मनापासून इच्छा आहे व तसा प्रयत्न आम्ही केलेला आहे. अन्य काही संघटनांनी सुध्दा या संदर्भात मोर्चा काढलेला आहे. घटनेत तरतूद असताना गेल्या 65 वर्षात या समाजाला आरक्षणाबाबत न्याय मिळालेला नाही. मागील चार दिवसांपूर्वी मुख्यमंत्री महोदय आणि सर्व संबंधित सचिवांबरोबर बैठक झाली असून या संदर्भातील सकारात्मक टिप्पणी प्रोसेस करण्यात आली आहे. आमचे म्हणणे असे आहे की, धनगर समाजाला आरक्षण देत असताना घाईगडबडीतून कोणतीही तांत्रिक त्रुटी राहता कामा नये. त्यामुळे हा निर्णय घेण्यासाठी थोडा वेळ लागला तरी चालेल.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, मला माझे म्हणणे पूर्ण करु द्यावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांनी थोडे थांबावे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांचा हरकतीचा मुद्दा ऐकून घेतल्यानंतर मी तुम्हाला संधी देतो.

(विरोधी व सत्तारुढ पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

मंत्री महोदयांनी कृपया खाली बसावे. हरकतीचा मुद्दा ऐकून घेतल्यानंतर मी पुन्हा सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांना बोलण्याची संधी देणार आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर बोलत असताना असे म्हणाले की, मुख्यमंत्री महोदयांनी सर्व अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली आणि सकारात्मक टिप्पणी सादर करण्याबाबत चर्चा झाली आहे. सन्माननीय सदस्यांच्या याच वक्तव्याला माझी हरकत आहे.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे......

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांशी झालेल्या चर्चेच्या वेळी स्वत: सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर उपस्थित होते, सर्व विभागांचे अधिकारी देखील उपस्थित होते आणि त्यांच्या म्हणण्यानुसार सकारात्मक टिप्पणी सादर होणार आहे.

सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा हा आहे की, धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबतची टिप्पणी आदिवासी विकास विभागाकडून सादर होईल. परंतु, आदिवासी विकास मंत्री महोदयांनी नागपूरच्या अधिवेशनात आणि सध्या सुरु असलेल्या अधिवेशनात ठामपणे अशी भूमिका मांडली आहे की, धनगर समाजाला आदिवासी समाजाच्या सवलती देण्यात येणार नाहीत. आदिवासी विकास मंत्री महोदयांची अशी स्पष्ट भूमिका आहे की, धनगर समाजाला आरक्षण देण्यात येणार नाही. असे असेल तर मग सकारात्मक टिप्पणी कशी सादर होईल, असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, सभागृहाची दिशाभूल होता कामा नये. आदिवासी विकास मंत्री महोदयांनी एकदा नव्हे तर किमान चार वेळा सभागृहात आणि सभागृहाबाहेरही आदिवासी समाजाच्या सवलती धनगर समाजाला देण्यात येणार नाहीत, अशी स्पष्ट भूमिका ठामपणे मांडली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी सभागृहाची कृपया दिशाभूल करु नये, एवढीच माझी विनंती आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, सध्याच्या आदिवासी विकास मंत्री महोदयांनी मांडलेल्या भूमिकेप्रमाणेच तत्कालीन आदिवासी विकास मंत्री श्री.मधुकरराव पिचड साहेबांनीही भूमिका मांडली होती. आदिवासी समाजाचे आरक्षण कमी होऊ द्यायचे नाही, अशी भूमिका आदिवासी समाजाच्या नेतृत्त्वांनी घेतली म्हणजे ती सर्वांची भूमिका आहे, असे होत नाही. या प्रश्नावर राजकारण न करता विरोधी पक्ष म्हणून आपली भूमिका सभागृहात मांडली असती तर सत्तारुढ पक्ष म्हणून आम्ही आपल्या भूमिकेचे स्वागत केले असते. धनगर समाजावर अन्याय होऊ नये, अशीच सत्तारुढ पक्षाची भूमिका आहे आणि मुख्यमंत्री महोदयांनी याबाबतचे सुतोवाच केले आहे. परंतु, तुम्हीच हे मान्य

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार.......

करीत आहात आणि त्या पध्दतीने सन्माननीय सदस्य श्री.रामराव वडकुते हे असे म्हणाले की, एवढ्या वर्षांपासून सरकारने आम्हाला उल्लू बनविले. स्वाभिमानी असाल तर आज राजीनामा द्या आणि इकडे या. तुम्ही हे मान्य करीत आहात की, गेल्या 62 वर्षांपासून सत्तारुढ पक्षाने उल्लू बनविले आहे. तसे पाहिले तर 'उल्लू' हा शब्द संसदीय नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडेजी आपण आता तिकडे असला तरीही त्या पक्षाचे विचार चांगले आहेत म्हणून नाही तर या पक्षाशी तुमचे पटले नाही म्हणून तिकडे आहात.

**तालिका सभापती :** मंत्री महोदयांनी कृपया विषयांतर करु नये. सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी हरकत घेतली. त्यानंतर मंत्री महोदयांनी हरकत घेतली. हरकतीच्या मुद्यावर पुन्हा हरकत घेणे कोणत्या नियमामध्ये बसते, हे आम्हाला समजलेले नाही.

**तालिका सभापती :** मी त्यांना परवानगी दिलेली नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आपण त्यांना परवानगी दिलेली नाही, हे मी मान्य करतो. मंत्री महोदयांना सभागृहात कधीही वक्तव्य करता येते, हा त्यांचा अधिकार आहे. त्याबद्दल आमचे दुमत नाही. परंतु, सन्माननीय मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी बोलण्यास सुरुवात करण्यापूर्वी "माझा हरकतीचा मुद्दा आहे," असे म्हणून पुढील भाष्य केले आहे. या सभागृहात चुकीचा पायंडा पडू नये, हे ज्येष्ठ सभागृह आहे. म्हणून माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर हा आहे की, सभागृहाचे कामकाज नियमांच्या चौकटीत व्हावे. त्याप्रमाणेच सन्माननीय सदस्यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित करावा, त्याला उत्तर मिळावे आणि कामकाज चालावे.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, धनगर समाजाला आदिवासींच्या सवलती मिळाल्या पाहिजेत, ही भूमिका घेऊन आम्ही सन 1997 मध्ये लोकसभेवर मोर्चा काढला होता. मी आपल्याला

...4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर.......

एवढेच सांगू इच्छितो की, "जिस बाप का बेटा लायक होता है, उस बाप की इज्जत होती है." आम्हाला या विषयाच्या बाबतीत राजकारण करावयाचे नाही. राज्याचे मुख्यमंत्री आणि माननीय ग्राम विकास मंत्री श्रीमती पंकजा पालवे-मुंडे त्या ठिकाणी आल्या, आम्ही उपोषण सोडण्याची विनंती करण्यासाठी तेथे गेलो होतो. उपोषण करणाऱ्या काही लोकांचा जीव चालला होता. त्या लोकांनी विनंती केल्यानंतर राज्याचे एक माजी मुख्यमंत्री महोदय त्या ठिकाणी आले.

**तालिका सभापती :** हा विषय स्थगन प्रस्तावाचा कसा होत नाही, या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडावे. विरोधी पक्षाने हा विषय स्थगन प्रस्तावाचा कसा होतो, हे मांडले आहे. आपण तो कसा होत नाही, हेच मांडावे. मेरिटवर चर्चा करण्याची ही वेळ नाही.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, वास्तविक पाहता 'धनगड' आणि 'धनगर' हे एकच आहेत. तत्कालीन पंतप्रधान सन्माननीय श्री.अटल बिहारी बाजपेयी यांच्या कार्यकाळात स्वल्पविरामाबाबत विधेयक मंजूर झाले आहे. Dhangad is equal to Dhangar. धनगड समाजाला आदिवासींच्या सवलती मिळतात आणि धनगर समाजाला मिळत नाहीत. हा स्पेलिंग मिस्टेकचा घोळ आहे.

**तालिका सभापती :** मी पुन्हा सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी हा विषय स्थगन प्रस्तावाचा कसा होत नाही, एवढ्या पुरतेच बोलावे.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, मी तेच सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

आम्हाला चांगले कळते. यांना फक्त घोळ घालावयाचा आहे. धनगर समाजाबद्दल आम्हाला आस्था आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभापती :** सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.50 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------------

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)**

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवरुन पुढे येऊन एकत्रित घोषणा देतात)

**तालिका सभापती :** कृपया सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, नियम 289 मध्ये या प्रस्तावाची सूचना कशी बसत नाही हे सांगण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर उभे आहेत काय ? याबाबत मी हरकत घेतली होती. धनगर आरक्षणाबाबत सर्व कामकाज बाजूला सारुन सभागृहात चर्चा व्हावी यासाठी विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी नियम 289 च्या प्रस्तावाची सूचना सभागृहात मांडली आहे. सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांना धनगर आरक्षण नको आहे काय ? या विषयावर त्यांना चर्चा नको काय ? सत्तारुढ पक्षातील सन्माननीय सदस्यांना नियम 289 च्या प्रस्तावाच्या सूचनेवर बोलण्यासाठी भाग घेता येत नाही. सरकारच्या वतीने निवेदन करता येऊ शकते. सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना या चर्चेत भाग घेता येत नाही. या प्रस्तावाची सूचना नियम 289 मध्ये बसत नाही हे सांगण्यासाठी सन्माननीय सदस्य उभे होते काय ? सन्माननीय सदस्य असे सांगत आहेत की, यातून आता मार्ग निघतो आहे, त्यामुळे मी या ठिकाणी दोन मुद्दे मांडले आहेत. नियम 289 च्या प्रस्तावाच्या सूचनेवर सत्तारुढ पक्षातील सन्माननीय सदस्यांना बोलता येत नाही. नियम 289 च्या प्रस्तावाच्या सूचनेनुसार प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन या विषयावर चर्चा व्हावी असे विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले आहे. सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांच्या वक्तव्यानुसार ते सरकारचे समर्थन करीत आहेत. नियम 289 च्या प्रस्तावाच्याउ सूचनेबाबत त्यांची काय भूमिका आहे ती त्यांनी स्पष्ट केली पाहिजे. एक तर सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावाच्या सूचनेवर बोलता येणार नाही, त्यांना बोलायचे असेल तर नियम 289 कसा होतो हे त्यांनी सांगितले पाहिजे असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी नियम 289 वाचून पहावा. या नियमात असे नमूद केले आहे की, विरोधी पक्षाचे सदस्य जो प्रस्ताव देतात त्यामुळे सभागृहा समोरील इतर सर्व कामकाज बाजूला सारुन तो चर्चेला घ्यावा किंवा नाही असे त्यामध्ये आहे. या विषयावर सभागृहातील कोणत्याही सन्माननीय सदस्यांना बोलता येईल. नियम 289

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार....

वापरण्याचा अधिकार विरोधी पक्षाचा आहे. हा नियम अतिशय तातडीच्या विषयावर वापरता येतो. कौल आणि शकधर पुस्तकात लोकशाही परंपरेनुसार नियम 289 केव्हा वापरावा, याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. विरोधी पक्ष नेत्यांना महाराष्ट्र विधानपरिषद नियमानुसार जे अधिकार देण्यात आले आहेत, त्यानुसार या विषयावर केंव्हाही चर्चा करता येईल, त्या चर्चेला उत्तर देण्याचा सरकारचा मानस आहे. आज अर्थसंकल्पावर चर्चा आहे. तारांकित प्रश्न अत्यंत महत्वाचे होते त्याची वेळ निघून गेली आहे. धनगर समाजाच्या आरक्षणाचा विषय अतिशय महत्वाचा आहे. इतर आयुधाच्या माध्यमातून यावर चर्चा करण्यास सरकारची तयारी आहे. प्रश्न असा आहे की, नियम 289 वर या विषयाची चर्चा करण्याची आवश्यकता नाही. धनगर समाजाच्या पाठीशी सत्ताधारी पक्ष आहे. धनगर समाजाचे प्रश्न सुटावेत अशी सरकारची अंत:करणापासून भूमिका आहे. 63 वर्षे धनगर समाजाचा विश्वासघात ज्यांनी केला त्यांना यावर बोलण्याचा अधिकार नाही. आपले हे अश्रू खरे नाहीत. 63 वर्षे या समाजाचा आपण विश्वासघात केला आहे. आज तुम्हाला धरगर समाजाच्या दु:खाबाबत चर्चा करण्याचा अधिकार नाही. धनगर समाज तुमच्या पाठिशी उभा राहिला होता.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रित घोषणा देतात)

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी कृपया आपले म्हणणे थांबवावे. सन्माननीय सदस्यांनी कृपया जागेवर बसावे.

अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज करणे मला शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक 2 वाजून 05 मिनिटांनी 10 मिनिटांसाठी स्थगित झाली)

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक मी पुन्हा 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.15 ते 2.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

यानंतर श्री.भोगले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, धनगर समाजाच्या आरक्षणाबद्दल जे जे मोर्चे काढले गेले त्यावेळी सांगण्यात आले की, माननीय मुख्यमंत्र्यांनी बारामतीला धनगर समाजाचे उपोषण सोडण्यासाठी असे करण्याचा प्रयत्न करु असा शब्द दिला. मी एवढेच सांगू इच्छितो की, आदरणीय मुख्यमंत्री तेथे गेले होते, परंतु आपल्या पक्षाचे सरकार असताना एकही मंत्री महोदय तेथे उपोषणकर्त्यांची भेट घेण्यासाठी गेले नाहीत, ही त्या समाजाची क्रूर चेष्टा आहे. या समाजाचा प्रश्न सुटावा म्हणून राष्ट्रीय समाज पक्षाने भारतीय जनता पक्षाशी युती केली आहे. आमच्या राष्ट्रीय समाज पक्षाचे श्री.राहुल कूल हे विधानसभेचे सदस्य म्हणून निवडून आलेले आहेत, हे विसरता कामा नये. या सरकारवर आमचा विश्वास आहे. हे सरकार धनगर समाजाला 100 टक्के आरक्षण देणार आहे. त्यांची नियत साफ नव्हती म्हणून 65 वर्षे धनगर समाजाला उल्लू बनविण्याचे काम आघाडी सरकारने केले. युतीचे सरकार धनगर समाजाला निश्चितपणे आरक्षण देणार आहे. धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती मिळणार आहेत. त्यासाठी आम्ही कटिबध्द आहोत. ज्या दिवशी माझ्यासारख्या कार्यकर्त्याला वाटेल की, हे सरकार आरक्षण देणार नाही त्या दिवसापासून मी देखील विरोधी पक्षात बसायला तयार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, घटनेप्रमाणे धनगर समाजाला आरक्षण देता येत नाही. मराठा आणि जाट समाजाच्या आरक्षणाचे काय झाले हे आपण अनुभवले आहे. धनगर समाजाला फसवविण्याचे काम सुरु आहे. धनगर समाजाला बिहार, राजस्थान राज्याने आरक्षण दिले आहे. राज्य शासनाने धनगर शब्दाचा उल्लेख "धनगड़" असा केला तर आरक्षण देण्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही. धनगड़ असा उल्लेख सरकारकडून झाला पाहिजे. या प्रश्नाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा घेण्यात यावी, मी त्या चर्चेच्या वेळी विस्तृत भूमिका मांडण्यास तयार आहे. त्यामुळे आजचे सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला सारुन धनगर समाजाच्या आरक्षणाविषयी चर्चा घेण्यात यावी आणि त्या समाजाला न्याय द्यावा अशी माझी मागणी आहे.

**सभापती** : आता माननीय मुख्यमंत्री आपली भूमिका मांडतील त्यानंतर मी निर्णय देणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती मिळाल्या पाहिजेत याबद्दल निर्णय झाला पाहिजे, याकरिता या सभागृहात चर्चा उपस्थित करण्याची मागणी विरोधी पक्षातर्फे करण्यात आली. मी प्रथम स्पष्ट करु इच्छितो की, हे सरकार पहिल्या दिवसापासून धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती देण्याकरिता अनुकूल आहे. हे मी बारामतीला स्पष्ट केले आणि या सभागृहात देखील स्पष्ट करतो. आदिवासी समाजाच्या कुठल्याही सवलती कमी न करता, त्यांच्या सवलतींवर कोणतेही आक्रमण, अतिक्रमण न करता धनगर समाजाला आरक्षण देण्याची आमची भूमिका आहे...........

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या विषयावर चर्चा करावयाची आहे की नाही एवढेच माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर करावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना सांगू इच्छितो की, या विषयाच्या मेरिटवर अनेक माननीय सदस्यांनी भाष्य केले असताना एखादे वाक्य मुख्यमंत्री या नात्याने मला बोलू द्यावे. सभागृहाने काही सवलत मला देखील द्यावी.

सभापती महोदय, राज्य सरकारची या विषयावर चर्चा करण्याची निश्चितपणे तयारी आहे. त्यामध्ये कोणतीही अडचण नाही. मुळात आमचे सरकार सत्तारुढ झाल्यानंतर तातडीने ॲडव्होकेट जनरल यांच्याशी आम्ही बैठक घेऊन चर्चा केली. त्या बैठकीला धनगर समाजाचे अनेक आमदार उपस्थित होते. मराठा समाजाच्या आरक्षणावर स्थगिती आली, जाट समाजाचे आरक्षण सुप्रीम कोर्टाने रद्दबातल ठरविले......(अडथळा).....धनगर समाजाचे आरक्षण तुम्हाला नको असेल तर तसे सांगा. सभापती महोदय, यांना कदाचित नको असेल, परंतु आम्हाला धनगर समाजाचे आरक्षण हवे आहे. ॲडव्होकेट जनरल यांच्याशी चर्चा झाली आहे. मी पुन्हा मेरिट सांगावयास गेलो तर विरोधी पक्षाकडून सांगण्यात येईल की, मेरिटवर बोलू नका. राज्य सरकारची पूर्ण तयारी आहे.

खरे म्हणजे आम्हाला आनंद वाटतो, 15 वर्षे तुम्ही सत्तेत राहिलात तेव्हा तुम्हाला धनगर समाजाची आठवण झाली नाही. धनगर समाजाची आज आठवण आली? ठीक आहे. 15 वर्षांनी का होईना, तुम्हाला त्या समाजाची आठवण होत आहे. माझ्यामध्ये हिंमत होती म्हणून मी गेलो. तुम्ही सत्तेत असताना उपोषण चालू होते तेथे भेट दिली नाही. आता तुम्हाला त्यांचा पुळका आला आहे. तुम्ही त्याची काळजी करु नका. हा तुमचा आमचा प्रश्न नाही. तुम्ही या प्रश्नावर पक्षीय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

23-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) F.3

SGB/ AKN/ MMP/ 14:30

श्री.देवेंद्र फडणवीस....

राजकारण खेळू नका. हा समाजाचा प्रश्न आहे. राज्य सरकारची चर्चा करण्याची तयारी आहे. सभापती महोदय, आपण याचा निर्णय घ्यावा. मात्र एक गोष्ट या निमित्ताने सांगू इच्छितो की, आज अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा होणार आहे. ज्या दिवशी अर्थसंकल्पावर चर्चा घेतली जाते त्या दिवशी इतर कोणत्याही विषयावर चर्चा घेण्याचे मान्य होत नाही. विरोधी पक्षाला जर धनगर समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा मांडायचा असेल तर जनरल बजेटच्या चर्चेमध्ये तो मांडता येईल आणि राज्य सरकारला त्याचे उत्तर द्यावे लागेल.

नंतर जी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस .....

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात संपूर्ण चर्चा करण्याची राज्य शासनाची तयारी आहे. याविषयाच्या संदर्भात आपण निर्णय घ्यावा परंतु यासंदर्भात मी एवढे सांगू इच्छितो की, सभागृहात आज बजेटवर चर्चा आहे. बजेटच्या दिवशी दुसऱ्या कोणत्याही विषयावर चर्चा केली जात नाही असा संकेत आहे. सभागृहात आज जनरल बजेटची चर्चा आहे. यांना जर धनगर समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा मांडावयाचा असेल तर सन्माननीय सदस्यांना जनरल बजेटमध्ये धनगर समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा मांडता येऊ शकतो व त्यावर राज्य सरकार उत्तर देऊ शकते.

सभापती महोदय, धनगर समाजाच्या आरक्षणाची चर्चा कधी घ्यावयाची याबाबतचा निर्णय माननीय सभापती महोदय आपण घ्यावा. आमचे मत असे आहे की, आज सभागृहासमोर बजेटवर चर्चा असल्या कारणाने बजेटवर तातडीने चर्चा सुरु करावी अशी माझी आपल्याला विनंती आहे. धनगर समाजाच्या आरक्षणाच्या संदर्भात सभागृहातील सर्व गट नेत्यांशी चर्चा करुन धनगर आरक्षणाची चर्चा कधी ठेवायची याबाबत आपण निर्णय घ्यावा अशीही विनंती मी या निमित्ताने करतो.

**सभापती :** मी आता या विषयाच्या निर्णयाप्रत आलेलो आहे. आज सकाळपासून, दोन्ही बाजूने कदाचित नियमाला अपवाद करुन, परंपरेला अपवार करुन या ठिकाणी चर्चा घडवून आणली आहे. धनगर समाजाच्या आरक्षणाच्या विषयाचे महत्व आणि एकंदरीत यासंदर्भातील सेन्सेटीव्हनेसचा विचार करुन हे सर्व घडलेले आहे. धरनगर आरक्षणाच्या विषयाएवढाच महत्वाचा विषय बजेटचा आहे. बजेटवर चर्चा झालीच पाहिजे. हे वरिष्ठ सभागृह आहे. त्यामुळे यासंदर्भात माझा निर्णय असा आहे की, आता आपण सभागृहापुढील कामकाजास सुरुवात करु या. याच आठवडयात धनगर आरक्षणाच्या संदर्भात गटनेत्यांच्या बैठकीत चर्चेची वेळ निश्चित करुन सखोल चर्चा केली जाईल. आता सभागृहापुढील कामकाजास सरुवात करण्यात याावी.

श्री. धनंजय मुंडे : धनगर आरक्षणाच्या संदर्भात आपण निर्णय घेतलेला आहे त्याबद्दल आम्हाला काही बोलावयाचे नाही. परंतु आमचा आग्रह हाच आहे की, आम्ही नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिला होता त्याबाबतीत आपण निर्णय दिलेला आहे. आज धनगर समाज मुंबईच्या रस्त्यावर उतरला आहे.

....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे......

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात.)

या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी 15 वर्षाचा उल्लेख केलेला आहे. यासंदर्भात आमचे एवढेच म्हणणे आहे की, एक महिन्याच्या आत आम्ही धरनगर समाजाला आरक्षण देऊ अशी घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी बारामती येथे केली होती त्या घोषणेचे काय झाले ? हाच प्रश्न राज्यातील धनगर समाज विचारीत आहे. त्यामुळे धनगर समाजाला.....

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात.)

**सभापती :** या विषयाच्या संदर्भात मी निर्णय दिलेला आहे. आता सभागृहापुढील कामकाजास सुरुवात करण्यात यावी.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बर्हिगमन करतात.)

----

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.रामदास कदम (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये पर्यावरण विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेत्तर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला.

---------

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** लेखी उत्तरे.

**मु.शी.:** तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.राम शिंदे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यातील परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयातील प्राचार्य व उपप्राचार्यांची पदे भरण्याबाबत" या विषयावरील श्री. वसंतराव खोटरे व इतर माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 30366 ला दिनांक 1 एप्रिल, 2003 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

--------

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

(पुढे सुरु....

श्रीमती पंकजा मुंडे (ग्राम विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये ग्रामविकास आणि जलसंधारण विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेत्तर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला.

-----

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंवतराव जाधव यांनी " आदिवासी विकास विहभागातील रोजंदारी व तासिका तत्वावर काम करणाऱ्या शिक्षकांनी दिनांक 25 फेब्रुवारी, 2015 पासून त्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी आदिवासी विकास आयुक्तालयाबाहेर आंदोलन सुरु करणे, त्यातील एका आंदोलकाचा दिनांक 14 मार्च, 2015 रोजी प्रकृत्ती अस्वास्थामुळे मृत्यू झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण यांनी "अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम बंद करण्याबाबत शासन विचार करीत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी "पोषण आहारांतर्गत मुंबई पालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारी खिचडी खाऊन विषबाधा वाढल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये संतापाचे व भितीचे वातावरण निर्माण होणे याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे,संजय दत्त यांनी " नवीन पनवेल सेक्टर 19 मधील सेंट जॉर्ज चर्चवर दिनांक 20 मार्च, 2015 रोजी काही अज्ञात समाजकंटकांनी दगडफेक केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री शरद रणपिसे, धजंजय मुंडे, विक्रम काळे, सतिश चव्हाण, अमरसिंह पंडित यांनी "बीड जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त ठरलेलया 1200 शिक्षकांना इतरत्र नियुक्त्या न देणे, मागील दीड वर्षापासून पगार न दिल्यामुळे हिरामण भडाणे, शिक्षक यांनी

...7..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती .....**

रुग्णालयात गळफास घेऊन आत्महत्या केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.आनंद ठाकूर यांनी "पजालघर जिल्हयात विना परवाना रेती उपसा करणाऱ्या माफियाने वसई तहसिलदार कचेरीतील गस्त घालणाऱ्या अधिकाऱ्यांना मारहाण केल्याची गंभीर घटना शुक्रवार दिनांक 20 मार्च, 2015 रोजी घडल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "शालेय पातळीवर विद्यार्थ्यांचा कल ओळखता यावा व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व्हावे यासाठी राष्ट्रीय माध्यममिक शिक्षा अभियानाने राज्यातील 36 जिल्हयात "वेध भविष्याचा" कार्यक्रम आयोजित केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "राज्यातील काही अनुदानित किंवा अनुदानावर येणाऱ्या शाळांमधील नेमणुकांमध्ये भ्रष्टाचार होणे, त्यातून शिक्षकांचा छळ होणे, बीड गेवराई येथील भास्कर जोगदंड(रामश्वर विद्यालय) या शिक्षकाने आत्महत्येचा प्रयत्न" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

-----

...8...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** :पालघर जिल्हयात शिक्षकांची करक्त पदे न भरल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये शिक्षक नसणे याबाबत श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.विनोद तावडे ( शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 36 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती**: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

...9..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, 143 उमेदवारांना दि. 16 मार्च, 2015 रोजी कागदपत्राच्या पडताळणीसाठी पालघर येथे बोलावण्यात आले होते परंतु त्यामध्ये स्थानिक आदिवासी क्षेत्रातील किती उमेदवार होते ? अनुसूचित क्षेत्रातील शिक्षक भरती करतांना स्थानिक उमेदवारांची भरती करणे बंधनकारक असतांना ते पाळले गेले नाही. स्थानिक संघटनेच्या विरोधामुळे या मुलाखती रद्द झाल्या ही बाब खरी आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा विषय वेगवेगळया जिल्हयामध्ये उपस्थित होत असतो. आमच्या जिल्हयातील स्थानिक उमेदवारांना संधी मिळाली नाही, आमच्या जिल्हयातील एकाही उमेदवाराची निवड झाली या कारणामुळे आम्ही रुजू होऊ देणार नाही अशा प्रकारची मागण्या संघटना करीत असते. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी जो मुद्दा मांडला आहे त्यामध्ये शासनाचा निर्णय होण्यापूर्वी या जागाच्या संदर्भात मुलाखती होऊन त्या जागा भरल्या देखील आहेत. मुलाखती झाल्यानंतर उच्च न्यायालय त्या त्या जागेवर उमेदवारांना घेण्यात यावे असे आदेश दिलेले आहेत. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उमेदवारांची भरती करण्याचे शासनाने ठरवले होते परंतु त्या ठिकाणच्या आंदोलनामुळे व कायदा व सुव्यवस्थेची स्थिती राखण्यासाठी हा विषय शासनाने स्थगित केला आहे. भरती झाल्यानंतर या संदर्भात उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. असे असतांना जी मागणी वेगवेगळया प्रकारच्या संघटनांनी केली आहे त्यामुळे यासंदर्भात प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे शक्य होणार नाही. शेवटी कायद्याच्या निर्णयाप्रमाणेच शासनाला जावे लागणार आहे. नवीन जो पेसाचा कायदा झालेला आहे त्या प्रमाणे पुढील नियुक्त्या होतील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

------------

...10...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : यवतमाळ जिल्हा परिषदेच्या नोकर भरतीच्या प्रश्न पत्रिका फुटणे याबाबत श्री. विक्रम काळे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्रीमती पंकजा मुंडे ( ग्रामविकास मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 40 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----------

....11....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, यवतमाळ जिल्हा परिषदेच्या नोकर भरतीमध्ये पेपरफुटीचा प्रकार घडला होता. यासंदर्भात जिल्हाधिकारी महोदयांच्या लॅपटॉपमध्ये नोकर भरतीच्या प्रश्नपत्रिका सापडलेल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांना यासंदर्भात न्यायालयात बोलावले होते.परंतु यासंदर्भात निवेदनाच्या उत्तरात एक शब्दही आलेला नाही. त्यामुळे मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, आपल्याला निवेदनाच्या उत्तरात काही दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, जिल्हाधिकाऱ्यांच्या लॅपटॉपवर प्रश्नपत्रिका सापडल्या असा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. प्रश्नपत्रिका सेट करण्याचे काम जिल्हाधिकाऱ्यांकडेच असते. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या लॅपटॉपमध्ये प्रश्नपत्रिका सापडल्या हा आक्षेपाचा विषय असू शकत नाही. ज्यांच्याकडे उत्तर पत्रिका सापडल्या त्यांच्यावर कारवाई होणे अपेक्षित असून संबंधितांवर कारवाई होत आहे.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, लॅपटॉपवर प्रश्नपत्रिका असणे स्वाभाविक आहे. त्यामध्ये उत्तरपत्रिका सापडली हा त्यांचा आक्षेप आहे.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्नपत्रिकेचा उल्लेख केला म्हणून मी त्या संदर्भात उत्तर दिलेले आहे. उत्तपत्रिकेसंबंधी प्रश्न विचारल्यास त्याचेही उत्तर देण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी नियम 93ची सूचना वाचलेली नाही. सूचनेतील चौथ्या परिच्छेदात नमूद केले आहे की, "ज्याअर्थी, जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या लॅपटॉपमध्ये उत्तरपत्रिका सापडणे" त्या संदर्भातील उत्तर दिलेले नाही असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. त्या संदर्भात मंत्री महोदया उत्तर देतील काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना काय म्हणावयाचे होते ते सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी प्रश्न विचारला की, लॅपटॉपवर प्रश्नपत्रिका सापडली त्याचे उत्तर मी दिलेले आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे सांगत आहेत की, प्रश्नपत्रिका व आदर्श उत्तर पत्रिका सापडल्या आहेत. एखाद्या प्रश्नाचे आयडीयल उत्तर काय असावे हे त्यांच्या लॅपटॉपवर आहे. आदर्श उत्तर पत्रिका तयार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असल्यामुळे त्यांच्या लॅपटॉपवर ती उत्तरपत्रिका आहे. आपण या घटनेचा सविस्तर आढावा सांगते. दिनांक 2 नोंव्हेंबर रोजी ही परीक्षा होती. दिनांक 1 नोव्हेंबर रोजी ॲन्टी करप्शनला ब्युरोला एक हिंट मिळाली त्याप्रमाणे एक गाडी पडकण्यात आली. त्यामध्ये 11जण होते त्यातील 3 जण विद्यार्थी होते व उत्तरपत्रिका होत्या. तसेच परीक्षेच्या संदर्भातील काही दस्तावेज गाडीत सापडले. या सर्व गोष्टींची चौकशी सुरु झाली. जिल्हाधिकारी निर्दोष आहेत असे आमचे म्हणणे नाही. परंतु पुढील चौकशी केल्याशिवाय यावर कोणतेही भाष्य करता येणार नाही. दिनांक 30 जानेवारी रोजी यातील आणखी एका व्यक्तीला पकडण्यात आले. या प्रकरणात अजून चार्जशीट झालेली नाही. मी या ठिकाणी सांगू इच्छिते की, या प्रकरणामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

-------

..2.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी./ मु.शी.** : जालना जिल्हा भोकरदन येथील तंत्रशाळेत शिक्षकांच्या नेमणुका न होणे याबाबत श्री. सतीश चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.रवींद्र वायकर ( उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 41 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदनाच्या प्रती सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना मिळालेल्या नाहीत. 93 वरील निवेदनाच्या प्रती फक्त विरोधी बाकावरील सन्माननीय सदस्यांना मिळालेल्या आहेत. आम्ही आता त्या मागवून घेतल्या. या बाजूला प्रती का वाटत नाही हे समजत नाही.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, यापुढे अशी पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, जालना जिल्ह्यातील भोकरदन येथे नवीन तंत्रशाळा सुरु केलेली आहे. ते जिल्ह्यातील मोठे तालुक्याचे ठिकाण आहे. भाजपा प्रदेशाध्यक्षांचे ते गाव आहे. त्या गावामध्ये असलेल्या तंत्रशाळेत शिक्षक नाहीत, कर्मचारी वर्ग नाही. या तंत्रशाळेत गोरगरिबांची मुले शिक्षण घेत आहेत. आमच्या प्रश्नांना उत्तरे मिळावीत म्हणून आम्ही नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. माझे प्रश्न आहेत की, ही रिक्त पदे केव्हा भरण्यात येतील तसेच त्या जिल्ह्यातील अंबर या संस्थेच्या शाळेतील रिक्त पदे केव्हा भरण्यात येतील ?

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, जी व्यक्ती येथे आपल्या नावाच्या उल्लेखाबाबत स्पष्टीकरण करु शकत नाही अशा व्यक्तीचे नाव घेता येत नाही.दुसरे म्हणजे आपणास ज्या व्यक्तीचे नाव घ्यावयाचे असेल तर त्या संदर्भात नोटीस द्यावी लागते. या ठिकाणी एखाद्या व्यक्तीचा असा उल्लेख करणे हा त्यांच्यावर अन्यायकारक होईल. तेव्हा या ठिकाणी भाजपा प्रदेशाध्यक्षांचे नाव घेण्यात आलेले आहे ते पटलावर काढून टाकण्यात यावे. त्यांनी चांगल्या अर्थाने नाव घेतलेले नाही. आपला चांगला अर्थ आम्हाला समजतो. आपण चांगल्या अर्थाने नाव घेतले असते तर मी येथे स्पष्टीकरणासाठी उभा राहिलो नसतो.

**सभापती** :मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी जो उल्लेख केलेला आहे तो मी तपासून घेतो. त्यांच्या वक्तव्यामध्ये काही अलिगेशन्स असतील तर ते कामकाजातून काढून टाकण्यात येतील.

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, सदर शाळेत रिक्त पदे भरणे अत्यंत गरजेचे आहे. भोकरदन जिल्हा जालना येथील तंत्रशाळेत 6 पदे निर्माण करण्यासंदर्भातील प्रश्न आहे. सदर पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे आणि ती पदे लवकरात लवकर भरण्यात येतील.

---------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी./ मु.शी.** : खंडकरी शेतकऱ्यांना त्यांच्या मालकीच्या जमिनी न मिळणे याबाबत श्री जयवंतराव जाधव, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.एकनाथराव खडसे ( महसूलमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 44 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, गेल्या अनेक वर्षापासून खंडकरी शेतकरी आपल्या हक्कासाठी लढत होते. शासन दरबारी त्यांना न्याय मिळाला नाही म्हणून ते न्यायालयात गेले. न्यायलयाने या खंडकरी शेतकऱ्यांना जमिनी वाटप करण्याचे आदेश दिले. असे असताना नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातील खंडकरी शेतकऱ्यांना अजूनपर्यंत जमिनी मिळालेल्या नाहीत. निवेदनात नमूद केले आहे की, मोजणी पूर्ण न झाल्यामुळे प्रकरणे प्रलंबित आहेत. आमच्या नाशिक जिल्ह्यातील कॉम्रेड गायकवाड यांनी हा लढा सुरु केला होता. या संदर्भात न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. मोजणी पूर्ण झालेली नाही, काही शेतकऱ्यांनी रक्कम भरलेली नाही असे आता शासन सांगत आहे. अशा किरकोळ कारणांमुळे शेकडो शेतकरी वंचित राहत असतील तर ते योग्य नाही. तेव्हा या खंडकरी शेतकऱ्यांना तातडीने जमिनीचे वाटप किती दिवसांत करण्यात येईल, तसेच ज्या अधिकाऱ्यांनी हे वाटप केलेले नाही त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येईल ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील 14 गावांतील 317 माजी खंडकरी व त्यांच्या वारसांना देय क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. आजपावेतो 195 खंडकरी यांना देय क्षेत्राचे वाटप करण्यात आलेले आहे. ही सतत सुरु राहणारी प्रक्रिया आहे. जसजशी मोजणी होते त्याप्रमाणे त्यांना जमीन दाखविली जाते, त्यानंतर जमिनीचे वाटप होते. शेतकऱ्यांकडून कागदपत्रांची पूर्तता करण्यात येईल त्याप्रमाणे त्यांना जमिनीचे वाटप केले जाईल. खंडकरी शेतकऱ्यांनी कागदपत्रांची पूर्तता लगेच केली तर त्यांना लगेच जमिनीचे वाटप करण्यात येईल. परंतु त्या संदर्भातील कागदपत्रे सादर करण्यास विलंब होत असल्यामुळे त्यांना जमिनीचे वाटप करण्यास विलंब होत आहे.

श्री.जयंवतराव जाधव : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, मोजणी करण्यास वेळ लागत आहे. शेतकऱ्यांना जी जमीन देऊ करीत आहात त्या जमिनीची मोजणीच झालेली नाही, ही शासन दिरंगाई नाही काय, हा अधिकाऱ्यांचा कामचुकार नाही काय, अधिकारी शेतकऱ्यांना जमिनी दाखवत नसतील तर ती चूक कोणाची आहे, जमिनीची मोजणी लवकरात लवकर करण्यासाठी मेळावे घेणार काय, ही कामे लवकेर होण्यासाठी एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येईल का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या कामामध्ये अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केलेला आहे किंवा कसे हे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत तपासण्यात येईल. जर अधिकाऱ्यांनी जाणवीपूर्वक हलगर्जीपणा केल्याचे दिसून आल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. जवळपास 80 टक्के जमीन वाटपाचे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित 20 टक्के शेतकऱ्यांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर त्यांना जमिनीचे वाटप करण्यात येईल.

-------

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : मुंबई येथील ससून डॉकमधील मासळी साफ करण्याचे गोडावून सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार खाली करणे, याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.एकनाथराव खडसे ( मत्स्यव्यवसाय मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 45 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या निवेदनाच्या माध्यमातून माननीय मंत्र्यांनी वस्तुस्थिती कबूल केलेली आहे की, मच्छीमारांवर संकट येणार आहे. सदरहू गोदाम पोर्ट ट्रस्टने ताब्यात घेतले तर प्रश्न निर्माण होईल. विशेषतः मुंबईतील जे मोठे कोळीवाडे आहेत ते आणि रायगड जिल्ह्यातील 2500 ट्रॉलर्स त्या ठिकाणी येतात. परंतु यातील तांत्रिक बाजू पाहिली तर दिसून येईल की, यामध्ये मत्स्यव्यवसाय विभागाकडून चूक झाली आहे आणि त्या अनुषंगाने न्यायालयाने निर्णय दिला आहे. ज्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणी चूक केली आहे त्यांनी किंवा संबंधित वकिलांनी हे प्रकरण न्यायालयात योग्यप्रकारे मांडावयास पाहिजे होते. परंतु त्यांनी हे प्रकरण योग्यप्रकारे मांडले नसल्याने शासन त्यांच्या बाबतीत काय विचार करणार आहे ?

तसेच दुसरी बाब अशी की, बोंडीला 10-20 कोटी रुपयांमध्ये चांगले बंदर होऊ शकते. त्या ठिकाणी बंदर करण्याबाबत शासन गंभीरपणे विचार करेल काय ? समुद्रातील मासे ससून डॉकमध्ये येतात आणि प्रोसेसिंग करण्यासाठी रायगड, पनवेलला जातात. या कामी राज्य सरकारने 10 टक्के हिस्सा भरायचा आहे आणि उर्वरित 90 टक्के हिस्सा केंद्र सरकार देणार आहे. माननीय मंत्र्यांनी या साईटला स्वतः भेट दिली तर त्यांच्या लक्षात येईल की हा प्रश्न सुटू शकतो. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, राज्य सरकार ससून डॉकच्या समोर असलेल्या बोंडीला पर्यायी बंद करण्याबाबत विचार करेल काय ?

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कॉलेजमध्ये शिक्षण उप संचालकांनी केलेले वर्तन या संबंधी औचित्याचा मुद्दा**

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, उत्तर महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्यात मराठा विद्या प्रसारक समाज ही बहुजन समाजाला खऱ्या अर्थाने शिक्षणाची दरवाजे उघडून देणारी संस्था आहे. या संस्थेच्या केटीएचएम कॉलेजमध्ये शिक्षण उप संचालक श्री.भगवान सूर्यवंशी अचानक गेले. त्या ठिकाणी परीक्षा सुरु असल्यामुळे तेथे उपस्थित असलेल्या द्वारपालने उप संचालकांना विचारले की, आपण कोण आहात ? त्यावर उप संचालकांनी त्याला सांगितले की, तू बाजूला हो. महोदय, त्या उप संचालकाने गेटला लाथ मारुन आणि द्वारपालला धक्काबुक्की करुन आतमध्ये प्रवेश केला. त्या ठिकाणी असलेल्या शिक्षकांना उप संचालक कोण आहेत हे माहीत असण्याचे कारण नाही. कारण त्या कॉलेजमध्ये परीक्षा आणि सुपरव्हीजन सुरु होते. त्या उप संचालकांनी त्या शिक्षकांना विचारले की, मी आल्यानंतर तुम्ही उभे का राहीला नाहीत ? एवढेच नव्हे तर त्यांनी त्या शिक्षकांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. सदरहू संस्थेचे संचालक मंडळ कसे माजलेले आहे, अशा प्रकारचे त्यांनी वक्तव्य केले आहे. महोदय, या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मी माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांना विनंती करतो की, अशा नालायक असलेल्या शिक्षण उपसंचालकांला तातडीने बडतर्फ करावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा विषय अतिशय संवेदनशील असून गंभीर आहे. यामध्ये दोन प्रकारचे व्हर्जन्स आहेत. परंतु सन्माननीय सदस्यांनी सभागृहात सांगितलेली माहिती खरी मानून, त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावयास पाहिजे. त्यामुळे या संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. परंतु दुसऱ्या बाजूला अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, त्या कॉलेजमध्ये भरारी पथक गेले असता त्याला आतमध्ये येऊ दिले नाही. वास्तविक पाहता वर्तमानपत्रातील बातमी धरुन काही बोलता येत नाही. तरीही मी मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या अध्यक्षा कै.वसंत पवार

श्री.विनोद तावडे....

यांच्या पत्नी डॉ.निलिमा पवार यांच्याशी या विषयी चर्चा केली आहे. त्यांनी सांगितले की, संबंधित अधिकाऱ्याने पाठविलेल्या व्यक्तीला नोकरी लावली नाही वगैरे.... त्या संस्थेचा आणि अधिकाऱ्यांचा वाद सुरु आहे. त्यामुळे या विषयी तटस्थपणे चौकशी करुन, जर या प्रकरणी अधिकारी दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. परंतु तपासणीशिवाय मी त्यांना सेवेतून काढू शकत नाही.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, माननीय मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. मला वाटते त्यांना योग्य ती कार्यवाही करण्यासाठी थोडा अवधी देणे आवश्यक आहे. आपल्याला न्याय हवा असेल तर, चौकशीअंती त्यांना निर्णय घेणे आवश्यक आहे. अन्यथा, संबंधित अधिकारी इतर मार्गाने परत तेथे येतील आणि सन्माननीय सदस्यांना जे अपेक्षित आहे ते साध्य होणार नाही.

श्री.सुनील तटकरे : महोदय, माझी विनंती आहे की, या संदर्भातील निर्णय 8 दिवसांपूर्वी घ्यावा.

श्री.विनोद तावडे : होय.

------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**विशेष घटक योजना व आदिवासी योजना, उपयोजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या सिंचन विहिरींच्या अनुदानात वाढ करण्याबाबत औचित्याचा मुद्दा.**

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, राज्यामध्ये सुरु असलेल्या विशेष घ्टक योजना (अनुसूचित जाती) व आदिवासी योजना, उपयोजना (अनुसूचित जमाती) साठी सिंचन विहिरींचा लाभ देण्यासाठी केवळ एक लक्ष रुपयांची मर्यादा असल्यामुळे या विहिरी पूर्ण होत नसून सदरील योजनेचा लाभ लाभार्थ्यांना मिळत नसल्याने त्यांच्यात पसरलेली नाराजीची भावना, यासाठी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेप्रमाणे उक्त योजनेच्या अनुदानात वाढ करणे आवश्यक असल्याने या बाबत मी सभागृहात सदरहू औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

**सभापती** : मला वाटते आता मध्यंतर घेऊ या. मध्यंतरानंतर कोणते कामकाज घ्यावे याबाबत ठरवू या.

सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

(दुपारी 3.07 ते 3.40 वाजेपर्यंत मध्यंतर)

--------

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. प्रकाश बिनसाळे)**

**पृ.शी.** : महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम-2001

**मु.शी.** : महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम-2001 संबंधी माननीय सामान्य प्रशासन राज्यमंत्र्यांचे निवेदन

डॉ. रणजित पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(**प्रेस** : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : राज्यातील जिल्हा परिषदांतील माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांची पदे रिक्त असणे.

**मु.शी.** : राज्यातील जिल्हा परिषदांतील माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांची पदे रिक्त असणे यासंबंधी श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात सर्वात जास्त जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळा या मराठवाडा विभागामध्ये असणे, त्यांची एकूण संख्या 379 असणे, या शाळांपैकी 90 टक्के शाळांना अद्ययावत इमारती नसणे, या इमारती निजामकालीन असून त्या धोकादायक स्थितीत असणे, या शाळांमधून सर्व गोरगरीब शेतकऱ्यांची मुले-मुली शिक्षण घेणे, त्यापैकी 299 शाळांना राजपत्रित मुख्याध्यापक वर्ग 2 ची पदे मंजूर असणे, गेल्या अनेक कालावधीपासून जवळपास 240 मुख्याध्यापकांची पदे रिक्त असणे, त्याठिकाणी प्रभारी मुख्याध्यापक म्हणून शिक्षकांना तात्पुरती नियुक्ती देणे, त्यामुळे शाळांच्या गुणवत्तेवर परिणाम होणे, परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, ही पदे भरण्याची तसेच शाळांच्या अद्ययावत इमारती बांधण्यासाठी बृहत आराखडा तयार करण्याची वारंवार मागणी शासनाकडे होणे, या गंभीर विषयाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या सर्वात जास्त माध्यमिक शाळा मराठवाड्यात आहेत. राज्यातील इतर कोणतयाही विभागामध्ये जिल्हा परिषदांच्या माध्यमिक शाळा मोठ्या संख्येने नाहीत, असल्या तरी, त्यांची संख्या अतिशय कमी आहेत. मराठवाड्यातील 8 जिल्ह्यांमध्ये 299 इतक्या माध्यमिक शाळा आहेत आणि या शाळांमध्ये मोठ्या संख्येने गोरगरिबांचीच मुले शिक्षण घेत आहेत. आपल्याला या संदर्भात उदाहरणच द्यायचे झाले तर औरंगाबाद जिल्ह्यातील फुलंब्री या तालुक्याच्या ठिकाणी माध्यमिक शाळा असून तेथे जवळपास 1700 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. गणोरी सारख्या छोट्याशा गावामध्ये 1200 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सभापती महोदय, जिल्हा परिषदांच्या माध्यमिक शाळांमध्ये गोरगरिबांची मुले शिक्षण घेत आहेत. आज 299 माध्यमिक शाळांपैकी फक्त 45 माध्यमिक शाळांमध्ये मुख्याध्यापकांची पदे भरली आहेत. 254 पदे वर्षांनुवर्षे भरलेली नाहीत, ती पदे रिक्त आहेत. आम्ही या संदर्भात सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. निवेदनात कायद्याची अडचण असल्याचे सांगितले आहे. सरकार म्हणून आपल्याला निर्णय घ्यावा लागणार आहे. खाजगी माध्यमिक शाळांमध्ये सेवा-शर्ती लागू आहेत, त्या माध्यमिक शाळातील सेवा ज्येष्ठ शिक्षकाला मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती दिली जाते आणि त्याला तेथे मुख्याध्यापक केला जातो. ट्रेन ड्रायव्हर नसेल तर ट्रेन चालू शकणार नाही, अपघात होऊ शकतो. सभापती महोदय, ही तर शाळा आहे. लेकरांचे भवितत्व त्यांच्या हातात आहे. माध्यमिक शाळांत कॅप्टन असलाच पाहिजे. मुख्याध्यापक असल्याशिवाय शाळेचे संचलन व्यवस्थित होऊ शकत नाही, विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास होऊ शकत नाही. मुख्याध्यापक नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे. त्यामुळे हा विषय महत्त्वाचा आहे. रिक्त असलेली 254 पदे भरण्याच्या संदर्भात सरळ पदोन्नतीची तरतूद आहे, त्यानुसार बदल करून पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या अगोदर ही पदे भरण्याच्या संदर्भात आपणाकडून कार्यवाही करण्यात येईल का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेला प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. मी त्यांचे आभार मानतो. कारण त्यांनी अधिवेशन संपण्याच्या आत असे न म्हणता शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी असे म्हटले आहे. इतका कालावधी देण्याचे माझ्यावर त्यांनी उपकार



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे ....

केले आहेत. त्यांना माहीत आहे की, हे लगेच होणे शक्य नाही. हा विषय अत्यंत गुंतागुंतीचा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील मराठवाडा हा निजामाच्या अधिपत्याखाली होता आणि विदर्भ मध्य प्रांतात होता. तेथे शासकीय माध्यमातून शिक्षण खूप चालायचे. राज्य शासनाने निजामाच्या अधिपत्याखाली असलेल्या शाळा जिल्हा परिषदेत घेतल्या आणि तशाच मध्य प्रांतातील शाळा देखील घेतल्या. आपण लक्षवेधी सूचनेत दोन गोष्टी मांडल्या आहेत. परंतु त्यातील एकच गोष्ट मांडली आहे. शाळांना इमारती नसणे हाही एक विषय त्यामध्ये आहे. निजामाच्या काळातील शाळा असल्यामुळे त्या अतिशय जुन्या आहेत, जीर्ण झाल्या आहे. विद्यार्थ्यांनी तेथे शिक्षण घेणे धोक्याचे आहे. आम्ही यावर्षी सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे अधिकचा पैसा मागितला आहे, ज्यामुळे नवीन बांधकाम करता येईल. खोल्यांचे पैसे मिळाले आहे. काही शाळा नव्याने बांधाव्या लागणार आहेत.

सभापती महोदय, या सर्व शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट लगेच करून घेण्यात येईल. ज्या शाळा धोकादायक आहेत, त्या केंद्र सरकारच्या सर्व शिक्षा अभियानातून नसेल तर राज्य सरकारच्या निधीतून आणि त्यातूनही पैसे नसतील आणि शाळा भरविणे धोक्याचे असेल तर शाळा भरविल्या जाणार नाहीत. मी स्ट्रक्चरल ऑडिटच्या संदर्भात माहिती घेतो. एखदा अपघात घडला तर 100-150 मुले अडकतील. मग धावपळ करावी लागेल. त्यामुळे लगेचच स्ट्रक्चरल ऑडिट करून कोणत्या शाळा धोकादायक आहेत ते पाहून तातडीने नवीन बांधण्यात येतील.

सभापती महोदय, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (प्रशासन शाखा) उप शिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गात राजपत्रित मुख्याध्यापक या पदाचा समावेश होतो. सदर संवर्गाची मंजूर पद संख्या 1073 आहे, त्यापैकी राज्यात मुख्याध्यापकांची 356 पदे आहेत. मुख्याध्यापकाचे पद जिल्हा परिषद पातळीवर गॅझेट ऑफिसरच्या दर्जाचे आहे. शाळांची संख्या 2000, 2500 होती, आता ती 50, 100, 150 इतकी खाली आल्यानंतर गॅझेट ऑफिसरला मुख्याध्यापक होण्यामध्ये काही रस राहिला

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे ....

नाही. त्यामुळे ही पदे सातत्याने रिक्त राहत आहेत. आपल्याला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. मुख्याध्यापकाचे पद गॅझेट पातळीवर आहे ते काढून पदोन्नतीने केले तर बरे होईल. आपण मार्ग सूचविला आहे, त्या माध्यमातून मुध्याध्यापक त्वरित नेमता येतील आणि त्या शाळांना कॅप्टन देता येईल, त्यामुळे ट्रेनला मोटारमन मिळू शकतो. गॅझेट ऑफिसरची अट काढून सरळ पदोन्नतीने करता येईल का हे पाहून तसा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून मूव्ह करण्यात येईल.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, निजामकाळातील शाळांची पटसंख्या किती आहे ? पटसंख्या कमी असलेल्या इमारतींचे बांधकाम केल्यास त्याचा काहीही उपयोग होणार नाही. त्यामुळे या संदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे का ?

सभापती महोदय, सध्या ज्या शाळांना मुख्याध्यापक आहेत, त्या शाळांची व ज्या शाळांना मुख्याध्यापक नाहीत, अशा शाळांची शैक्षणिक गुणवत्ता काय आहे ? प्रश्नाधीन 259 शाळांच्या गुणवत्तेबाबतची माहिती मंत्री महोदय पटलावर ठेवतील काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जो पर्यंत विनोद तावडे राज्याचे शिक्षण मंत्री आहेत, तोपर्यंत शिक्षण विभागाचा एकही पैसा वाया जाणार नाही, असा विश्वास मी देतो. केवळ इमारती बांधून खिसे भरण्याचा माझा स्वभाव नाही आणि तसे माझ्या कार्यकाळात होणारही नाही.

सभापती महोदय, शैक्षणिक गुणवत्तेबाबतचा तौलनिक अभ्यास मी पटलावर ठेवीन. जेणेकरुन त्याचा आधार घेऊन आपल्याला गावोगावी जाऊन भाषणे देखील करता येऊ शकतील.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, जिल्हा परिषद शाळांच्या इमारत बांधणीचा विषय या ठिकाणी उपस्थित करण्यात आला आहे. या लक्षवेधी सूचनेमध्ये शाळांमधील मुख्याध्यापक पदे भरण्याबाबतचा महत्त्वाचा प्रश्नही सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी उपस्थित केला आहे. या संदर्भात वर्षानुवर्षे संघर्ष आणि पाठपुरावा सुरु आहे. या भागातील जिल्हा परिषदांच्या माध्यमिक शाळांमधील 249 मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत. ही पदे किती दिवसांपासून रिक्त आहेत ?

सभापती महोदय, या शाळांना अन्य शाळांप्रमाणेच सन 1981 ची नियमावली लागू आहे. जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये पदोन्नतीसंदर्भात कोणते नियम लागू केलेले आहेत ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अन्य शाळांच्या मुख्याध्यापकांचा विषय या लक्षवेधी सूचनेतील विषयाशी संबंधित नाही. तथापि, मुख्याध्यापकांची आवश्यक असलेली पदे निर्माण करण्याबाबत मघाशी मी जो मुद्दा मांडला आहे त्याप्रमाणे राजपत्रित हा दर्जा काढून आपल्याला पदे भरावयाची आहेत. नवीन शैक्षणिक वर्षासाठी संच मान्यता ऑगस्ट, 2015 पर्यंत करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. त्यामध्ये आपण यशस्वी झालो तर सर्व पदांची भरती करु.

...2....

श्री.अमरनाथ राजुरकर : सभापती महोदय, सर्व शाळा इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येईल, असे आताच शिक्षण मंत्री महोदयांनी सांगितले आहे. या शाळा इमारती निजामकाळातील असून पडावयास आल्या आहेत. आता तर या इमारती अतिक्रमणांनी वेढलेल्या आहेत. तसेच, या इमारती त्या त्या शहरांच्या मोक्याच्या ठिकाणी आहेत व त्यांना कमर्शिअल व्हॅल्यू आली आहे. माझा प्रश्न असा आहे की, या शाळा इमारतींचा कमर्शिअल वापर करुन त्या निधीतून अन्य ठिकाणी दर्जेदार शाळा इमारती बांधण्याचा निर्णय शासन घेणार आहे का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न ग्राम विकास विभागाशी संबंधित आहे. त्यांनी केलेली सूचना मी त्या विभागाकडे पाठवितो, तो विभाग याबाबत योग्य निर्णय घेईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, प्रश्नाधीन शाळा इमारती या निजामकाळातील असून त्या जिल्हा परिषदांकडे वर्ग झालेल्या आहेत, या इमारती धोकादायक स्थितीत आहेत, असे आताच शिक्षण मंत्री महोदयांनी सांगितले आहे. या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले आहे. स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची शासनाची कार्यपध्दती काय आहे, खाजगी कंपन्यांकडून स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेण्यात येते का, त्यांना काही निश्चित कालावधी दिलेला आहे का आणि हे काम एखाद्या यंत्रणेवर सोपविले तर किती दिवसात पूर्ण करण्याचे नियोजन आहे ?

सभापती महोदय, अनेक शाळांची पटसंख्या कमी असल्यामुळे ते व्हायबल होईल किंवा नाही, असा प्रश्न आहे. त्यामुळे काही शाळांचे एकत्रिकरण करणे,शाळा इमारतींची संख्या कमी करणे, तेथील मुख्याध्यापकांची पदे भरणे, स्ट्रक्चरल ऑडिट वेळेवर पूर्ण करणे, हा कार्यक्रम केव्हा पर्यंत आपल्याकडून पूर्ण करण्यात येईल ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण स्ट्रक्चरल ऑडिट आय.आय.टी.च्या माध्यमातून करुन घेत असतो. कारण, ते अधिक ऑथेंटिक असते. या संदर्भात आय.आय.टी. आणि व्ही.जे.टी.आय.शी बोलणी सुरु आहेत. शाळांमधील विद्यार्थ्यांचा प्रश्न असल्यामुळे ते जर स्ट्रक्चरल ऑडिट लवकर करुन देणार असतील तर आम्ही करुन घेऊ. तथापि, मान्यताप्राप्त संस्थांकडूनच ऑडिट करुन घेण्यात येईल. हे अधिवेशन संपण्यापूर्वी आम्ही याबाबत निर्णय घेऊ.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांचे मी आभार मानतो. इमारतींची मालकी ग्राम विकास विभागाकडे असल्यामुळे बांधकामाबाबतचा निर्णय ग्राम विकास विभागाला घ्यावा लागणार आहे.

सभापती महोदय, काही शाळांची पटसंख्या कमी आहे, त्या शाळा इमारती नंतर बांधू, असाही उल्लेख मंत्री महोदयांनी केला आहे. सर्व शाळांचा कृती आराखडा तयार करण्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी ठरविले होते. आज 1200 ते 1700 पटसंख्या गुणवत्तेशिवाय असू शकत नाही. त्यामुळे ज्या शाळांची पटसंख्या मोठी आहे आणि इमारतींची स्थिती चांगली नाही, अशा शाळा इमारती बांधण्याचा कृती कार्यक्रम ठरवून आपल्याला हे काम विशिष्ट कालमर्यादेत करावे लागेल. याबाबत शासन निर्णय घेणार का ?

सभापती महोदय, मुख्याध्यापकांची 50 टक्के पदे लोकसेवा आयोगाकडून आणि 50 टक्के पदोन्नतीने भरली जातात. लोकसेवा आयोगाकडून ही पदे न भरता सरळ पदोन्नतीने भरण्याबाबतचे आश्वासन आताच मंत्री महोदयांनी दिले आहे. ही सर्व प्रक्रिया पुढील शैक्षणिक वर्ष पूर्ण होण्याअगोदर पूर्ण होईल का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे हे शिक्षक आहेत आणि मी इंजिनिअर आहे. त्यामुळे नियोजनबध्द पध्दतीने ही सर्व प्रक्रिया पार पाडण्यात येईल, याबाबत त्यांनी विश्वास बाळगावा. हे सर्व काम नियोजनपूर्वक करू. आता आपल्याला सरळ सेवेने पदे भरावयाची आहेत. त्यासाठी जाहिरात काढणे, पदोन्नती करणे, ही प्रोसेस आहे. संच मान्यतेनुसार कोठे आणि किती पदे भरावयाची आहेत, हे लक्षात घेऊन ती पदे वेळेत भरू. नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी हे सर्व झाले पाहिजे, अशी सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. तो पर्यंत हे होईल किंवा नाही, माहीत नाही. परंतु, ते वेळेत करु आणि शाळांना सारथी, कॅप्टन, मोटरमॅन योग्य प्रकारे मिळेल.

------------

...4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : राज्यातील कृषी विद्यापीठातील रोजंदार मजूर, कुशल व अर्धकुशल कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केल्याबाबत

**मु.शी.** : राज्यातील कृषी विद्यापीठातील रोजंदार मजूर, कुशल व अर्धकुशल कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केल्याबाबत माननीय कृषी मंत्र्यांचे निवेदन

श्री.एकनाथ खडसे (कृषी मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(**प्रेस** : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

----

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : मुंबई उपनगरातील मालाड-पश्चिमेतील धारोली गावात सुरु असलेला भूखंड घोटाळा

**मु.शी.** : मुंबई उपनगरातील मालाड-पश्चिमेतील धारोली गावात सुरु असलेला भूखंड घोटाळा यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"मुंबई उपनगरातील मालाड-पश्चिमेतील धारोली गावात (मढ आयलंड) येथील कोट्यावधीच्या सरकारी जमिनीवर मोठ्या प्रमाणावर उत्तर भारतीय रहिवाशी भूमाफिया दिवसाढवळ्या सर्रासपणे लुट करीत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास येणे, उक्त धारोली गावात राज्य सरकारच्या मालकीच्या जवळपास ५०० एकर असलेल्या जागेचा प्रतिचौरस फुट ३० ते ४० हजार रुपये दर असलेल्या मोक्याच्या जागा मातीमोल भावाने विकण्यात येणे, सदर गाव हे सीआरझेडमध्ये येत असूनही तेथे संबंधित शासकिय अधिकाऱ्यांच्या संगनमताने बांधकामे सुरु असणे,या अतिक्रमणांमुळे येथील ४४ फुट रस्ता १० फूट एवढा झाला असून मालमत्ता नोंदणी कार्डमध्ये सिटी सर्व्हे क्र. १६० व १२९ मध्ये राज्य सरकार मालक असल्याची नोंद असणे, सदर बेकायदा बांधकामे तोडण्याबाबत स्थानिक खासदारांनी संबंधितांना पत्रव्यवहार करुनही अद्यापही कोणतीही कार्यवाही न होणे, स्थानिक पोलिस, भूमाफिया, संबंधित विभागाचे अधिकारी यांच्या संगनमताने सुरु असलेल्या भुखंड घोटाळ्याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन दोषी व्यक्तींवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."***

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, एका वेगळ्या प्रकारच्या दुर्लक्षित विषयाकडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छिते. मढ आयलँड जवळ धारोली गाव आहे, त्या संदर्भात मी प्रश्न विचारला आहे, त्याचे उत्तर निवेदनाच्या माध्यमातून सरकारने दिले असले तरी काही प्रश्न अनुत्तरित आहेत, त्यावर प्रकाश टाकणे अपेक्षित आहे. 248 एकर जमीन शासकीय आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. 248 एकर जमिनीवरील अतिक्रमणाबाबत काय कारवाई करता येईल याबाबत उपनगर जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत, असे मंत्री महोदयांनी निवेदनात नमूद केले आहे. मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, किती कालावधीत ही अतिक्रमणे झाली आहेत. मुंबई शहराला लागून इतकी मोठी जमीन शासकीय मालकीची असताना या जमिनीचा दुरुपयोग होऊ नये याबाबत सरकारने यापूर्वी काही दक्षता घेतली आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, तेथील वस्तुस्थिती आता काय आहे. याबाबत आपण स्वत: किंवा राज्यमंत्री महोदय त्या ठिकाणी भेट देतील काय ? सीआरझेडच्या अखत्यारित हे गाव असताना त्याची अंमलबजावणी आतापर्यंत का झाली नाही. याबाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, एकूण शासकीय जमीन 10.56 लाख चौरस मीटर म्हणजे 248 एकर इतकी आहे. त्यापैकी 8.75 लाख चौरस मीटर परिसरात कांदळवन आहे. वन जमीन आहे, त्यामुळे कोणतेही बांधकाम त्या ठिकाणी करता येणार नाही. उर्वरित 1 लाख 79 हजार चौरस मीटर क्षेत्र मोकळे आहे, हे समुद्र किनाऱ्यावरील क्षेत्र असून ते दलदलीचे आहे. खाजन जमिनीचे क्षेत्र आहे. या जमिनीवर अतिशय कमी अतिक्रमण होते. आता तेथील सर्व अतिक्रमण काढण्यात आले आहे. तेथे फक्त तीन झोपड्या होत्या, त्यातील दोन झोपड्या काढण्यात आल्या आहेत. एक झोपडी तेथे राहिलेली आहे. उर्वरित अतिक्रमण या गट क्रमांकात नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे त्या जमिनीच्या मोजणीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. या जमिनीवर अतिक्रमण असेल तर ते काढण्यात येईल. या जमिनीवरील तीन झोपड्या वगळता सर्व अतिक्रमण काढून टाकण्यात आले आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेत आणखी एक प्रश्न असा विचारण्यात आला आहे की, जमिनीची नोंदणी करता 10 लाख रुपयांपासून पुढील रकमेची परस्पर बेनामी विक्री सुरु आहे. यासंदर्भात मंत्री महोदय चौकशी करतील काय ? त्यासाठी तेथे जाऊन

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

पाहणी करण्यात येईल काय. याबाबत काही लोकांच्या मालकीच्या जमिनी दाखविण्यात आल्या आहेत. ते लोक तेथील भूमिपुत्र असूच शकत नाहीत. केंव्हा ना केंव्हा तरी त्या जमिनी या लोकांनी त्यांच्या नावे केलेल्या आहेत. या प्रकारची मंत्री महोदय चौकशी करतील काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असे विचारले की, त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली आहे काय ? जिल्हाधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी जाऊन त्या जागेची पाहणी केली आहे. आवश्यकता भासली तर मंत्री किंवा राज्यमंत्री जाऊन तेथील जागेची पाहणी करतील. आता या ठिकाणी कोणतेही अतिक्रमण नाही. तेथे मासे सुकविण्यासाठी तात्पुरते गोडाऊन होते, ते गोडाऊन काढून टाकण्यात आले आहेत. अनधिकृत खरेदीच्या नोंदी आहेत असे सन्माननीय सदस्य सांगत आहेत, अशा प्रकारे कोणताही खरेदी विक्रीचा व्यवहार दुय्यम निबंधक यांच्याकडे नोंदविण्यात आलेला नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदय महसूल खात्याच्या अखत्यारितील उत्तर देत आहेत. मढ आयलँड हा परिसर महानगरपालिकेच्या अखत्यारित येतो. महानगरपालिकेच्या प्रभाग अधिकाऱ्यांनी व संबंधित इतर अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी लक्ष दिले नाही म्हणून मुंबई शहरात झोपड्या अनधिकृतपणे वाढत आहेत. यावर प्रथम महानगरपालिकेने नियंत्रण ठेवले पाहिजे.... (अडथळा)... माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते साहेब मी तुमच्या एवढा महानगरपालिकेच्या कायद्याचा अभ्यास केलेला नाही. ग्रामपंचायतीमध्ये कोणतेही बेकायदेशीर बांधकाम असेल तर ग्रामपंचायत हरकत घेते. ग्रामपंचायतीच्या परवानगी शिवाय खाजगी किंवा सरकारी जागेवर बांधकाम केले असेल तर संबंधितावर कारवाई करण्यात येते. महानगरपालिकेने या ठिकाणी कोणती कारवाई केली व कारवाई केली नसेल तर संबंधित वॉर्ड ऑफिसरला राज्य शासन जबाबदार धरणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, या जागेवर आता कोणतेही अतिक्रमण राहिलेले नाही. तीन झोपड्या होत्या त्यातील दोन झोपड्या काढून टाकण्यात आल्या आहेत, एका झोपडीधारकाचे असे म्हणणे आहे की, माझी झोपडी दुसऱ्या गट क्रमांकवर आहे. शेजारील गट क्रमांक 55 हा खाजगी आहे. त्या जागेची मोजणी करुन ती झोपडी शासकीय जागेवर असेल तर काढून टाकण्यात येईल. या जमिनीवर आता कोणतेही अतिक्रमण नाही. त्यामुळे

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे...

महानगरपालिकेचा प्रश्न निर्माण होत नाही. ही जमीन महसूल विभागाची आहे. ही जमीन महानगरपालिकेची नाही. ही जमीन जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारित आहे. जिल्हाधिकारी यांच्याकडे या अतिक्रमण निर्मुलनासाठी विशेष अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, विधान भवनाचा परिसर देखील बीपीडीच्या जागेवर आहे. महसूल खात्याची ही जमीन नाही, बीपीडीकडे शासनाला परवानगी घ्यावी लागते.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, ही जमीन सरकारी आहे त्यावर अतिक्रमण होऊ नये ते झाल्यास काढण्यात यावे, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात उप जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी नियुक्त केलेला आहे. सरकारी जमिनीवर अतिक्रमण असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणले तर तातडीने निमुर्लन करण्याची कारवाई केली जाते.

------

**लक्षवेधी सूचनेबाबत**

**तालिका सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 3 सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विनंती केल्यानुसार पुढे ढकलण्यात येत आहे. त्याचप्रमाणे लक्षवेधी सूचना क्रमांक 4 बाबत सामान्य प्रशासन विभागाने ही लक्षवेधी सूचना नगर विकास विभागाकडे वर्ग केल्यामुळे ती पुढे ढकलण्यात आली आहे.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक 4 उद्या चर्चेला घेण्यात येईल काय ?

**तालिका सभापती** : लक्षवेधी सूचना केव्हा चर्चेला घ्यावी, याबाबत सभापती महोदय निर्णय घेतील.

-------

....6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : चंद्रपूर जिल्ह्यात बनावट स्कूलबस व ट्रक वापरात असणे

**मु.शी.** : चंद्रपूर जिल्हयात बनावट स्कूलबस व ट्रक वापरात असणे यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

***"चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बोगस स्कूल बस बनावट क्रमांकाने धावत असल्याचे उघडकीस येणे, सदर बसच्या क्रमांकावर प्लास्टिक पट्टी चिकटवली असल्याचे बल्लारपूर पोलिसांनी वाहन तपासणी केली असता उघडकीस येणे, जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात शाळकरी विद्यार्थ्यांना पोहोचविण्याकरिता वेकोली प्रशासनाने स्कूल बस सुरू करण्यांत येणे, भाडेतत्वावर घेतलेली सदर बस बालाजी ट्रॅव्हल्सची असल्याचे उघड होणे, त्यामुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बनावट स्कूल बस व ट्रक वापरात असणे, त्यातच बनावट व चोरीचे ट्रक खरेदी करुन त्याची विक्री करणारी टोळी जिल्ह्यात सक्रीय असणे, असेच प्रकार गोदिंया, वर्धा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात घडत असणे, त्यामुळे शाळकरी विद्यार्थ्यांचे जीव धोक्यात येणे, त्यातच विदर्भात ट्रक, स्कूल बस चोरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दिसून येणे, याकडे परिवहन विभागाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यात आर.टी.ओ. व तस्करांचे मोठ्या प्रमाणात असलेले लागेबांधे, शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे शाळकरी विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, शासनाने यावर करावयाची कारवाई व उपाययोजना."***

श्री.दिवाकर रावते (परिवहन मंत्री): सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

...7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर विषय आहे. चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात ट्रक चोरीला जात आहेत. रोतारोत ट्रकचे पार्ट वेगळे करुन दुसरा ट्रक तयार करुन ते विकले जात आहेत. दहा ट्रक चोरीला गेले असून एकही ट्रक सापडला नाही. शाळेच्या बसेस चोरीला जात आहेत. ज्या बसेसबाबत आपण नेहमी अलर्ट राहतो व वेगवगळे नियम करुन मुलांना सुरक्षित करण्याचा प्रयत्न करीत असतो. अशा दोन बसेसच्या क्रमांकावर प्लॉस्टिक पट्टी लावून त्या बल्लारशाह येथे सापडल्या आहेत. बालाजी ट्रव्हॅल्स गोंदिया यांच्या विरोधात बल्लापूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते )**

श्रीमती शोभा फडणवीस........

दुसरे असे की, वेस्टर्न कोल फिल्डने ज्या बसेस ठरविल्या होत्या त्यांच्याकडे परवानेच नव्हते आणि त्यांनी देखील बसच्या नंबर प्लेटवर प्लास्टिक पट्टी लावून नंबर बदलले होते. विशेष म्हणजे, ज्यावेळी बसेस फायनल होतात त्यावेळी प्रशासनाने त्यांची कागदपत्रे तपासली पाहिजेत, असा नियम आहे. परंतु कागदपत्रे तपासली गेली नाहीत, परवाने देखील दिले गेले नाहीत आणि अशा प्रकारच्या स्कूल बसेस तेथे आढळून आलेल्या आहेत. माझा प्रश्न असा आहे की, आता बसच्या नंबर प्लेटवर प्लास्टिक पट्टी लावून बसेस फिरविण्यापर्यंत लोकांची हिंमत झाली असेल तर शासन नंबर प्लेटच्या बाबतीत नवीन धोरण जाहीर करणार आहे काय ? तसेच, बसच्या नंबर प्लेटवर प्लास्टिक पट्टी लावणाऱ्यांवर गंभीर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी स्कूल बसेसच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी सांगू इच्छितो की, आरटीओ विभागाने, पोलीस विभागाने या संदर्भात कार्यवाही सुरु केलेली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी जी बाब निदर्शनास आणून दिली ती बरोबर आहे आणि ती म्हणजे, इतर प्रांतातील बसेस किंवा आपल्या भागातील बसेसच्या क्रमांकावर इतर प्रांतातील बसेसचा क्रमांक लावण्याचा जो प्रकार आहे तो निदर्शनास आलेला आहे. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने एसएलपी नं.510/2005 मध्ये उच्च सुरक्षा नोंदणी पट्टी लावण्यासंदर्भात फेब्रुवारी, 2014 मध्ये आदेश दिले असून महाराष्ट्रात मे, 2014 पर्यंत उच्च सुरक्षा नोंदणी पट्टी लावण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत आणि या आदेशाचा सन्मान राखून केंद्रीय मोटर वाहन अधिनियम, 1989 मधील नियम 50 नुसार उच्च सुरक्षा नोंदणी पट्टी म्हणजेच हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट संदर्भातील कार्यवाही तातडीने सुरु करण्यात आलेली आहे. त्यानुसार निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. दरम्यान केंद्रीय विधेयक लोकसभेत मांडले जाणार आहे, यासाठी आपण थांबलो होतो. परंतु, केंद्र शासनाच्या निर्णयाची वाट न पाहता या संदर्भातील निर्णय शासन तातडीने घेईल आणि लवकरात

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते...........

लवकर न्यायालयाने दिलेल्या मुदतीपूर्वी नंबर प्लेट बाबत हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट संदर्भात म्हणजेच उच्च सुरक्षा नेंदणी पट्टी संदर्भात शासन निर्णय घेईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी अत्यंत गंभीर प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचा परिवहन विभाग, पोलीस विभाग आणि आरटीओ विभागाशी संबंध येतो. आरटीओ विभाग परिवहन विभागामध्येच येतो. माझा प्रश्न असा आहे की, ट्रक चोरीला जाण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. चोरीला गेलेल्या ट्रकच्या ओरिजनल रजिस्ट्रेशन नंबरमध्ये फेरफार करुन, ट्रकच्या नंबर प्लेटवर प्लास्टिक पट्टया चिकटवून त्यांचा गैरवापर केला जातो. पोलीस विभाग आणि परिवहन विभाग या संदर्भात कठोर कारवाई करणार आहे काय ? तसेच, हा प्रश्न चंद्रपूर जिल्ह्यातील स्कूल बसेच्या संदर्भातील असला तरी पनवेल, रायगड जिल्ह्यात आणि इतर ठिकाणी देखील स्कूल बसेसचा अशा पद्धतीने वापर केला जातो. अशा वाहनांतून शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा जीव देखील धोक्यात आलेला आहे, अशा प्रकारच्या बातम्या आपण वर्तमानपत्रातून वाचतो. म्हणून शासन शाळेच्या माध्यमातून स्कूल बसेसची अत्कृष्ट व्यवस्था, त्यांची देखभाल, त्यांची चांगली स्थिती आणि चालक व ड्रायव्हर यांच्यासह शासन स्कूल बसेसची उत्कृष्ट व्यवस्था करण्याचा प्रयत्न करणार आहे काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी विद्यार्थ्यांच्या वाहन व्यवस्थेसंदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी सांगू इच्छितो की, अशा प्रकारच्या वाहनांची नोंदणी सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाच्या अंतर्गत करावी लागते. त्यामुळे ती मुलांसाठी उत्तमच असावी लागते. त्यामध्ये सर्व व्यवस्था असावी लागते. ज्या शाळेच्या वाहनांमधून मुले व मुली शाळेत जातात अशा वाहनांमध्ये ड्रायव्हर व्यतीरिक्त इतर नोकर वर्गही ठेवावा लागतो, एवढी काळजी न्यायालयाच्या निर्णयानुसार घ्यावीच लागते. मी आपल्या माहितीकरिता सांगू इच्छितो की, ज्या शाळेने बस लावलेली आहे त्या संदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. आम्ही त्या संदर्भातील छानणी करीत आहोत. ती जबाबदारी शाळेची आहे, का बस मालकाची आहे, या

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते.........

संदर्भात देखील आम्ही लवकरच निर्णय घेऊ. परंतु, मी आपल्या माहितीकरिता एवढेच सांगतो की, शाळेच्या स्वत:च्या मालकीची 7,977 परवानाप्राप्त वाहने आहेत. तसेच, शाळेच्या मालकीच्या व्यतिरिक्त म्हणजे कराराने घेतलेली एकूण 12,732 वाहने आहेत आणि एकूण स्कूल बसेसची संख्या 20,727 आहे. या संदर्भात कायदेशीर तरतूद आहे. परंतु त्यांनी ती घेतलीच पाहिजे असा नियम नाही. तरी देखील ज्या शाळांनी करार केलेले आहेत त्या संदर्भात तरतूद आहे. परिवहन विभागाच्या माध्यमातून या संदर्भातील दक्षता घेतली जाते, छाननी केली जाते व तपासणी केली जाते. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो अशाच पद्धतीचा होता. स्कूल बसचा कॉन्ट्रॅक्ट संपल्यानंतर ती स्कूल बस त्याच भागातील असली पाहिजे, असा दंडक आहे. परंतु, बसच्या नंबर प्लेटवर प्लास्टिक चिकटवून जी बनवाबनवी केली जाते त्या संदर्भात तातडीने कारवाई करण्यात आलेली आहे. मुलांच्या संदर्भातील विषय असल्यामुळे आरटीओ विभाग अतिशय दक्षतेने काम करेल आणि पोलीस विभाग देखील याबाबत दक्षता घेईल, अशी मी ग्वाही देतो.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय श्री.दिवाकर रावते साहेबांकडे परिवहन विभागाचा कार्यभार आल्यानंतर एस.टी. स्पीड पकडेल, असे आपल्याला वाटत होते. परंतु एस.टी.ने अद्याप स्पीड पकडल्याचे दिसत नाही. माननीय मंत्री महोदयांनी हाय सिक्युरिटी नंबर प्लेट संदर्भात उल्लेख केलेला आहे. मी त्यांचे स्वागत करतो. माननीय मंत्री महोदय आपण विरोधी पक्षात असताना या संदर्भात नेहमी आग्रह धरलेला आहे आणि आता सुदैवाने ती संधी आपल्याला प्राप्त झालेली आहे. आपण मघाशी सुप्रीम कोर्टाचा उल्लेख केला. माझा प्रश्न असा आहे की, सुप्रीम कोर्टाने यासाठी राज्य शासनाला मुदत ठरवून दिलेली आहे काय आणि कोर्टाने मुदत ठरवून दिली म्हणून आम्ही हे करीत आहोत असे नाही तर विभागाचे प्रमुख म्हणून आपण याकडे लक्ष देऊन राज्यात हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवियाबाबत केव्हा सुरुवात होणार आहे ?

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाने उच्च न्यायालयात मे, 2014 पूर्वी आम्ही हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवू, अशा प्रकारचे प्रतिज्ञा पत्र सादर केलेले आहे. आपण त्या पलीकडे गेलो तर शासना विरुद्ध अवमान याचिका दाखल होईल. मी सांगू इच्छितो की, मध्यंतरी अधिकाऱ्यांना असे वाटले होते की, आपण केंद्र शासनाच्या आदेशाची वाट बघू. परंतु कोर्टात प्रतिज्ञा पत्र दिलेले असल्यामुळे शासनाविरुद्ध न्यायालयाची अवमान याचिका होऊ नये म्हणून मी या संदर्भातील सूचना दिलेल्या आहेत. या संदर्भातील जी निविदा प्रक्रिया वगैरे सुरु आहे ती लवकर पूर्ण होईल आणि माझी तर अशी इच्छा होती की, एप्रिल महिना संपण्यापूर्वी याची अंमलबजावणी व्हावी. परंतु, ही योजना तातडीने राज्यात अंमलात आणण्यात येईल, असे मी या निमित्ताने आपल्याला आश्वासित करतो.

श्रीमती शोभा फडणवीस : लक्षवेधी सूचनेला दिलेल्या निवेदनात असे नमूद केलेले आहे की, "शासन परिपत्रक दिनांक 30.04.2011 व परिवहन आयुक्त कार्यालयाकडील परिपत्रक दिनांक 13.05.2011 मधील नियमांचे पालन करुन नियमानुसार स्कूल बसची नोंदणी केली जाते. त्यानुसार नोंदणी झालेल्या स्कूल बसेसला परवाना देण्यात येतो." मी सांगू इच्छिते की, विनापरवाना दोन बसेस सापडलेल्या आहेत आणि त्या वाहनांची कागदपत्रे प्रशासनाने तपासली नव्हती. मग त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली ? तसेच, मागील दोन वर्षात चंद्रपूर जिल्ह्यातील 301 वाहनांची तपासणी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये दोषी आढळून आलेल्या स्कूल बसेस 107 आहेत. त्यापैकी 65 निकाली निघालेल्या आहेत आणि त्यांच्याकडून 17,25,350 रुपये दंड वसूल करण्यात आलेला आहे. तर निकाली काढणे म्हणजे केवळ दंड वसूल करणे की त्यांच्यावर काही कारवाई करणे, हे मला कळलेले नाही. तसेच, 107 बसेस पैकी 65 बसेस निकाली काढण्यात आलेल्या आहेत. मग उर्वरित बसेसचे काय झाले ? तसेच, आजही सर्व शाळांमध्ये स्कूल बसेस सुरु आहेत काय ?

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे दोन वाहनांवर कारवाई करुन ती वाहने जप्त करण्यात आलेली आहेत आणि इतर वाहनांच्या संदर्भात दंड वसूल करुन जी अनियमितता आहे ती नियमित करण्याकरिता त्यांना संधी देण्यात आलेली आहे. त्यांच्याकडून पुन्हा अशा प्रकारे अनियमितता झाली तर त्याबाबत नियमानुसार योग्य ती कारवाई केली जाईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. प्रशासनाने परवाना दिला नाही, कागदपत्रे देखील तपासली नाहीत, अशा स्कूल बसेस सुरु होत्या, हे सिद्ध झालेले आहे.

यानंतर श्री.भोगले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस..........

तर अशा प्रशासनातील अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार आहात? त्यांनी तपासणी केलेली नसताना आणि परवानगी दिलेली नसताना या बसेस वाहतूक करीत आहेत. विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळत आहेत.

श्री.दिवाकर रावते : दोन बसेस नंबर प्लेटवर प्लास्टीक पट्टी लावून बेकायदेशीरपणे चालविल्या जात होत्या, त्या जप्त केलेल्या आहेत. त्या व्यतिरिक्त माहिती पुरविण्यात आली तर त्या संदर्भात योग्य ती कारवाई करण्यात येईल.

-------

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**विशेष उल्लेखाच्या सूचना**

**पृ.शी./मु. शी.** : शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळाबाह्य मुलांबाबतची आकडेवारी घोषित करणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडते.

सभापती महोदय, राज्यात शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे प्रत्येक मूल शाळेत दाखल होणे् सक्तीचे असूनही राज्यातील शाळाबाह्य मुलांच्या प्रश्नावरील समिती उदासीन असणे, शाळाबाह्य मुलांची आकडेवारी ही सर्व शिक्षा अभियान व महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक परिषद व शालेय शिक्षण विभाग यांची आकडेवारीवरील तफावत असणे त्यामुळे राज्यातील शाळाबाह्य मुलांची संख्या किती याबाबत संभ्रम निर्माण होणे, त्याकरिता शासनाने शाळाबाह्य मुलांची नेमकी आकडेवारी किती हे घोषित करण्याची आवश्यकता, त्याकरिता विशेष उल्लेखाद्वारे मुद्दा उपस्थित करण्याची अनुमती द्यावी ही विनंती.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : पुणे येथे आयएएस सेवेतील अधिका-याने शाळकरी मुलीशी केलेले अश्लील चाळे याबाबत ॲड.हुस्नबानू खलिफे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.हुस्नबानू खलिफे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडते.

पुणे येथे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी (आयएएस) मारूती सावंत याने चॉकलेट व खाऊचे आमिष दाखवून शाळकरी मुलींना बोलावून अश्लील चाळे केल्याचे माहे 13 मार्च, 2013 रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले. सदरील चार मुली या केवळ 10 ते 12 वयोगटाच्या असल्याचे आढळून आले आहे. सावंत यांच्या चाळ्यांचा त्रास विद्यार्थ्यांना सहन न झाल्याने त्यांनी मंगळवारी होणाऱ्या समुपदेशन तासात हा सर्व अश्लील चाळयांचा प्रकार शिक्षिकेला व मुख्याध्यापिकेला सांगितला. अशा या निरपराध व अल्पवयीन बालकांवर चाळे करणाऱ्या आयएएस अधिकारी यांचेवर कडक कारवाई करण्यात यावी अशी जनतेतून मागणी होत आहे. परंतु त्यांचेवर अद्यापपर्यंत कोणतीही ठोस कारवाई करीत नसल्याने जनतेत तीव्र असंतोषाचे, चिडीचे वातावरण पसरले आहे. तरी संबंधित अधिकारी यांचेवर कडक कारवाई करण्याबाबत मी सभागृहात विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे.

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, ही घटना ज्यावेळी लक्षात आली त्यानंतर पोलिसांनी त्या अधिकाऱ्याला अटक केली. ही माहिती शुक्रवारी सरकारकडे प्राप्त झाली. त्या क्षणाला श्री.मारुती सावंत या भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्याला तत्काळ निलंबित करण्यात आली आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांचे आभार मानते. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांच्याकडे 16 विभाग आहेत त्या विभागांमध्ये समित्या स्थापन करावयाच्या आहेत.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) :** विशेष उल्लेखाच्या सूचनेवर प्रश्न विचारता येणार नाही.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : संकलित होणाऱ्या दुधात होणारी रासायनिक भेसळ याबाबत श्री.संजय दत्त,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"दुभत्या जनावरांकडून अधिक प्रमाणात दूध मिळवण्यासाठी दिली जाणारी हार्मोन्सची इंजेक्शन्स आणि संकलित केल्या जाणा-या दुधात होणारी रासायनिक पदार्थांची भेसळ यामुळे अतिशय विषारी पदार्थाचा शरीरात प्रवेश होतो याचा संपूर्ण मानवजातीवर विशेषतः बालकांच्या प्रकृतीवर घातक परिणाम होत असणे, परिणामी नवीन पिढीची रोगप्रतिकारशक्ती कमी होऊन असंख्य विकार बळावण्याची भीती तज्ज्ञ डॉक्टरांनी व्यक्त केले आहे. भेसळ दुधात युरिया, रंग, डिटर्जंट, कॉस्टिक सोडा, ग्लुकोज, शँपू, डायड्रोजन पॅरॉक्साइडचे मिश्रण टाकून सिंथेटिक दूध तयार केले जात असणे, भेसळयुक्त दुधामुळे डोळयांपासून किडनी, लिव्हर, आतडयांवर परिणाम होतात, हार्टअटॅक, उच्च रक्तदाब असे विकार जडत असणे, गर्भाच्या वाढीसाठी अत्यंत पौष्टिक आहार म्हणून गर्भवती मातांना दूध पिण्याचा सल्ला दिला जातो मात्र अशा दुधात भोसळ असेल तर गर्भवती स्त्री व बाळाच्या संपूर्ण वाढीवर परिणाम होत आहे. दुध भेसळीचे भयानक वास्तव समोर आल्याने या प्रश्नाचे गांभीर्य व व्याप्ती लक्षात घेऊन राज्यशासनाने दुध भेसळीचा प्रश्न सोडविण्यासाठी कार्यवाही करावी अशी मी मागणी उल्लेखाद्वारे करीत आहे.

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : रायगड जिल्हयातील वाळवण नदीचा बांध फुटून भात शेती वायुमिश्रीत झाल्याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"पेण तालुक्यातील (जि. रायगड) वाळवण नदी गांधे गावाजवळून वाहत जाऊन आंबा नदीला मिळणे, दि.23 जुलै 1989 मध्ये या भागात आलेल्या महापुराने या नदीचा बांध फुटून आता फुटलेल्या बांधाचे क्षेत्र सुमारे 45 मीटर लांबीचे झाले असल्याने नदीचे संपूर्ण पाणी भात शेतीत जाऊन भात शेती वायूमिश्रीत झाल्यामुळे सुमारे 100 एकर जमीन नापीक झाली असणे, खारबंदिस्तीला देखील धोका निर्माण झाला असणे, सबब परिसरातील शेतक-यांच्या कुटुंबाना दिलासा देण्यासाठी व शेतीच्या संरक्षणार्थ फुटलेल्या बांधाचे काम त्वरीत हाती घेण्यासाठी शासनाचे लक्ष वेधावे म्हणून मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

-----------

...6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : बेंबळा (जि.यवतमाळ) प्रकल्पग्रस्तांना शासकीय सेवेत सामावून घेणे याबाबत श्री.ख्वाजा बेग,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"यवतमाळ जिल्हयातील बेंबळा नदीवर तयार करण्यात आलेल्या बेंबळा प्रकल्पाकरिता यवतमाळ व अमरावती जिल्हयातील 32 गावातील 10500 हेक्टर जमीन बुडीत क्षेत्रासाठी संपादित केलेली असणे, त्यापैकी 24 गावे विस्थापीतही केली असणे, सदर प्रकल्पाचे काम 2007 साली पूर्ण झाले असूनही आजपर्यंत या विस्थापित 24 गावातील 7000 कुटुंबापैकी कोणालाही अद्यापही कोणत्याही प्रकल्पात काम मिळालेले नसणे, 24 गावातील सर्व कुटुंबे शासकीय लाभापासून वंचित राहणे, याबाबत योग्य तो निर्णय घेवून या बेंबळा प्रकल्पग्रस्तांना तातडीने न्याय देण्यात यावा अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : चर्नी रोड, मुंबई येथील नूतनीकरण केलेल्या तारापोरवाला मत्स्यालयातील 125 मासे मृत झाल्यायाबाबत श्री.प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"मुंबईतील चर्नीरोड येथील अलीकडेच नूतनीकरण केलेल्या तारापोरवाला मत्स्यालयास दररोज सरासरी 4 ते 6 हजार प्रेक्षक भेट देत असतात, आतापर्यंत 70 हजार प्रेक्षकांनी मत्स्यालयास भेट दिल्याचे आढळून येणे, तारापोरवाला मत्स्यालयाची पाहणी करण्यासाठी देशविदेशातून अनेक पर्यटक येत असणे, मात्र मत्स्यालयाचे नूतनीकरण केल्यानंतर 15 दिवसांच्या आत मत्स्यालयातील तब्बल 125 मासे मरण पावल्याने सुमारे साडेतीन ते चार लाख रुपयांचे नुकसान होणे, मत्स्यालय समुद्र किनारी असल्यामुळे समुद्रातील प्रदूषित पाण्यातील रासायनिक घटक प्रक्रिया झाल्यानंतरही पाण्यामध्ये कायम राहत असल्याने शिसेचे प्रमाण वाढल्यामुळे मोठया प्रमाणात मासे मृत्युमुखी पडल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, यासंदर्भात तातडीची उपाययोजना करण्यांत यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

मी या क्षेत्रात अनेक वर्षे काम केलेले आहे. घाईघाईने मत्स्यालय सुरु केल्यामुळे पाण्याचे सीझनिंग केले पाहिजे ते झालेले नाही. जे पॅरामीटर लावले जातात ते न लावता, पाण्याचे सीझनिंग न करता पाणी सोडल्यामुळे असे प्रकार उद्‌भवतात. त्याबाबत खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

-------

...8..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : शालिनी पॅलेस (जि.कोल्हापूर) पर्यटकांना पाहण्यासाठी खुले करण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"कोल्हापूर शहराचा संस्थानिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा सांगणा-या आणि तमाम कोल्हापूरकरांच्या भावनांचे प्रतिबिंब असलेल्या शालिनी पॅलेसला सीलबंद करण्यात येणे, स्थापत्यशास्त्राचा एक उत्कृष्ट नमुना असलेल्या या राजवाडयाला देश-विदेशातील अनेक पर्यटक भेट देत असतात. सदरचे पॅलेस छत्रपती यांनी माजी मंत्री श्री.श्रीपतराव बोंद्रे यांच्या संस्थेला दिले होते. त्यांनी ते शामराव चौगुले या उद्योजकांना विकले. त्या नवीन मालकांनी तेथे पंचतारांकित हॉटेल सुरु केले. ज्या मालकांच्या ताब्यात होते त्यांनी या पॅलेसवर सारस्वत बँकेचे 70 कोटीचे कर्ज काढले, परंतु सदरचे कर्ज न फेडल्याने सध्या हे पॅलेस बँकेच्या ताब्यात असल्याचा फलक तेथे लावण्यात आला आहे. कोल्हापूर महापालिकेच्या हद्दीतील हेरिटेज यादीत शालिनी पॅलेसचा समावेश असला तरी या यादीला अद्याप मान्यता मिळालेली नाही. तरी शासनाने सदरचे पॅलेस पर्यटकांना व आपल्या पुढील पिढीला पाहता यावे, याकरिता या संदर्भात योग्य ती पावले उचलण्याची आवश्यकता असल्याने याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे.

सभापती महोदय, जयप्रभा स्टूडिओचा प्रश्न आला त्यावेळी कोल्हापूरच्या जनतेमध्ये असंतोष पसरला होता. अतिशय महत्वाच्या ऐतिहासिक वास्तू वेगवेगळया कारणासाठी जमीनदोस्त होत असतील, उद्ध्वस्त होत असतील तर सरकारने त्याचे उत्तरदायित्व कशाप्रकारे स्वीकारावे या संदर्भात संनियंत्रण केले पाहिजे, ते होत नाही. मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे सरकारचे लक्ष वेधू इच्छिते.

-----

..नंतर ओ.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त -

"दुभत्या जनावरांकडून अधिक प्रमाणात दूध मिळवण्यासाठी दिली जाणारी हार्मोन्सची इंजेक्शन्स आणि संकलित केल्या जाणा-या दुधात होणारी रासायनिक पदार्थांची भेसळ यामुळे अतिशय विषारी पदार्थाचा शरीरात प्रवेश होतो याचा संपूर्ण मानवजातीवर विशेषत: बालकांच्या प्रकृतीवर घातक परिणाम होत असणे, परिणामी नवीन पिढीची रोगप्रतिकारशक्ती कमी होऊन असंख्य विकार बळावण्याची भीती तज्ज्ञ डॉक्टरांनी व्यक्त केले आहे. भेसळ दुधात युरिया, रंग, डिटर्जंट, कॉस्टिक सोडा, ग्लुकोज, शँपू, डायड्रोजन पॅरॉक्साइडचे मिश्रण टाकून सिंथेटिक दूध तयार केले जात असणे, भेसळयुक्त दुधामुळे डोळयांपासून किडनी, लिव्हर, आतडयांवर परिणाम होतात, हार्टअॅटॅक, उच्चरक्तदाब असे विकार जडत असणे, गर्भाच्या वाढीसाठी अत्यंत पौष्टिक आहार म्हणून गर्भवती मातांना दूध पिण्याचा सल्ला दिला जातो मात्र अशा दुधात भोसळ असेल तर गर्भवती स्त्री व बाळाच्या संपूर्ण वाढीवर परिणाम होत आहे. दुध भेसळीचे भयानक वास्तव समोर आल्याने या प्रश्नाचे गांभीर्य व व्याप्ती लक्षात घेऊन राज्यशासनाने दुध भेसळीचा प्रश्न सोडविण्यासाठी कार्यवाही करावी अशी मी मागणी उल्लेखाद्वारे करीत आहे. ती स्विकृत करण्यात यावी"

----

श्री.जयंत पाटील -

"पेण तालुक्यातील (जि. रायगड) वाळवण नदी गांधे गावाजवळून वाहत जाऊन आंबा नदीला मिळणे, दि.23 जुलै 1989 मध्ये या भागात आलेल्या महापुराने या नदीचा बांध फुटून आता फुटलेल्या बांधाचे क्षेत्र सुमारे 45 मीटर लांबीचे झाले असल्याने नदीचे संपूर्ण पाणी भात शेतीत जाऊन भात शेती वायूमिश्रीत झाल्यामुळे सुमारे 100 एकर जमीन नापीक झाली असणे, खारबंदिस्तीला देखील धोका निर्माण झाला असणे, सबब परिसरातील शेतक-यांच्या कुटुंबाना दिलासा देण्यासाठी व शेतीच्या संरक्षणार्थ फुटलेल्या बांधाचे काम त्वरीत हाती घेण्यासाठी शासनाचे लक्ष वेधावे म्हणून मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : इ.1 ली ते 10 वी वर्गापर्यंतच्या अभ्यासक्रमात शेती विषय शालेय अभ्यासक्रमात घेण्याबाबत श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधून लाखो विद्यार्थी शिक्षण घेण्याचे काम करीत आहेत. त्यांना इ.1 ली ते 10 वी वर्गापर्यंत मराठी, हिंदी, विज्ञान, गणित, इतिहास, भूगोल, नागरीकशास्त्र या महत्वाच्या विषयाबरोबरच इतरही पुरक विषय शिकविले जातात. भारत देश हा कृषि प्रधान देश आहे. या देशातील सामान्य लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय, कारण या शेती व्यवसायाच्या माध्यमातून अन्नधान्याची निर्मिती केली जाते. देशाला लागणा-या साखर व अन्नधान्याचा पुरवठा करण्याचे काम शेती व्यवसायातून केले जाते. म्हणून महत्वाच्या असणा-या या शेती व्यवसायाचा अभ्यास व त्याची ओळख विद्यार्थ्यांना शालेय जिवनातच व्हावी व त्यासाठी शेती हा विषय शालेय अभ्यासक्रमात येणारे शैक्षणिक वर्ष सन 2015-16 पासून समाविष्ट करण्यात यावा, अशी मागणी मी हया विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

या ठिकाणी महसूल मंत्री उपस्थित आहे त्यामुळे त्यांनी यासंदर्भात घोषणा करावी अशी विनंती आहे.

------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** :मुख्याध्यापकांची वेतनवाढ,सेवानिवृत्तीचा लाभ व भविष्यनिर्वाहनिधी उचल व अंतिम प्रदान प्रकरण काढण्याचे अधिकार शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना देण्याबाबत श्री. नागो गाणार, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. नागो गाणार(नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय,राज्यातील शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनातील अंतर्गत वाद किंवा व्यवस्थापन आणि मुख्याध्यापक यांच्यामध्ये निर्माण झालेला वाद, मुख्याध्यापकास वेतनश्रेणी लागू करणे, वरिष्ठ वेतनश्रेणी निवड वेतनश्रेणी लागू करणे व सेवानिवृत्तीचे लाभ मंजूर करण्याबाबतचे अधिकार दिनांक 9 ऑगस्ट, 2010 च्या शासन निर्णयान्वये शिक्षणाधिकारी प्रार्थमिक यांना देण्यात आले आहेत. परंतु त्या शासन निर्णयात मुख्याध्यापकांची वेतनवाढ,सेवानिवृत्तीचा लाभ व भविष्यनिर्वाहनिधी उचल व अंतिम प्रदान प्रकरण काढण्याचे अधिकार देण्यात आलेले नाहीत. हे सर्व अधिकार शिक्षणाधिकारी माध्यमिक यांना दिनांक 6मार्च, 2010 च्या शासन निर्णयाद्वारे देण्यात आलेले आहेत. हेच अधिकार शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना देण्यात यावे अशी लक्षवेधी सूचना सन 2014 मध्ये सादर करण्यात आली होती त्यावेळी शासनाने आपल्या उत्तरात सांगितले होते की, कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. परंतु ही कार्यवाही पूर्ण झालेली नाही. शासन निर्णयात योग्य ती दुरुस्ती तात्काळ करण्यात यावी अशी विनंती आहे.

---------

**तालिका सभापती :** अन्य विशेष उल्लेखाच्या सूचना माननीय सभापती महोदयांनी दालनातच नाकारल्या आहेत. परंतु तरीही दोन तीन सन्माननीय सदस्यांच्या विशेष उल्लेखाच्या सूचना महत्वाच्या असल्यामुळे मी त्यांना आपल्या विशेष सूचना थोडक्यात मांडण्यास परवानगी देत आहे.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : रामेश्वर विद्यालय सिंदखेड, ता. गेवराई या शाळेतील एसटी संवर्गातील काम करणारे सहशिक्षकांनी संस्थाचालकाच्या त्रासामुळे आत्महत्येचा प्रयत्न करणे याबाबत श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, माझ्या मतदारसंघातील गेवराई (जि.बीड) येथील रामेश्वर विद्यालय सिंदखेड, ता. गेवराई या शाळेतील एसटी संवर्गातील काम करणारे श्री. भास्कर दगडू जोगदंड हे सहशिक्षक कायम सेवेत गेल्या 14 वर्षापासून आहेत. तेथील संस्थाचालक त्यांना वारंवार त्रास देत आहेत,पैशांची मागणी करतात, आर्थिक पिळवणूक करीत आहेत. त्यांना देय असलेली वरिष्ठ वेतनश्रेणी, निवड श्रेणी, सेवा पुस्तिका यांचे लाभ त्यांना देण्यात येत नाहीत. वारंवार होणाऱ्या त्रासाला कंटाळून त्यांनी दिनांक 17 मार्च, 2015 रोजी विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असून आज ते बीड येथील दीप हॉस्पिटल मधील आयसीयुमध्ये ॲडमिट आहेत. ते प्राणाशी झ ूंज देत आहेत. यासंदर्भात शिक्षणाधिकाऱ्यांकडे तक्रार करुन सुध्दा शिक्षणाधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही. शिक्षणाधिकाऱ्यांनी दखल घेतली असती तर ही वेळ या शिक्षकावर आली नसती. त्यामुळे शिक्षणाधिकारी सुध्दा यामध्ये दोषी असल्यामुळे शिक्षणाधिकऱ्यावर कारवाई करावी तसेच संसाचालकांवरही कारवाई अशी या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने मागणी करतो.

**तालिका सभापती** (श्री. रामनाथ मोते ): शासनाने याबाबत दखल घ्यावी.

श्री. एकनाथराव खडसे : दखल घेण्यात आली आहे.

-----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** :येरवडा तुरुंगात वेड लागलेले नसतांना मनोरुग्ण म्हणून दाखल करुन घेणे याबाबत श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

विशेष उल्लेखाची सूचना नाकारली गेल्यानंतरही आपण मला संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. राज्यात मनोरुग्णांची संख्या सातत्याने वाढत चालली आहे. त्यांच्यावर उपचार करण्यासाठी सरकारी मनोरुग्णालयाच्या संख्या मर्यादित आहेत. त्याबरोबरच एकूण उपचारासाठी दाखल होणाऱ्या रुग्णांची काळजी घेण्याची व्यवस्था अपूरी आहे. या रुग्णालयामध्ये आता अनिष्ठ पध्दती सुरु झाल्याचे दिसून येत आहे. पुण्यातील येरवडा इस्पितळात वेड लागलेले नसताना सुध्दा तेथील कर्मचाऱ्यांना हाताशी धरुन एका युवकाला जबरदस्तीने दाखल करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आलेली आहे. मध्यस्थी व्यक्ती पैसे देऊन असे उद्योग करीत असतात.वास्तविक मानसोपचार तज्ज्ञांच्या तपासणी नंतरच योग्य निदान आवश्यक असतात. या प्रक्रियेविना अशा तऱ्हेने आजारी नसलेल्यांना डांबून ठेवण्यासाठी हा सर्व प्रकार केला जात आहे. या बाबतीत सार्वजनिक आरोग्य खात्याने सरकारी मनोरुग्णालयांची सध्याची अवस्था तातडीने तपासण्याची आवश्यकता आहे. या विषयाच्या बातम्या सातत्याने सगळीकडे येत आहेत त्यासंदर्भातील चुकीच्या गोष्टी तातडीने थांबवलया जातील याकडे शासनाने तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे अशी सूचना मी या विशेष उल्लेखाद्वारे मांडीत आहे.

---------

....5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : गडचिरोली जिल्हा परिषदेने जीवन प्राधिकरण योजनेचे संपूर्ण कर्ज तसेच व्याज माफ करण्याबाबत श्री. मितेश भांगडिया, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. श्री. मितेश भांगडिया,( वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, गडचिरोली जिल्हा हा अतिदुर्गम नक्षलप्रभावित आदिवासी जिल्हा म्हणून राज्यात ओळखला जातो. हा जिल्हा अतिदुर्गम, नक्षलप्रभावित व आदिवासी जिल्हा असल्यामुळे जिल्हयात स्थानिक कोणताही मोठा उद्योग अस्तित्वात नाही. गडचिरोली नगरपरिषदेला स्थानिक कराव्यतिरिक्त दुसरे कोणतेही मोठे स्त्रोत उपलब्ध नाही. नगरपरिषदेने नगराच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेकरिता सन 1998-1999 साली महाराष्ट्र जीवन प्राधिकारी विभाग, मुंबई यांचेकडून 4.20 कोटी रुपयांचे कर्ज घेतलेले आहेत. यापैकी नगरपरिषदेने 30 लक्ष रुपयांचा भरणा केलेला आहे. नगरपरिषदेची कर्जाची परतफेड करण्याकरिता उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांची प्रचंड ओढाताण होत आहे. कर्जाची परतफेड न झाल्यामुळे मुळ रक्कमेवर व्याज व व्याजावर व्याज लावून आज हे कर्ज खूप वाढलेले आहे. अतिदुर्गम, नक्षलग्रस्त व आदिवासी जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या जिल्हयातील गडचिरोली नगरपरिषदेची आजची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन सदर पाणी पुरवठयाकरिता घेतलेले कर्ज संपूर्णपणे माफ करावे किंवा संपूर्ण व्याज माफ करावे. नगरपरिषदेचे उत्पन्न वाढण्याकरिता नगरपरिषदेअंतर्गत वसूल होणाऱ्या आरटीओ मार्फत येणाऱ्या सर्व करातील काही टक्के भाग नगरपरिषदेकडे वळता करावा यासोबत नगरपरिषदेमार्फत दिवाबत्ती तसेच पाणी पुरवठयाकरिता लागणाऱ्या विद्युत खर्चावर विशेष सुटीचे प्रयोजन करावे त्यामुळे नगरपरिषदेचा दिवाबत्ती व पाणी पुरवठयावर होणारा प्रचंड खर्च काही प्रमाणात कमी होईल. याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी विनंती या विशेषे उल्लेखाद्वारे करीत आहे.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : आता अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चेला सुरुवात करण्यात येईल.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, विधान परिषदेत एकही बिल मंजूर झालेले नाही. त्यामुळे रोज एक दोन बिलावर चर्चा झाली तर बिले होऊन जातील.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आज अर्थसंकल्पावरील चर्चा प्रश्नोत्तराच्या तासानंतर सुरु व्हावयास पाहिजे होती. बजेटवर बऱ्याच सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. आता दुपारचे 4.38 झालेले आहेत. आज बजेटवर 10-12 सदस्य बोलतील व राहिलेले सदस्य उद्या बोलतील. 12 सदस्य बोलल्यानंतर 4 बिले घेतली तर ते कसे काय पूर्ण होऊ शकतील. सर्व बाबी वेळेमध्येच संपल्या पाहिजेत. सदन व्यवस्थित चालविण्याची जबाबदारी शासनाची आहे. आजच्या आज 4 बिले घेऊन सदनाला वेठीस धरणे बरोबर नाही. आम्हाला सुध्दा बिलावर बोलावयाचे आहे.

**तालिका सभापती :** माननीय सभापती महोदय निर्देश देतील त्यानुसार बिलावर चर्चा घेतली जाईल. आता अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला सुरुवात करण्यात येत आहे.

---



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:**अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.:**सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**तालिका सभापती :** आज पासून अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस प्रारंभ होईल. ही चर्चा आज व उद्या दिनांक 24 मार्च, 2015 अशी एकूण दोन दिवस होणार आहे. चर्चेसाठी एकूण जो वेळ उपलब्ध होईल त्यापैकी वित्त मंत्र्यांच्या उत्तरासाठी असलेला एक तास जमेस धरुन निम्मा वेळ सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांकरिता आणि निम्मा वेळ विरोधी पक्षाचे सदस्य व स्वतंत्र सदस्यांना देण्यात येईल. या चर्चेत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपली नावे व ते ज्या तारखेस बोलू इच्छितात ती तारीख आपल्या प्रतोदांमार्फत माझ्याकडे त्वरित पाठवावी. आता माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

यानंतर श्री.अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, सन 2015-2016 या वर्षाचा अर्थसंकल्प माननीय अर्थ मंत्र्यांनी मांडला त्यास विरोध करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय अर्थमंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी खालच्या सभागृहात शेरोशायरीने अर्थसंकल्प मांडला. त्यांचा अर्थसंकल्प मांडतानाचा उत्साह आम्ही टी.व्ही.वर पाहिला. पण तोच उत्साह या सभागृहात राज्यमंत्री महोदयांनी अर्थसंकल्प मांडताना कोठेही दिसला नाही.

सभापती महोदय, माननीय अर्थमंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार हे खालच्या सभागृहात विशेष उत्साहाने अर्थसंकल्प मांडताना दिसत होते तर या सभागृहात अर्थराज्यमंत्री निरूत्साहात अर्थसंकल्प मांडत होते. याचे कारण माझ्या लक्षात आले की, राज्यामध्ये सत्तांतर होऊन दोन पक्षांनी एकत्र येऊन सरकार स्थापन केले, त्या दोन पक्षांमध्ये कोठेही समन्वय नाही आणि अर्थसंकल्पातसुद्धा कोठेही वाटघाटी झाल्याचे दिसून आले नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री श्री.दीपक केसरकर हे आमच्या पक्षात होते. तरी सुद्धा एवढ्या छोट्या कालावधीत शिवसैनिक झालेले श्री.दीपक केसरकर अर्थसंकल्प मांडताना निरूत्साह दिसत होते म्हणजे त्यांच्यावर शिवसेना संघटनेचा प्रभाव दिसत होता.

सभापती महोदय, श्री.दीपक केसरकर यांच्या जागी दुसरा कोणताही जुना शिवसैनिक असता आणि त्यांच्या हातामध्ये वरच्या सभागृहात अर्थसंकल्प मांडण्यासाठी दिला असता तर त्यांनी या अर्थसंकल्पाला विरोध केला असता किंबहुना त्यांनी या सभागृहात तो अर्थसंकल्प मांडला देखील नसता. मी हे सर्व सांगण्याचे कारण म्हणजे या अर्थसंकल्पावर सत्ताधारी मित्रपक्षाकडून जे काही बोलले गेले ते टी.व्ही.वर महाराष्ट्राने पाहिलेले आहे. मी या अर्थसंकल्पाला विरोध करण्यासाठी उभा आहे त्याचे पहिले कारण म्हणजे हा अर्थसंकल्प पोकळ आहे, या अर्थसंकल्पामध्ये काहीही नाही. दुसरे कारण म्हणजे या अर्थसंकल्पाला सत्ताधारी पक्षातील मित्रपक्षांनी विरोध केलेला आहे.

सभापती महोदय, हा अर्थसंकल्प वाचल्यानंतर मला ज्ञानेश्वरीतील ओवी आठवतात.

"कणेवीन शोपडे कणसे लागली अति घनदाटे, काय करावे गोमटे ओस न गळे "

याचा अर्थ असा की, "मोठे पीक आले. त्यास मोठमोठी कणसे आली. पण त्या कणसामध्ये दाणाच नाही" असा हा अर्थसंकल्प आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

सभापती महोदय,पंधरावर्षानंतर एखादा पक्ष सत्तेवर येतो. सत्तेमध्ये आल्यानंतर विधिमंडळातील एका सदस्यावर अर्थमंत्री पदाची जबाबदारी येऊन ते विधिमंडळात पहिला अर्थसंकल्प मांडतात. राज्याला अर्थसंकल्प संबोधित करीत असताना तो अर्थसंकल्प किती चांगला आहे, हे सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न करतात. तसाच प्रयत्न या ठिकाणी झालेला आहे. "एखादे नवसाने पोर व्हावे आणि मुके घेऊन मरावे" असा हा अर्थसंकल्प आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये जे काही दिलेले आहे ते सर्व चिन्हांकित आहे. असा चिन्हांकित अर्थसंकल्प यापूर्वी इतिहासात मांडला गेला नाही. या अर्थसंकल्पामध्ये काय काय चिन्हांकित आहे ते सांगतो. देशी बी-बियाणांचे संवर्धन व जतन करण्यासाठी 10 कोटी रूपये चिन्हांकित, पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेसाठी 200 कोटी रूपये चिन्हांकित, बस स्थानकाच्या नूतनीकरणासाठी 125 कोटी रूपयें चिन्हांकित. तीर्थक्षेत्र विकासासाठी 125 कोटी रूपये चिन्हांकित, कामठी जिल्हा नागपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी 10 कोटी रूपये चिन्हांकित, किल्ल्यांचे जतन व संवर्धनासाठी 50 कोटी रूपये चिन्हांकित, मार्गस्थ सुविधेसाठी 50 कोटी रूपये चिन्हांकित, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, गोरेवाडा आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रकल्पांच्या विकासाठी 100 कोटी रूपये चिन्हांकित, श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेसाठी 25 कोटी रूपये चिन्हांकित, संधाधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना 25 कोटी रूपये चिन्हांकित, जे.जे.स्कूल ऑफ आर्ट, मुंबई व इतर कला महाविद्यालयांच्या आधुनिकीकरणासाठी 10 कोटी रूपये चिन्हांकित, केंद्रीय नागरी सेवा परीक्षार्थीना प्रोत्साहन व जिल्हा मुख्यालयी अभ्यासिकेसाठी 20 कोटी रूपये चिन्हांकित, वैद्यकीय महाविद्यालयांच्या इमारतींच्या बांधकामासाठी, 100 कोटी रूपये चिन्हांकित, महिला बचत गटांच्या सक्षमीकरणासाठी 200 कोटी रूपये चिन्हांकित, माझी कन्या भाग्यश्री योजनेसाठी 200 कोटी रूपये चिन्हांकित, हुतात्मा स्मारकांच्या दुरूस्तीसाठी व क्रांतीवीरांच्या स्मृतींचे जतन करण्यासाठी 25 कोटी रूपये चिन्हांकित,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

थोर व्यक्तींच्या स्मारकांसाठी 20 कोटी रुपये चिन्हांकित, परमवीर चक्र वीरांच्या स्मारकासाठी 5 कोटी रुपये चिन्हांकित, एशियाटिक ग्रंथालयाचे डिजिटायझेशन करण्यासाठी 5 कोटी रुपये चिन्हांकित या एकूण 19 गोष्टी चिन्हांकित स्वरुपात आहेत.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

सभापती महोदय, अर्थसंकल्पामध्ये रक्कम चिन्हांकित करताना सरकारने अर्थसंकल्पामध्ये ज्या योजना नमूद केलेल्या आहेत किंवा नियतव्यय ठेवला आहे त्या बाबत सरकारला माहिती नाही, किंबहुना त्या योजना सरकारला माहीत नाहीत, असा त्याचा अर्थ होतो. हा अर्थसंकल्प मांडल्यानंतर आम्ही सर्वांना सांगत होतो की, हा अर्थसंकल्प दिशाहीन आणि चिन्हांकित आहे. या अर्थसंकल्पातून महाराष्ट्रातील जनतेला काही मिळेल असे जर राज्यातील सत्ताधाऱ्यांना वाटत असेल तर तेच मुळात प्रश्नांकित आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पाच्या बाबतीत प्रथम असे सांगण्यात आले की, राज्यातील शेतकऱ्यांना सावकारांपासून मुक्त करण्यात येईल. त्यासाठी 171 कोटी रुपये अदा करुन 2 लाख 23 हजार शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. महोदय, या सरकारकडून शेतकऱ्यांना सावकारमुक्त करण्यात येईल असे सांगितले जात असले तरी आपण बेरीज-वजाबाकी केली तर, केवळ 7 हजार रुपयांचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. मी तर म्हणेन की, राज्य सरकारला सावकारांचे कर्ज फेडता येत नाही. मी यापूर्वी सभागृहात सांगितले होते त्यावर ठाम आहे आणि आजही अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवर बोलत असताना ठाम आहे. यापूर्वी सावकारांना जे परवाने दिले आहेत त्या प्रत्येक परवान्यावर सावकारांकडून शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्ज देता येणार नाही असे स्पष्टपणे नमूद केले आहे. तरी सुध्दा या सरकारने अशा शेतकऱ्यांचा 2 लाखांच्या वर आकडा काढला आहे. शिवाय मंत्रिमंडळाच्या बैठकीत सदरहू कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात या संदर्भातील उल्लेख करण्यात आला होता. तद्नंतर या बाबतीत मी माहितीच्या अधिकारान्वये माहिती मागविली. दिनांक 22 फेब्रुवारीपर्यंत या राज्य सरकारने या कर्जमुक्ती संदर्भात कसल्याही प्रकारची कार्यवाही केली नाही हे माहितीच्या अधिकारातून सरकारच्या वतीने मला स्पष्टपणे सांगण्यात आले. आजपर्यंत राज्य सरकारने कोणत्या शेतकऱ्यांना सावकारांपासून मुक्त केले आहे ? महोदय, कधी कधी वाईट वाटते की, हा अर्थसंकल्प एका सावकाराने, राज्यातील सावकारांसाठी मांडला आहे की काय ?

महोदय, मागच्या सरकारच्या अर्थसंकल्पापेक्षा चांगला अर्थसंकल्प मांडल्याचे सुध्दा सांगितले गेले. महोदय, माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे वारंवार सांगायचे की, राज्यावर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

कर्जाचा फार डोंगर आहे. अर्थसंकल्पात राज्यावरील कर्ज 3 लाख 477 कोटी असल्याचे

..2..



श्री.धनंजय मुंडे....

सांगण्यात आले. या वर्षीच्या अर्थसंकल्पात सांगण्यात आले की, राज्यावर कर्जाचा नव्याने बोजा पडणार आहे. तो बोजा 33,160 कोटींचा पडणार आहे. महोदय, हे सरकार एका बाजूला आमच्यावर आरोप करते की, आम्ही राज्यावर कर्जाचा डोंगर उभा केला आहे आणि दुसऱ्या बाजूला हे सरकार केवळ चार महिन्यात 33,160 कोटी रुपये कर्ज काढत आहे. परंतु हा उल्लेख करण्याचे सरकार विसरले आहे. आमच्या सरकारने घेतलेल्या कर्जाच्या 10 टक्के कर्ज हे सरकार केवळ सहा महिन्यात घेत आहे. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर साहेब, या सरकारकडून जर चार महिन्यात 33,160 कोटी रुपये कर्ज घेतले जाणार असेल तर येत्या पाच वर्षात हे सरकार अजून किती कर्ज घेणार आहे ? मला वाटते कोणावरही आरोप करताना जाणीवपूर्वक केले पाहिजे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पाचे अवलोकन केले तर 2014-15 चा विकास कामांवरील खर्च हा सुधारित अंदाजाच्या तुलनेत 1 कोटी 55 लाख 469 हजार रुपये आणि 2015-16 च्या अर्थसंकल्पात 1 कोटी 56 लाख 169 हजार रुपये आहे. यावरुन आपल्या लक्षात येईल की, या वर्षीच्या अर्थसंकल्पात विकास कामांवरील खर्च अत्यंत किरकोळ आहे. हा खर्च 0.45 टक्के आहे. निवडणुकीपूर्वी या सत्ताधारी पक्षाकडून सांगण्यात आले होते की, आमच्या हातात सत्ता दिल्यानंतर आम्ही महाराष्ट्राचा विकास करु. परंतु या सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पात विकास कामांवरील खर्च केवळ 0.45 टक्के आहे. त्यातल्या त्यात या अर्थसंकल्पात सर्वात मोठी चूक अशी झाली की, 2014-15 मध्ये नॉन प्लॅन खर्च 75,463 हजार कोटी रुपये होता. 2015-16 च्या अर्थसंकल्पात तो खर्च 86,846 कोटी रुपये दाखविण्यात आला आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पात विकास कामांवरील खर्च 0.45 टक्के आणि विकासेत्तर योजनांवरील खर्च 15 टक्के आहे. इतक्या कमी प्रमाणावर तरतूद केली असेल तर आम्ही या अर्थसंकल्पावर किंबहुना घोषणांवर कसा विश्वास ठेवायचा, अशा प्रकारे तरतूद केल्यास हे सरकार महाराष्ट्राचा विकास कसा करणार आहे ? महोदय, ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे. सबंध राज्यातील जनतेने अती विश्वास टाकून या सरकारला सत्तेवर बसविले. पण गेल्या चार महिन्यात एखाद्या सरकारच्या विरोधात इतका प्रचंड

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

असंतोष निर्माण व्हावा हा या महाराष्ट्राचा आजचा इतिहास आहे. मी सत्ताधारी पक्षाच्या

..3..



श्री.धनंजय मुंडे....

सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी 'बाप रे' असे म्हणू नये. आपल्यावर भविष्यात 'अरेरे....' असे म्हणण्याची वेळ येऊ नये या काळजीने मी हे सांगत आहे.

सभापती महोदय, राज्याच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांचे म्हणणे आम्ही ऐकत होतो की, आम्ही या अर्थसंकल्पात राज्याच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी नाविन्यपूर्ण योजना आणणार आहोत. अर्थसंकल्पामध्ये नाविन्यपूर्ण योजनेच्या बाबतीत असा उल्लेख करण्यात आला आहे की, "जमिनीच्या वापरातील बदल, अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक, इत्यादीसाठी प्रचलित बाजारभावाच्या आधारे प्रिमियम फी आकारुन अतिरिक्त निधी प्राप्त करण्याचा प्रयत्न केला आहे." महोदय, यात नवीन काय आहे ? आघाडी सरकारने या बाबतीत कर वाढवून 1300 कोटी रुपये उभे केले होते. त्यामुळे या योजनेमध्ये नवीन असे काहीच नाही.

महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात नमूद केले की, राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये राज्याचे उत्पन्नाचे रिसोर्सेस वाढविण्यासाठी काही अपारंपरिक साधने जसे जमीन वापरातील बदल, अतिरिक्त एफएसआयच्या रुपात शासनाकडे प्रिमियम जमा करणे, यासारखी नाविन्यपूर्ण उत्पन्नाची साधणे वापरणार. अर्थसंकल्पाच्या सुधारित अंदाजाप्रमाणे शासनास मागील आर्थिक वर्षात सुमारे 1,550 कोटी रुपये मिळाले.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

आर्थिक वर्षात 5 हजार कोटी रूपये मिळतील असे सांगितले आहे. आपण वाढविलेला एफएसआय देऊन पैसे घेणार आहात. मात्र याचा प्रत्यक्ष बोजा सामान्य ग्राहक जे फ्लॅट खरेदी करणार आहेत त्यांच्या खिशावर पडणार आहे. चटई क्षेत्राच्या बाबतीत सर्वाधिक कर मुंबई, पुणे, नाशिक येथून येतो. निवडणुकीच्या काळात ज्या जनतेने तुमच्यावर सर्वाधिक प्रेम केले त्याच जनतेचा तुम्ही पहिल्यांदा विश्वासघात केला आहे. आपण करात वाढ करून फ्लॅटच्या किंमती वाढवून टाकल्या आहेत. आपण एफएसआयच्या माध्यमातून पैसे गोळा करीत आहात. परंतु आपण सामान्य ग्राहकाला मारत आहात याचा आपणास विसर पडला आहे.

सभापती महोदय, उत्पन्नाच्या बाबतीत एक महत्त्वाची गोष्ट आहे. किती विपर्यास आहे हे आपणच पहा. राज्याच्या उत्पन्नाचे स्त्रोत सुचविणाऱ्या, राज्याच्या खर्चाच्या संदर्भात बचतीच्या उपाययोजना सुचविणाऱ्या कल्पक अधिकारी/कमचारी यांना प्रोत्साहन अनुदान देण्याची योजना अर्थसंकल्पात आहे. सभापती महोदय, तुमच्या कथनी व करणी यामध्ये किती फरक आहे. तुमच्यातील हा फरक 4 महिन्यांत दिसून आला आहे.

सभापती महोदय, वैद्यमापन विभागाचे प्रभारी अधिकारी श्री. संजय पांडे यांनी 3-4 महिन्यांत या विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करून क्षेत्रफळ चोरणाऱ्या विकासकांना अटकाव केला, तेल कंपन्यांच्या बाबतीत खाजगीरित्या कॅलिबरेशन करण्यास प्रतिबंध केला. त्यामुळे सरकारच्या महसुलात वाढ झाली. परंतु शासनाने चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्याला 3 महिने सुध्दा पदावर बसू दिले नाही. आता त्यांची बदली केली आहे. ही तुमची प्रोत्साहनपर योजना आहे का ? अधिकारी सरकारचे कराच्या रूपाने उत्पन्न वाढवितो आणि त्याच अधिकाऱ्याची तुम्ही 4 महिन्यात बदली करता. सभागृहाला माहिती मिळाली पाहिजे की, कोणत्या बिल्डर लॉबीच्या दबावाखाली श्री. संजय पाडे यांची 4 महिन्यांत बदली झाली, प्रोत्साहनपर योजना अशी असते का ? ती बदली असलेल्या पदापेक्षाही कनिष्ठ दर्जाच्या पदावर करण्यात आलेली आहे. कथनी व करणीमधील सरकारचा फरक मला सभागृहात लक्षात आणून द्यायचा आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

सभापती महोदय, अनेक जणांनी शेतकऱ्यांच्या बाबतीत अर्थसंकल्पात केलेल्या उपाययोजनांच्या संदर्भात टीका केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंबंधी अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही अशी टीका करण्यात आली. हिवाळी अधिवेशनात दुष्काळग्रस्त भागांसाठी 4 हजार कोटी रूपयांची तरतूद केली. 4800 कोटी रूपयांची मागणी आहे. मात्र तरतूद 4 हजार कोटी रूपयेच आहे. अर्थसंकल्पात 4 हजार कोटी रूपयांचाच विषय आहे. सरकार सांगत आहे की, आम्ही 4 हजार कोटी रूपये वाटप केले. माझे म्हणणे असे आहे की, दुष्काळी भागाच्या संदर्भात प्रशासनाकडून आलेली मागणी 4800 कोटी रूपयांची आहे. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना 800 कोटी रूपये अजून द्यायचे आहेत. मात्र त्याची सुध्दा अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली नाही. शेतकऱ्यांनी तुम्हाला मते दिली नाहीत का, शेतकरी म्हणून त्यांना जगू द्यायचे नाही का ? आज त्यांच्यावर अस्मानी संकट आले आहे. सरकार म्हणून आपली काहीच जबाबदारी नाही का ? आपण जबाबदारी घेतली आणि 45 रूपये प्रति गुंठा याप्रमाणे 4 हजार कोटी रूपये दिले. एवढी अशा स्थितीत इतकी तुटपुंजी रक्कम पूर्वी कधीही सरकारकडून देण्यात आली नाही. उर्वरित 800 कोटी रूपयांच्या बाबतीत राज्य सरकार काय करणार आहे, गारपीट, अवकाळी पाऊस यामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान या संदर्भात सरकार काय मदत जाहीर करणार आहे ? सभापती महोदय, दुर्दैव आहे. अधिवेशन सुरू आहे. सभागृहाचा नियम आहे की, अधिवेशन सुरू असताना कोणत्याही माननीय मंत्र्यांनी बाहेर घोषणा करायची नसते. परंतु आज ट्विट करण्याची शर्यत सुरू आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी ट्विट केले की माननीय महसूल मंत्र्यांना ट्विट करावेसे वाटते. सरकारमध्ये अशी पध्दत सुरू आहे. सभागृहाचे माननीय नेते श्री. एकनाथ खडसे साहेबांनी ट्विट केले आणि सांगितले की, ग्रारपिटग्रस्तांना अशा पध्दतीने अमुक एवढी मदत जाहीर केली आहे. आता याला काय म्हणायचे, हा कोणता भंग म्हणायचा ? टिव टिव झाली आहे. सभागृह सुरू असताना माननीय मंत्र्यांनी बाहेर घोषणा करणे हा सभागृहाचा अपमान आहे. सन्माननीय सदस्य

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

श्री. कपिल पाटील यांनी सांगितले की, ब्रिटिश पार्लमेंटमध्ये अर्थमंत्र्यांना या संदर्भात राजीनामा द्यावा लागला होता. माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी ही घोषणा केली आहे. सरकारचे कामकाज असे चालले आहे. सदनात घोषणा करायची होती, आमचे त्याबद्दल म्हणणे नव्हते. अर्थसंकल्पात तरतूद नाही त्यासंबंधी विषय नाही. मात्र ट्विट करून घोषणा केली जाते. मला सांगा की, कोणत्या शेतकऱ्याचे ट्विटरचे अकाऊंट आहे आणि कोणते शेतकरी माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांना फॉलो करीत आहेत ? एवढा उतावीळपणा काय झाला होता, काय गरज होती ?

सभापती महोदय, शेतकऱ्यांना जरूर मदत केली पाहिजे. गारपीट झालेल्या भागातील सामान्य शेतकरी होरपळत आहे, त्याला सरकारकडून मदत मिळाली पाहिजे, ती मदत फक्त ट्विव करून नको. माननीय मुख्यमंत्र्यानी, सभागृहाच्या माननीय नेत्यांनी ट्विट करून केलेली एकही घोषणा बरोबर नाही. सर्व घोषणा असत्य आहेत. मेट्रो रेलच्या दरवाढीच्या बाबतीत एक समिति गठीत करायची होती. मुंबईमध्ये याची फार मोठी चर्चा सुरू झाली. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांकडून त्याच क्षणी लगेच ट्विट आले की, आम्ही पद्मनाभन समिती गठीत केली आहे, प्रस्ताव पाठविला आहे. सभापती महोदय, माहितीच्या अधिकारात काही लोकांनी याबाबतची माहिती घेतली. माननीय मुख्यमंत्र्यांनी ट्विट केले त्या दिवसापर्यंत कोणतीही समिती गठीत झाली नव्हती. फक्त ट्विट झाले होते. 21 व्या शतकात त्या सर्व गोष्टी असाव्यात पण त्यामध्ये फसवणूक नसावी. राज्याच्या जनतेची फसवणूक होत आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागास 7272 कोटी रूपये एवढा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला, यातून 38 सिंचन प्रकल्प पूर्ण करून, 59 हजार क्षेत्र सिंचनाखाली येईल असे सांगितले आहे. 7272 कोटी रूपयांची राणा भीमदेवी थाटात गर्जना केली आहे. माननीय राज्यपालांचे निर्देश पहिले तर असे दिसेल की, अंतिम नियतव्यय वाटपाची रक्कम 5261 कोटी रूपये आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे........

त्यामध्ये 7272 कोटी रुपये आस्थापनेवरील खर्चाचा देखील समावेश आहे. हा खर्च एकूण रकमेच्या जवळ जवळ 60 टक्के एवढा आहे. अर्थसंकल्पात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या 7800 कोटी रुपये खर्चासाठी शासनाने 38 प्रकल्प निवडलेले आहेत. ते कोणते प्रकल्प आहेत ? त्या 38 प्रकल्पांबाबतची माहिती का देण्यात आली नाही ? सरकार स्थापन होऊन चार महिने होऊन सुध्दा अद्याप सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या नाहीत. 38 प्रकल्पांनाही सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेल्या नाहीत, हे मी जबाबदारीपूर्वक सांगत आहे. त्यामुळे अर्थसंकल्पात कोणत्या 38 प्रकल्पांसाठी तरतूद करण्यात आली आहे, हे देखील आम्हाला समजले पाहिजे. त्याबरोबरच येत्या वर्षात या 38 प्रकल्पांवरच निधी खर्च होईल की, दुसरीकडे वळविला जाईल, याबाबतची साशंकता ज्यांनी अर्थसंकल्प बघितला आहे, त्या सर्वांच्या मनात आहे.

सभापती महोदय, इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी घरकुल योजना या अंतर्गत 1 लाख घरे बांधण्याचे शासनाचे लक्ष असून नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन स्वच्छतागृहासह उत्तम प्रतीची घरकुले बांधण्याचा शासनाचा मानस आहे आणि त्यासाठी सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पात 884 कोटी 46 लक्ष रुपये एवढा नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. शासनाचे एकूण उद्दिष्ट आणि उपलब्ध करुन दिलेली तरतूद याचा हिशेब मात्र आम्हाला लागत नाही. एकीकडे आघारी सरकार असताना याच योजनेमध्ये प्रति घरकुल दीड ते पावणे दोन लाख एवढा निधी लाभार्थ्यांना देण्यात येत होता. आता तर शासनाने शौचालयाचा समावेशही केला आहे. निश्चितपणे शौचालयाचा समावेश करणे गरजेचे आहे. शौचालयाबरोबर नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ही कामे करण्यात येणार आहेत. नवीन तंत्रज्ञान याचा अर्थ रेडिमेड शौचालय बसविण्यात येणार आहेत का, हे सर्व गुजरात मॉडेल आहे का, नवीन तंत्रज्ञान गुजरातवरुन येणार आहे का ? सरकारने अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीचा हिशेब करता आघाडी सरकार प्रति लाभार्थी जेवढे अनुदान देत होते, तेवढे अनुदान लाभार्थ्यांना मिळणार नाही, अशी परिस्थिती आहे. आपणच याचा हिशेब करावा. ही रक्कम एक लाखाच्या आत येते. केवळ 70 ते 80 हजार रुपयांमध्ये घरकुल कसे उभे राहणार आहे ? या योजनेमध्ये शौचालयासहीत घरकुल देण्याबाबत

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे........

शासनाने जेवढे उद्दिष्ट जाहीर केले आहे, ते अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीमध्ये पूर्ण होणार नाही. शासनाचे 1 लाख घरे एवढे उद्दिष्ट असेल आणि ते जर अर्थसंकल्पीय तरतुदीत पूर्ण करावयाचे असेल तर प्रति घरकुल घराची किंमत कमी करावी लागेल, असा संशय आमच्या मनामध्ये आहे. इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी घरकुल योजना या योजना समाजातील सर्वात शेवटच्या माणसांसाठी आहेत. त्यामुळे अर्थसंकल्पात जेवढी तरतूद केली आहे, त्यापेक्षा जास्त खर्च आला तर सरकार तो निधी उपलब्ध करुन देईल आणि ज्या प्रमाणे आघाडी सरकार प्रति लाभार्थी पावणे दोन लाख रुपये देत होती, त्या पध्दतीने अनुदान देऊ, अशा प्रकारे शासनाने आश्वस्त केले पाहिजे. शौचालयासहीत घरकुल उभे राहिले पाहिजे, असा आमचाही आग्रह आहे. आमचीही योजना तशीच होती. भीती मनात ही आहे की, प्रति लाभार्थी अनुदान कमी झाले तर लाभार्थ्यांचे फार मोठे नुकसान होणार आहे.

सभापती महोदय, झोपडपट्टीधारक आणि मध्यमवर्गीयांना परवडणारी घरे उपलब्ध व्हावीत, या दृष्टीने नवीन गृहनिर्माण धोरण शासन आणणार आहे. हा फार महत्त्वाचा विषय आहे. सन 2022 पर्यंत कुणीही घराविना राहणार नाही, असेही शासनाने अर्थसंकल्पीय भाषणात म्हटले आहे. हा विषय मुंबईशी संबंधित असून अतिशय महत्त्वाचा आहे. यापूर्वी म्हाडामार्फत अनेक योजना राबविल्या जात होत्या. एसआरअे स्किम्स एसआरअे प्राधिकरणाकडून राबविल्या जात होत्या. म्हाडाच्या स्किम्स म्हाडा प्राधिकरणामार्फत राबविल्या जात होत्या. आता मात्र म्हाडामार्फत राबविल्या जाणाऱ्या स्किम्स एसआरअे प्राधिकरणामार्फत राबविल्या जातील, असे सांगितले गेले आहे. याबाबतीत माझा असा स्पष्ट आरोप आहे की, म्हाडाच्या योजना म्हाडाने केल्या असत्या तर प्रकल्पांच्या संचिका मंत्र्यांकडे येण्याची गरज नव्हती. परंतु, म्हाडाच्या स्किम्स एसआरअेने करावयाच्या तर भीती ही आहे की, लक्ष्मीदर्शनाचा विषय होऊ शकतो. या शिवाय अन्य कोणतेही कारण या निर्णयामागे असू शकत नाही. हे सर्व यासाठीच चालले आहे. म्हाडाच्या योजना एसआरअेने करावयाच्या आहेत. एसआरअेच्या प्रत्येक बिल्डरने फाईल आणायची आहे. यासाठी हा निर्णय आहे.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे........

सभापती महोदय, देशातील सर्व शहरे, नगरे स्वच्छ, निरोगी आणि राहण्यायोग्य करून सर्व नागरिकांना चांगले आरोग्य व स्वच्छता, पर्यावरण देण्यासाठी केंद्र सरकारने "स्वच्छ भारत अभियानाची" सुरुवात केली आहे. खरे तर स्व.आर.आर.पाटील साहेबांनी त्यांच्या कार्यकाळात ग्राम स्वच्छता अभियानाची सुरुवात अगोदरच केली होती. शौचालयाची स्किम पूर्वीही होती. खरे तर ग्रामीण भागात प्रत्येक घरामध्ये शौचालय असावे, याबाबतीत अनेक वर्ष योजना आहे. परंतु, ही योजना कधीच जनतेच्या पचनी पडली नाही. मी ग्रामीण भागात काम केले आहे. मी 8 वर्षे जिल्हा परिषदेचा सदस्य होतो. अनेक गावे हागणदारीमुक्त करण्याबाबत पावले उचलण्यात आली होती. ज्यावेळी मी जिल्हा परिषद सदस्य होतो त्यावेळी शौचालयासाठी 4000 रुपये अनुदान मिळत होते. लोक हे अनुदान घ्यायचे. मात्र, शौचालये बांधकाम करीत नव्हते. त्यानंतर राज्य सरकारमार्फत फार मोठी चळवळ उभी करण्यात आली, लोकसहभाग वाढला, जनता जागरुक झाली आणि दिलेल्या अनुदानातून शौचालये बांधू लागली. आज या ठिकाणी असे सांगितले गेले आहे की, शौचालयासाठी 600 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पूर्वी शौचालयासाठी केंद्र सरकारकडून 600 कोटी रुपये प्राप्त व्हायचे. कालच्या अर्थसंकल्पात सरकारने अशी घोषणा केली आहे की, आम्ही शौचालये बांधण्याचे काम कंत्राटदाराला देऊ. या संदर्भात लोणावळा येथे सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक पार पडली. त्यामध्ये असे ठरले की, रेडिमेड शौचालये देण्यात यावीत. मी हे जबाबदारीपूर्वक सांगू इच्छितो की, गुजरातच्या एका मॅन्युफॅक्चररला या स्किमचे कंत्राट देण्यात येणार आहे. अन्यथा, दुसरे काही कारण नाही. या संदर्भातील टेंडर निघाले आहे. एवढी घाई का करण्यात आली ? चार महिन्यात ज्या गोष्टींसाठी घाई व्हावयास हवी होती, ती झाली नाही. शौचालये रेडिमेड बांधून देण्याच्या निर्णयापासून टेंडर काढण्यापर्यंत घाई का करण्यात आली, हे आमच्या लक्षात आलेले नाही. याबाबत आम्हाला उत्तर अपेक्षित आहे. या सरकारने अर्थसंकल्पीय भाषणातून स्वतःची पाठ थोपटून घेतली आहे. परंतु, या सर्व गोष्टींचा उलगडा सुध्दा उत्तराच्या भाषणातून झाला पाहिजे.

श्री.धनंजय मुंडे........

सभापती महोदय, औद्योगिक क्षेत्रातील महाराष्ट्राचे अग्रणी स्थान कायम रहावे व राज्याची आर्थिक प्रगती व्हावी, या दृष्टीकोनातून महत्त्वपूर्ण पाऊल 'मेक इन इंडिया' प्रमाणे 'मेक इन महाराष्ट्र' या माध्यमाव्दारे उचलण्यात आले आहे. केंद्राच्या योजनेची कॉपी महाराष्ट्रात करण्यात आली आहे. एडिट, पेस्ट, कॉपी आणि फॉरवर्ड, अशा प्रकारची ही स्किम आहे. महाराष्ट्राचे बजेट मांडताना केंद्राचे बजेट एडिट, पेस्ट, कॉपी आणि आपल्याला फॉरवर्ड, असे तयार केले आहे. पण एक गोष्ट मात्र आपण विसरला आहात की, औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र मागे जात आहे, असा आरोप करुन गेली 15 वर्षे तुम्ही महाराष्ट्राची आणि महाराष्ट्राच्या जनतेची दिशाभूल करीत होता.

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

हे आरोप तुम्ही केले आहेत, औद्योगिक क्षेत्रातील महाराष्ट्राचे अग्रणी स्थान कायम राहण्यासाठी बजेटच्या भाषणात 'मेक इन महाराष्ट्र' ही योजना आणली आहे. महाराष्ट्र राज्य औद्योगिक दृष्ट्या संपूर्ण देशात पहिल्या क्रमांकावर आहे हे कबूल केल्याबाबत मी नवीन सरकारचे अभिनंदन करतो, आभार देखील मानतो. विरोधी पक्षात असताना आपण खोटे बोललात तरी शेवटी सत्यच बाहेर येते. विरोधी पक्षात असताना औद्यागिक दृष्ट्या महाराष्ट्र पिछाडीवर गेला आहे, अर्थसंकल्प सादर करताना कबूल केले की, महाराष्ट्र राज्य उद्योगात अग्रणी आहे, पहिल्या क्रमांकावर आहे, पहिल्या क्रमांकावर ठेवण्यासाठी आम्हाला प्रयत्न करायचे आहेत.

सभापती महोदय, मेक इन महाराष्ट्रासाठी वित्त मंत्री महोदयांनी 315 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही तरतूद आघाडी शासनाच्या काळात आलेल्या उद्योगांना प्रोत्साहन म्हणून गत वर्षी भरलेले व्याज परत करण्यासाठी आहे. आघाडी शासनाच्या काळात जे उद्योग आलेत, त्यांना व्याज म्हणून प्रोत्साहन देण्यासाठी 315 कोटी रुपये इतकीच रक्कम ठेवण्यात आली आहे. सत्तेत नसताना महाराष्ट्रावर वाट्टेल ते आरोप आपण केले आहेत. महाराष्ट्र उद्योगात एक क्रमांकावर होता, आजही आहे व भविष्यात देखील राहील. महाराष्ट्राला स्वतःच्या स्वार्थासाठी औद्योगिक दृष्ट्या पिछाडीवर नेले त्यामुळे राज्यावर तुमचे प्रेम नाही हे यातून दिसून येते. सत्तेच्या स्वार्थासाठी राज्याचा अपमान भारतीय जनता पक्षाने केला आहे.

सभापती महोदय, काही महामंडळने नव्याने स्थापन करण्यात आली आहेत. महाराष्ट्र बांबू विकास महामंडळाच्या प्रारंभी बाबीसाठी आवश्यक नियतव्यय प्रस्तावित केला आहे. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात देखील आमचे आदरणीय काका स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या नावाने ऊस तोड महामंडळ स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली आहे. राज्यपाल यांच्या अभिभाषणात याचा उल्लेख करण्यात आला. आदरणीय स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या पहिल्या जयंतीच्या वेळी म्हणजे 12 डिसेंबर, 2014 रोजी माननीय मुख्यमंत्री यांनी परळीत येऊन घोषणा केली की, ऊस तोड कामगार मंडळ त्यांचे नावाने स्थापन करण्यात येईल. याबाबत आम्हाला आनंद वाटला होता. या महामंडळासाठी एक रुपयांची देखील बजेटमध्ये तरतूद करण्यात आली नाही. इतकी क्रुर चेष्टा का करण्यात आली आहे. बीड जिल्हयात ऊस तोड मजुरांची संख्या 7 लाखाच्या वर आहेत. सहा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

महिने संपूर्ण कुटुंब घरदार सोडून बाहेर जातात. 5 ते 7 महिन्याचे लहान मूल पाठीवर बांधून ऊस तोडण्यासाठी घरापासून लांब जातात. हे आम्ही स्वतः पाहिले आहे. आमच्या जुन्या पिढीने ऊस तोडला आहे. म्हणून मुंडे साहेबांच्या नावाने ऊस तोड महामंडळ स्थापन केले आहे. यासाठी किमान एक रुपयांची तरतूद करायला पाहिजे होती. इतका तरी त्यांचा मान ठेवायला पाहिजे होता. आदरणीय मुंडे साहेबांचा मान बाजूला ठेवला तरी ऊस तोड मजुराच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी भाष्य केले होते. ऊस तोड मजुराची अत्यंत क्रुर चेष्टा महाराष्ट्र शासनाने केली आहे. महाराष्ट्रातील ऊस तोड मजूर या सरकारला कधीच माफ करणार नाही. आदरणीय मुंडे साहेबांच्या नावाने महामंडळ काढून बजेटमध्ये एक रुपयाची तरतूद केली नाही. याबाबत मी शासनाचा स्पष्ट शब्दात निषेध करतो. यापेक्षा कोणती दुर्दैवी गोष्ट असू शकते. आता ऊस तोडीचा हंगाम संपत आला आहे. महाराष्ट्रातील अर्धे जास्त कारखाने बंद झाले आहेत. ऊस तोड मजुरांची मागणी अशी आहे की, त्यांना वाढीव मजुरी मिळावी, वाढीव मजुरी दिली जात नाही. महामंडळ स्थापन केले तर त्यासाठी निधी दिलेला नाही. ऊस तोड कामगारांनी शासनाचे इतके काय वाईट केले आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांना गती देण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या सहभागातून स्पेशन परपज व्हेईकल स्थापन करण्यास शासनाने तत्वतः मान्यता दिली आहे. बांधकामाधीन रेल्वे प्रकल्पांसाठी 68 कोटी 60 लाख रुपये इतका नियतव्यय ठेवला आहे. यामध्ये राज्यातील परळी-बीड-नगर, वर्धा-नांदेड व्हाया यवतमाळ-पुसद, वडसा-देसाईगंज-गडचिरोली, नागपूर-नागभिड या चार रेल्वे मार्गासाठी राज्य व केंद्र शासनाच्या 50-50 टक्के सहभागातून हे प्रकल्प करण्यात येणार आहे. परळी-बीड-नगर रेल्वे मार्गासाठी केंद्र शासनाने या वर्षाच्या रेल्वे बजेटमध्ये 144 कोटी रुपयाची तरतूद केली आहे. त्याबाबत मी केंद्र शासनाचे आभार मानतो. 144 कोटी रुपये जास्त नाही. अशा प्रकारे 144 कोटी रुपये दरवर्षी दिले तर हा प्रकल्प 20 वर्षात देखील पूर्ण होणार नाही. 144 कोटी रुपयांची तरतूद केंद्र शासनाने केली आहे. राज्य सरकारने या चारही प्रकल्पासाठी फक्त 68 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या प्रकल्पांचा हा अपमान



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

आहे. बीड जिल्हयातील 6 पैकी 5 आमदार सत्ताधारी पक्षाचे व एक खासदार आहेत. हे सर्व दिल्यावर देखील बीड जिल्ह्याबाबत तुमच्या मनात इतका राग का असू शकतो, ही बाब लक्षात येते.

सभापती महोदय, छत्रपती जाणते राजे शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक बांधण्याकरिता 100 कोटी रुपयांचा नियतव्यय ठेवला आहे. विरोधी पक्षात असताना हा विषय अनेक वेळा उपस्थित केला जात होता. आघाडी सरकारने शिव स्मारक उभे करण्याचा निर्णय घेतला होता. तेव्हा 100 कोटी रुपये नियतव्यय ठेवला होता. आज देखील या शासनाने 100 कोटी रुपये नियतव्यय ठेवला आहे....(अडथळा)... सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर साहेब मी माहितीच्या अधिकारात माहिती घेतली, परंतु सरकार माहिती देण्यास तयार नाही. हा विषय मी याच अधिवेशनात तुमच्या समोर आणणार आहे.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकांच्या बाबतीत 100 कोटी रुपयांची तरतूद अतिशय तुटपुंजी आहे. तीन महिन्याच्या काळात लागणाऱ्या सर्व परवानग्या आणल्या आहेत. आता काम सुरु करायचे असेल तर 100 कोटी रुपयांत स्मारकाचे काम होणार आहे काय ? यासाठी 1000 कोटी रुपयांची तरतूद करणे आवश्यक होते. निवडणुकीच्या वेळी 'छत्रपती शिवाजींचा आशिर्वाद चलो चलो मोदी के साथ' अशी घोषणा देण्यात येत होती.

सभापती महोदय, इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे सांगण्यात आले आहे. याबाबत सर्व परवानग्या मिळाल्या असल्याचे केंद्रिय मंत्री श्री.प्रकाश जावडेकर यांनी दिल्ली येथे प्रेस कॉन्फरन्स घेऊन सांगितले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यासाठी इंदू मिलच्या जागेसाठी ज्या परवानग्या लागतात त्या पूर्ण केल्या आहेत.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.......

परंतु, परवानग्या मिळालेल्या असताना देखील परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी 1 रुपयाची देखील तरतूद करण्यात आलेली नाही. माननीय श्री.रामदास कदम साहेब, परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर तुमचे किती प्रेम आहे, हे यावरुन दिसून येते. श्रेय मात्र तुम्ही घेता ? परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी आघाडी शासनाच्या काळात परवानग्या मिळालेल्या असल्या तरी ते जाहीर मात्र यांनी करावयाचे ? ठीक आहे, आम्ही समजू शकतो की, सत्तांतर झालेले आहे. तुमच्या जागी कोणीही असते तरी त्यांनी हेच केले असते. परंतु, एक गोष्ट मात्र नक्कीच सांगितली असती की, आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्या प्रमाणे आम्ही परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी देखील 100 कोटी रुपयांची तरतूद करीत आहोत. परंतु, परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. याचा अर्थ काय आहे ? माननीय श्री.रामदास कदम साहेब, तुमचे रक्त सळसळून पेटून उठायला पाहिजे होते. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये हिंदूहृदयसम्राट आदरणीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. अर्थसंकल्पात देखील आदरणीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु, स्मारकासाठी तरतूद काय केली ? तसेच, मुंबई विद्यापीठात आदरणीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने अध्यासन सुरु करण्याबाबत अर्थसंकल्पात उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु, ज्यांच्या जीवावर आपला पक्ष आज मित्र पक्ष म्हणून सत्तेत आहे त्या आदरणीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी एक रुपयाची देखील तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली नाही, तरी देखील माननीय श्री.रामदास कदम साहेब तुम्ही शांत आहात ? मग याला काय म्हणावयाचे ? सळसळून उठणारे शिवसैनिक आज राज्याच्या मंत्रिमंडळात असताना देखील त्यांनी याबाबतीत शासनाचा एका शब्दाने देखील निषेध केला नाही ? माननीय श्री.रामदास कदम साहेब, आपण उघडपणे शासनाच्या

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.......

विरोधात काही गोष्टी बोलला. आम्हाला आनंद वाटला की, असे कणखर नेतृत्व आहे. सरकार चुकत असेल आणि मी जरी मंत्रिमंडळात असलो तरी मी सरकारच्या विरोधात बोलू शकतो, हे माननीय श्री.रामदास कदम साहेबांनी दाखवून दिलेले आहे. परंतु आदरणीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाच्या बाबतीत कोणी काहीही बोलले नाही, याचे आम्हाला वाईट वाटते.

सभापती महोदय, सभागृहाचे नेते, माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी औरंगाबाद येथील दौऱ्यावर असताना आदरणीय श्री.गोपीनाथ मुंडे साहेबांचे स्मारक उभारण्याबाबत घोषणा केली होती. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात तसा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु, पुन्हा मुंडे साहेबांची चेष्टा करण्यात आली. अर्थसंकल्पास त्यासाठी एका रुपयाची देखील तरतूद करण्यात आलेली नाही. हा न्याय आहे ? हे सरकार कोणासाठी आहे ?

सभापती महोदय, महिला बचत गटांच्या सक्षमीकरणाबाबत अर्थसंकल्पात उल्लेख करण्यात आलेला आहे. पोषण आहारासाठी स्थानिक कृषी उत्पादनाच्या माध्यमातून चांगला दर्जेदार व पोषक आहार उपलब्ध करुन देणाऱ्या महिला बचत गटांना यंत्रसामग्री खरेदी करण्यासाठी तसेच, महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी जिल्हास्तरावर कायम स्वरुपी 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बाजारपेठ' निर्माण करण्यासाठी 200 कोटी रुपयांचा नियतव्यय ठेवण्यात आलेला आहे. या संदर्भात सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला आहे की, बचत गटांच्या माध्यमातून पोषण आहाराचे वाटप करावे. सुप्रीम कोर्टाने बचत गटाचे निकष देखील ठरवून दिलेले आहेत. त्या निकषानुसार बचत गटांसाठी कॉर्पोरेट फॅक्टरीज प्रमाणे फॅक्टरी उभ्या करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यातील विविध जिल्ह्यातील 65 महिला बचत गटांनी कर्ज काढून, आपले सोने गहाण ठेऊन अशा प्रकारच्या फॅक्टऱ्या उभ्या केल्या. महिला बचत गटांनी उभारलेल्या या 65 फॅक्टऱ्या सोडून आणखी असे 450 युनिट उभे करावयाचे आहेत. परंतु, या बाबतीत शासन निर्णय घेत नाही. मी जबाबदारीने सांगतो की, 63 युनिट सुरु असताना, जिल्हाधिकाऱ्यांनी त्या युनिटची पाहणी केलेली असताना, या बचत गटांना काम द्यावे अशी शिफारस जिल्हाधिकाऱ्यांनी केलेली

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.......

असताना देखील जाणीवपूर्वक पूर्वीच्या ठेकेदाराला दोन-दोन महिने या संदर्भातील ऑर्डर एक्स्टेंड व्हावी म्हणून याबाबत निर्णय घेण्यात आला नाही. हे काय चालले आहे, कोणासाठी चालले आहे ? शासनाने निकषानुसार 450 बचत गटांची निवड केली. मी या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित केल्यानंतर, पाठपुरावा केल्यानंतर ज्या 63 बचत गटांनी आपले युनिट उभे केले होते त्यांना ऑर्डर देण्याच्या बाबतीत कार्यवाही झाली. परंतु, इतर बचत गटांना ऑर्डर देण्याच्या बाबतीत कार्यवाही होत नाही. शासनाला जाणीवपूर्वक सुप्रीम कोर्टात असे सांगावयाचे आहे की, हे बचत गट चांगले काम करीत नाहीत, त्यामुळे हे बचत गट बदलविण्यात यावेत आणि पूर्वी प्रमाणे जे कॉन्ट्रॅक्टर सप्लाय करीत होते त्यांनाच हे काम मिळावे, यासाठी हे सर्व सुरु आहे. (...अडथळा...) मला आनंद आहे की, तुम्ही त्या कॉन्ट्रॅक्टरचे नाव ऐकण्यासाठी उत्सूक आहात. मी त्या कॉन्ट्रॅक्टरचे नाव सभागृहात जाहीर करणार आहे. हा विषय वेगळ्या पद्धतीने पुराव्यासह सभागृहात येणार आहे आणि राज्य शासनाने मागील तीन महिन्यात जे निर्णय घेतले ते सुध्दा समोर येतील.

सभापती महोदय, शासनाने सत्तेवर आल्यानंतर लगेच एक निर्णय घेतला. तो म्हणजे, तीन लाख रुपये किंमतीचे काम असेल तर ते ई-टेंडरींग पद्धतीने करण्यात येईल. या निर्णयाचा खूप ऊहापोह करण्यात आला. सभागृहात तीन-चार दिवसांपूर्वी या संदर्भात तारांकित प्रश्न चर्चेला आला होता. तुम्ही जनतेला किती फसविणार आहात ? अरे, जनाची नाही तर मनाची तरी वाटू द्यावी ? तुम्ही तीन लाख रुपये किंमतीचे काम असेल तर ते ई-टेंडरींग पद्धतीने करण्याचा निर्णय घेतला. परंतु, आपण बजेटचे पुस्तक बघावे. ग्रामीण विकास अंतर्गत 2515 हेडखाली 2 लाख 99 हजार रुपये किंमतीची कामे प्रस्तावित केलेली आहेत. एका आमदाराला विकास कामांसाठी 2515 लेखा शीर्षाखाली जो निधी द्यावयाचा आहे, त्यामध्ये 2 लाख 99 हजार रुपये किंमतीची कामे सूचविलेली आहेत. 2515 लेखा शीर्षाखाली बजेटमध्ये अनेक कोटी रुपयांची कामे दर्शविण्यात आलेली आहेत. आपण बजेटचे पुस्तक उघडून त्यातील 2515 लेखाशीर्ष बघावे. जेवढी कामे सूचविण्यात आलेली



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.......

आहेत ते प्रत्येक काम 2 लाख 99 हजार रुपये किंमतीचे आहे. तुम्ही किती फसविता ? मी जिल्हा परिषदेत काम केलेले आहे. मी ग्रामीण भागात काम करणारा कार्यकर्ता आहे. बजेटच्या पुस्तकात अशी अनेक कामे नमूद केलेली आहेत. मी त्यातील एका कामाचा उल्लेख करतो. प्राजिमा 35 ते शिरसोले जामखेड कि.मी. 10/500 ते 11/तालुका साखळी रस्त्याची सुधारणा करणे. म्हणजे जवळ जवळ 1 किलो मीटर रस्त्याची सुधारणा करण्यासाठी 2 लाख 99 हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. हे काय चालले आहे ? दुसरे काम प्राजिमा 29 ते कोंडाई बाजार पिंजारवाडी रस्त्याची सुधारणा करणे, 16/500 ते 17 आणि या कामासाठी 2 लाख 99 हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. हे काय चालले आहे, किती फसविता ? तुम्ही अशा प्रकारे महाराष्ट्राच्या जनतेला फसवूनच सत्तेवर आलेला आहात आणि आता पुन्हा अशा प्रकारे निर्णय घेऊन त्यांची फसवणूक करता, हे कोठे फेडाल ?

सभापती महोदय, मला एका गोष्टीचा अभिमान वाटतो. आज जे सत्तेवर आहेत त्यांनी संयुक्त रीत्या आघाडी शासनाला हरविण्यासाठी सन 1999, 2004 आणि 2009 मध्ये प्रयत्न केला. परंतु, त्यावेळी तुम्ही आघाडी शासनाला हरवू शकला नाही.

यानंतर श्री.भोगले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे......

जनतेचा कमीत कमी 15 वर्षे आम्ही विश्वास टिकवून ठेवला. तुम्ही चार महिन्यात त्या जनतेचा विश्वास गमावला आहे. बोलता एक, करता एक आणि निर्णय दुसराच घेत आहात. माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांना काय वाटेल? ते उत्तर देताना म्हणाले होते की, आम्ही निर्णय बदलू शकत नाही. या ठिकाणी मात्र निर्णय बदलला की नाही? मागच्या दाराने फसवणूक करण्याचे काम केले आहे.

सभापती महोदय, अनुसूचित जाती उपयोजनेसाठी 6490 कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित केल्याचे म्हटले आहे. या राज्याचे तडफदार सांस्कृतिक कार्य आणि शालेय शिक्षण विभागाचे मंत्री श्री.विनोद तावडे यांनी महत्वपूर्ण घोषणा केली. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील वास्तव्याचे घर राज्य सरकार विकत घेणार असून त्या घराचे स्मारकामध्ये रुपांतर केले जाईल. त्याकरिता 1 रुपयाची सुध्दा तरतूद या बजेटमध्ये करण्यात आलेली नाही. हा खर्च कोण करणार आहे, केंद्र सरकार करणार आहे का, नेमकी वस्तुस्थिती काय आहे हे सभागृहाला कळले पाहिजे. ज्या महापुरुषापासून प्रेरणा घेऊन आम्ही राजकारण करीत आहोत, समाजकारण करीत आहोत त्या महापुरुषाचा अशाप्रकारे अवमान करीत असाल तर आम्ही ते खपवून घेणार नाही.

सभापती महोदय, सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये बायो मेट्रिक पध्दत लागू करण्याकरिता 23 कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित केला आहे. दोन दिवसापूर्वी सभागृहात 1.75 कोटी केसरी शिधापत्रिका धारकांच्या संदर्भात लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती. त्यावेळी आम्ही शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते की, योजनेमध्ये न बसणाऱ्या 1.75 कोटी केसरी शिधापत्रिका धारकांना आघाडी सरकारने दरमहा 120 कोटी रुपये खर्चून आठ महिने लाभ दिला होता. तो लाभ देण्यासाठी राज्याच्या तिजोरीवर आर्थिक भार आला तरी चालेल परंतु युती सरकारने या केसरी शिधापत्रिकांना तो लाभ द्यावा अशी आम्ही विनंती केली होती. त्याबाबत या बजेटमध्ये काहीही भाष्य केलेले नाही. 65 वर्षे वयावरील 1.20 कोटी वयोवृध्दांना होणारा धान्य पुरवठा मे, 2014 पासून बंद झालेला आहे. निराधार संस्था, आश्रमशाळा, मागासवर्गीयांची वसतिगृहे यांना होणारा धान्य पुरवठा......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) :** माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या मी निदर्शनास आणू इच्छितो की, त्यांचे भाषण सुरु होऊन 1 तास 10 मिनिटे इतका वेळ झालेला आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हे अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. किमान अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी माननीय सदस्यांना वेळेची मर्यादा असू नये. विधानसभेमध्ये विभागवार मागण्यांवर चर्चा करण्याची संधी मिळते. या सभागृहामध्ये माननीय सदस्यांना फक्त जनरल बजेटवर चर्चा करावी लागते. त्यामुळे माननीय सदस्यांना आपले विचार मांडता यावेत म्हणून अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी एक दिवस वाढवून देण्यात यावा.

**तालिका सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांना जेवढा वेळ लागेल तेवढा वेळ त्यांनी विचार मांडावेत. मी फक्त वेळेची आठवण करुन दिली.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सार्वजनिक वितरण व्यवस्थेबाबत नवीन शासनाने एकाही नवीन लाभार्थ्याची नोंद केलेली नसून अस्तित्वातील एपीएल, निराधार, वृध्द, आश्रमशाळा, मागासवर्गीय वसतिगृहे, निराधार संस्था यातील 2 ते 2.5 कोटी लाभार्थ्यांना वगळण्याचे पाप या सरकारने केले आहे. मी पाप यासाठी म्हणतो की, ही अन्नधान्याशी निगडित बाब आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते, त्यांना आजही आपण जाणता राजा म्हणून संबोधतो. ज्या ज्यावेळी रयतेला अन्नधान्याची निकड भासेल त्या त्यावेळी अन्नधान्याची कोठारे खुली करा अशी त्यांना आम्हाला शिकवण दिली. ज्यांच्या आशीर्वादावर तुम्ही सत्तेवर आलात त्या 2.5 कोटी जनतेला तुम्ही अन्नधान्यापासून वंचित ठेवले आहे.

सभापती महोदय, पशु वैद्यकीय संस्थेचे आधुनिकीकरण, पशु खाद्य, चारा विकास कार्यक्रम यासाठी 140 कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित केला आहे. माझा याबद्दल आक्षेप आहे. गोवंश हत्या बंदीचा कायदा या राज्यामध्ये लागू करण्यात आला. 1976 मध्ये गोहत्या बंदी कायदा मंजूर झाला होता. गोवंश म्हणजे बैल, वळू. याची कायदा करणाऱ्यांना माहिती नाही. आम्ही शेतकरी असल्यामुळे आम्हाला माहिती आहे. यामध्ये शेतकऱ्याचे अर्थकारण दडले आहे. सरकार म्हणते की, आम्ही गोवंश हत्या बंदी लागू केली. आम्ही गोहत्या बंदी कायद्याच्या बाजूने आहोत. गोवंश

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

हत्या बंदी कायदा करीत असताना काही गोष्टींचा विचार करणे आवश्यक होते. त्याचे प्रतिबिंब या बजेटमध्ये दिसून येत नाही.

...3...



श्री.धनंजय मुंडे.....

सभापती महोदय, आज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दुष्काळी स्थिती आहे, गारपिटीमुळे शेतकरी उद्‌ध्वस्त झाला आहे, अवकाळी पावसामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहे. शेतकऱ्यांचे खरे वेभव म्हणजे त्याच्या कोठ्यावर बैलजोडी असणे हे आहे. जोपर्यंत हे पशुधन रानात राबवू शकतो तोपर्यंत राबवायचा प्रयत्न असतो. 10 ते 15 वर्षे हे पशुधन उपयोगी ठरते. पोटच्या पोराप्रमाणे त्या पशुधनाचा सांभाळ करायचा आणि तो बैल ज्यावेळी थकतो त्यावेळी शेतकरी त्याचा सांभाळ करु शकत नाही. शेतकऱ्याच्या जिवावर येत नाही तोपर्यंत तो सांभाळ करतो. परंतु पशुधन थकले, जनावर भाकड झाले की तो शेतकरी ते विकून नवीन बैल खरेदी करतो. त्या शिवाय तो शेत राबवू शकत नाही, शेतात काही पिकवू शकत नाही. आता शेतकऱ्याने काय करायचे, यासाठी काय व्यवस्था केली आहे? आज शेतकऱ्याकडे स्वत:साठी खायला काही नाही. त्याने त्याच्याकडील भाकड जनावरांचे काय करायचे? या बजेटमध्ये शासनाने फक्त 140 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केली आहे. शासन या भाकड जनावरांचा सांभाळ करणार आहे काय, या जनावरांना चारा देणार आहे काय, निवाऱ्याची व्यवस्था करणार आहे काय?

सभापती महोदय, पूर्वीचा कायदा अस्तित्वात असताना फक्त काही लोकांची थाप पाठीवर पडावी म्हणून नवीन कायदा करण्याचा घाट घातला आहे. गोवंश हत्या बंदी कायद्यामुळे राज्यातील अनेक शेतकरी कुटुंबे देशोधडीला लागणार आहेत. ही कुटुंबे कोणत्याही धर्माची नाहीत. माणुसकीच्या नात्याने त्यांचा विचार केला पाहिजे. गोवंश हत्या बंदी कायदा लागू करावयाचा असेल तर या भाकड जनावरांचा सांभाळ करण्यासाठी शासनाला हजारो कोटी रुपयांची तरतूद करावी लागेल. त्या प्रमाणात तरतूद केली आहे का? लाखो लोकांच्या हातातील काम तुम्ही हिसकावून घेणार आहात. त्यांना नव्याने कोणते काम पुरविण्यात येणार आहे? तुम्ही त्यांची एकप्रकारे फसवणूक करीत आहात. लोकप्रियतेसाठी वाटेल तो निर्णय घेत आहात. दिल्लीतून कोणाची शाबासकी मिळवावी याबाबत मंत्रिमंडळामध्ये स्पर्धा चाललेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नंतर डब्ल्यू.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे .......

आम्हाला बऱ्यापैकी माहिती आहे. शाबासकी मिळवण्यासाठी प्रत्येकाची धावाधाव सुरु आहे. शाबासकी मिळवण्यासाठी कोण काय काय प्रयत्न करीत आहे याची माहिती याच अधिवेशनात देऊ.

सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात मी एक मुद्दा उपस्थित केला होता परंतु त्यासंदर्भातील उत्तर शासनाकडून अद्याप पावेतो आलेले नाही. सद्या क्रिकेट वर्ल्डकप सुरु आहे. अनिल सिंधानी नावाच्या आंतरराष्ट्रीय बुकीच्या संदर्भात मी मुद्दा उपस्थित केला होता. यांचे सरकार सत्तेवर आल्यावर या सरकारने या बुकीला संरक्षण दिले. परंतु याबाबत कोणीही काही बोलत नाही. या बुकीबाबत अद्याप काहीही कारवाई केली जात नाही. आज सुध्दा ही व्यक्ती बुकी म्हणून पैसे गोळा करीत आहे. या बुकीला पोलीस प्रोटेक्शन मिळाले असून हा बुकी पोलीस प्रोटेक्शनच्या खाली दुसऱ्या बुकींवर पोलिसांच्या माध्यमातून धाडी टाकून, त्याचे व्हीडीओ क्लिप्स तयार करुन दहशत निर्माण करीत आहे.

सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात मी अंमली पदाच्या संदर्भात सुध्दा मुद्दा उपस्थित केला होता व त्याचेही उत्तर अद्यापि सरकारने दिलेले नाही. आपल्या राज्याच्या जेलमध्ये कैद्यांना अंमली पदार्थ दिले जातात व त्यासंदर्भातील सीडीच्या स्वरुपातील पुरावा मी सभागृहाच्या माध्यमातून आपल्याकडे देत आहे. माननीय मुख्यमंत्र्यानी विधानसभेत अंमली पदार्थामध्ये अंडरवर्ल्ड आणि बिल्डर आहेत असा खुलासा केला होता. या अंमली पदार्थामध्ये आज अंडरवर्ल्ड दडला आहे. अतिशय स्वस्तात जीवघेणी नशा या महाराष्ट्रात आता तयार होऊ लागली आहे.

सभापती महोदय, या राज्य सरकारने एलबीटीच्या बाबतीत राज्यातील जनतेची फसवणूक केलेली आहे. माननीय अर्थमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी बजेटच्या वेळी विधानसभेत एलबीटी आम्ही रद्द करणारच यासंदर्भात शेरोशायरी केली होती परंतु विधानसभेत माननीय राज्यमंत्र्यांनी शेरोशायरीविना आरामात अर्थसंकल्प मांडला होता.

सभापती महोदय, एलबीटी आम्ही रद्द करुन व्हॅटमध्ये एक्स्ट्रा वाढ करणार अशी घोषणा अर्थमंत्र्यांनी बजेटमध्ये केली होती. परंतु या वाढीच्या संदर्भात ग्रामीण भागातील जनतेकडून एलबीटीचे पैसे वसूल करुन ते शहरी भागाला दिले जाणार आहेत. शहरी भागाला पैसे देऊ नका

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे .......

असे आमचे म्हणणे नाही. परंतु तुम्हाला शहरातील एलबीटी रद्द करण्यासाठी ग्रामीण भागातील सामान्य माणसाच्या खिशात हात घालून सवंगलोकपियतेसाठी एलबीटीचा निर्णय करावयाचा असेल तर ते योग्य नाही. हे सरकार एलबीटी रद्द करणार नाही तर जीएसटी येईपर्यंत तुम्ही वाट पाहत आहात. एलबीटीच्या माध्यमातून तुम्ही शहरी भागातील जनतेची फवसणूक केलेली आहे.

सभापती महोदय, मी या अर्थसंकल्पाचा विरोध करतो. विधानसभेत सन्माननीय अर्थमंत्र्यांनी जी काही शायरी केली, ज्या आविर्भावात केली त्यातील एक शेर मी या ठिकाणी सांगणार आहे.

"गुजर जायेगा ये दौर भी, अगर इम्तिनान रख, जब खुशी नहीं ठहरी तो गम की क्या औकात है ?"

सभापती महोदय, आम्ही सत्ताधारी बाकावर 15 वर्षे होतो. आता तुम्ही तिकडे बसला आहात. तुम्ही आता ज्या पध्दतीने काम करीत आहात त्यावरुन तुम्ही फार दिवस तिकडे राहणार नाही, तुम्ही लवकरच इकडे याल. हा अर्थसंकल्प म्हणजे संपूर्ण महाराष्ट्राची केलेली फसवणूक असल्यामुळे मी अर्थसंकल्पाचा धिक्कार करतो, विरोध करतो आणि माझे मनोगत येथेच थांबवतो. जय हिंद,जय महाराष्ट्र.

------------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पावर विचार मांडण्यासाठी मी उभी आहे. मराठीचे महत्व का कमी झाले हे मला कळत नाही. चिन्हांकित अर्थसंकल्प की, प्रश्नांकित अर्थसंकल्प हा जर प्रश्न विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना पडत असेल तर रोज क्रिकेट पाहणाऱ्या लोकांना, कबड्डी खेळणाऱ्या सर्व लोकांना माहिती आहे की, त्या ठिकाणी ज्या रेषा मारल्या जातात त्याला चिन्हांकित रेषा म्हणतात आणि रेषेपर्यंत हात पोहचला नाही तर माणूस रिजेक्ट होतो व रेषेच्या पलिकडे हात गेला तर माणूस सिलेक्ट होतो. हे आपल्या सर्वांना माहिती आहे. त्यामुळे आम्ही तेच ठरवले आहे की, तुम्ही प्रत्येक बजेटमध्ये प्रस्तावित केले, प्रस्तावित केले,प्रस्तावित केले असे म्हणत होता परंतु सिलेक्ट कधीच होत नव्हता ? आम्ही त्याला चिन्हांकित केले, कायम केले आणि ते देणार हे घोषित केले असा या चिन्हांकितचा अर्थ होतो. आपल्याला मराठीतील चिन्हांकितचा अर्थ संमजला नाही याचे खरोखर वाईट वाटले. मराठीचे विद्रुपतेने चिन्हांकित की, प्रश्नांकित असे आपण म्हणत असतांना तुम्हाला ते कळाले नाही याचे मला वाईट वाटले. त्यामुळे आपण मराठी शब्दाचा अपभ्रंष करु नये अशी विनंती आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, पॉईंट ऑफ ऑर्डरच्या मुद्यावर मी उभा आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती फडणवीस यांनी चिन्हांकितच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. चिन्हांकित म्हणजे स्टार आहे व त्याला अधिक महत्व देण्याचा प्रयत्न आहे. बजेटमध्ये जी काही तरतूद केली आहे ती कमी जरी असली तरी पुढे ती आम्ही वाढवून देणार आहोत असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे चिन्हांकितचा अर्थ अजून वेगळा असू शकतो परंतु मी सांगितल्या प्रमाणे अर्थ निघतो असे माझे मत आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, शासनाने जी तरतूद केलेली आहे ती तरतूद खर्च केली जाणारच आहे. प्रत्येक अधिवेशनाच्या अगोदर पूरक मागण्या येतच असतात. या शासनाचे हे पहिलेच बजेट आहे. आम्ही एवढे एवढे पैसे देऊ असे चिन्हांकित केलेले आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, यावर्षीचे बजेट 1.93 हजार कोटी रुपयांचे आहे. बजेट वाढत नसते. पुरवणी मागण्याच्या माध्यमातून तरतुदी फिरवल्या जातात. बजेट जर वाढत असेल तर शासनाचा अजून दुसरा आर्थिक सोर्स काय आहे ते कळले पाहिजे.

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य मी बोलत असतांना अडथळा निर्माण करीत आहेत. हे बोलत असताना आम्ही यांना एका शब्दाने सुध्दा अडवले नाही.

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फडणवीस यांनी अनेक वर्षापासून बजेट पाहिलेले आहे. बजेटमध्ये नियतव्यय प्रस्तावित असते. हा खर्च बजेटमध्ये अपेक्षित असून तो खर्च होणारच आहे. अवितरीत नियतव्ययापैकी म्हणजे वितरीत केल्यानंतर निधी शिल्लक राहिला तर चिन्हांकित. याचा अर्थ देणार नाही, पण देणारही नाही असा होतो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, विधानसभेत शेरोशायरीने दमदार भाषण दिले गेले. गेल्या 25 वर्षात विधानसभेत अर्थमंत्री व विधान परिषदेत अर्थ राज्यमंत्री बजेटचे वाचन करीत असतात. तुम्ही जेव्हा बजेट मांडत होता त्यावेळी तुमचीही शेरोशायरी आम्ही ऐकलेली आहे. परंतु अर्थसंकल्पाच्या संदर्भात वैयक्तिक हेत्वाआरोप आम्ही कधीही केला नव्हता. कोणी कसा अर्थसंकल्प मांडला हा काही विषय होऊ शकत नाही. त्यामुळे वैयक्तिक हेत्वारोप करणे बरोबर नाही.

यानंतर श्री. अजित......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत होती. सभागृहाची वेळ पुढील आदेश होईपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, यापूर्वी राज्यावर 3 लाख 477 कोटी रूपयांचे कर्ज होते. या वर्षी 33 हजार 107 कोटी रूपयांचे कर्ज घेतले आहे. हे कर्ज घेत असताना उत्पन्नाचे साधन वाढविण्याचा प्रयत्न केलेला आहे. या उत्पन्नाच्या साधनातून कर्जफेड करण्यात येईल अशाप्रकारचा इशारा अर्थसंकल्पात दिलेला आहे.

सभापती महोदय, या सरकारने अवर्षणग्रस्त शेतकऱ्यांना 4 हजार कोटी रूपयांची मदत दिलेली आहे. यापूर्वी ही मदत दोन ते अडीच हजार कोटी रूपयांपर्यंत होती. आम्ही पहिल्यांदा शेतकऱ्यांना हेक्टरी साडेचार हजार रूपयांची मदत दिलेली आहे. ती मदत शेतकऱ्यांच्या बँकेतील खात्यामध्ये जमा केली असून शेतकऱ्यांना ते पैसे मिळालेले आहेत. उर्वरित रक्कम केव्हा देणार याची माहिती माननीय वित्तमंत्री देतील. पहिल्या हेक्टरचे पैसे मिळाले आहेत आणि दुसऱ्या हेक्टरचे पैसे देण्याची तरतूद करण्यात येणार आहे असे या ठिकाणी सांगण्यात आले आहे.

सभापती महोदय, मराठवाडा आणि विदर्भ या दोन विभागांमध्ये दर दोन वर्षांनी दुष्काळ पडतो आणि एक वर्षी पीक येते. यामुळे त्या भागातील शेतकरी हवालदिल झालेला आहे. तो आत्महत्या करीत आहे. मराठवाडा आणि विदर्भातील सिंचन वाढलेले नाही. मराठवाडा आणि विदर्भातील सिंचन अनुक्रमे 16 आणि 13 टक्क्यांच्यावर गेलेले नाही. आज या भागातील 44 टक्के आणि 87 टक्के जमीन कोरडवाहू असल्यामुळे शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागत आहे, हे आपणास मान्य करावे लागेल.

सभापती महोदय, मी खालच्या सभागृहात आणि वरच्या सभागृहात सातत्याने हा विषय मांडत आले आहे की, गोदावरी लवादाने महाराष्ट्राला, मराठवाड्याला व विदर्भाला दिलेले पाणी आम्ही कधीच अडविले नाही. कधीही त्या पाण्याचा फायदा शेतकऱ्यांना करून दिला नाही. आपण गोदावरीचे पाणी उपलब्ध करून दिले असते तर आज आमच्यावर दुष्काळाला सामोरे जाण्याची वेळ कधीच आली नसती. आमच्या वाट्याचे पाणी आंध्र प्रदेश आणि दुसऱ्या भागाकडे जात आहे. आम्ही आमच्या हिश्याचे गोदावरीचे पाणी वापरु शकलो नाही हे आमचे दु:ख आहे. यामुळेच प्रत्येकवेळी

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.....

शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहे. तो दरवर्षी दुष्काळ सहन करु शकत नाही. कर्जाच्या डोंगरातून मुक्त होणे त्याला जमत नाही.. मोठमोठे कारखानदार कर्जफेड करता नाही तर कारखाना सोडून जातात, दिवाळे वाजले म्हणून मोकळे होतात, पण माझा शेतकरी प्रामाणिक आहे. तो कधीच दिवाळे वाजले म्हणून सांगत नाही. कर्जफेड करता आली नाही म्हणून स्वतःला संपवितो. परंतु कधीही बँकेची फसवणूक करीत नाही. आपण अशा शेतकऱ्यांचा विचार करणार की नाही ?

सभापती महोदय, माझ्या सरकारने शेतकऱ्यांनी सावकरांकडून घेतलेले कर्ज फेडले आहे. 2 लाख 23 हजार शेतकऱ्यांनी सावकरांकडून किती कर्ज घेतले याची मला माहिती नाही, परंतु. सरकारने व्याज आणि मुद्दलाचे मिळून 171 कोटी रुपये फेडले आहेत. शासनाने शेतकऱ्यांना मदत केलेली आहे, हे आपण विसरता कामा नये.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे अभिभाषण सुरु असताना "सावकरांना मदत दिली, सावकरांनाच मदत दिली" असे सांगण्यात येत होते. ते पैसे सावकारांचे नसून शेतकऱ्यांचे होते हे मी येथे सांगू इच्छिते. या पैशांपायी शेतकऱ्याना आत्महत्या करण्यास भाग पाडले जात होते. शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त करण्याचे धोरण शासनाने आखले आहे.

सभापती महोदय, आपण सावकरी कायदा आणला. सावकारी कायद्यामुळे सावकारी नष्ट होईल असे सांगण्यात आले. पण विदर्भातील सावकाराला कधीच अटक झाली नाही, हे कोणाचे पाप आहे ? आपण कोणत्या सावकाराला जेलमध्ये टाकले, कोणत्या सावकारावर केसेस केल्या ? शेतकऱ्यांना सावकाराच्या पाशातून सोडविण्याचे काम या सरकारने केलेले आहे, त्याचा मला अतिशय आनंद आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याची घरची परिस्थिती पाहिल्यानंतर डोळ्यात अश्रू येतात म्हणून शासनाने त्यावर थोडीशी मलमपट्टी केलेली आहे त्याचा मला निश्चितपणे आनंद होत आहे.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.....

सभापती महोदय, सन 2014-2015 या वर्षामध्ये 51 हजार 53 कोटी रुपयांची योजना होती. परंतु तेवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला का ? मी नियोजनाच्या प्रत्येक मिटींगला उपस्थित असते. नियतव्ययाची जी रक्कम असते तेवढी रक्कम कधीच देण्यात येत नाही. आम्हाला प्रत्यक्षात 40-50 टक्क्यापेक्षा जास्त पैसे मिळाले नाहीत. परंतु माझ्या सरकारने फेब्रुवारी महिन्यात नियोजनाचे पैसे देऊन ते खर्च करण्यास सांगितलेले आहे. असे घडल्याची ही पहिली वेळ आहे. एकीकडे नियोजनामध्ये 40 टक्के पैसे द्यायचे कबूल करायचे तर दुसरीकडे अधिकाऱ्यांना काम करु नका असे सांगायचे आणि प्रत्यक्षात 28 मार्चला पैसे पाठवावयाचे. हे पैसे खर्च झाले नाहीत म्हणून परत करायचे आणि ते पुन्हा 60 टक्के पैसे पुढच्या नियोजनामध्ये ॲड करायचे. आम्हाला कधीच वाढीव पैसे मिळालेले नाहीत. तो आमचा अनुशे्ष कायम स्वरुपी आहे याची विदर्भातील जनतेच्या मनात चीड आहे. आम्हाला आमचा पैसा कधी मिळालाच नाही. परंतु आमच्या सरकारने 54 हजार 999 कोटी रुपये प्रत्यक्षात उपलब्ध करुन विदर्भातील जनतेला दिलासा देण्याचे ठरविले आहे. माझी सरकारला विनंती आहे की, हा पैसा खऱ्या अर्थाने वितरित करुन महाराष्ट्रामध्ये विकासाची दिशा दिसू द्यावी. आम्हाला तो पूर्ण पैसा मिळाला पाहिजे ही आमची मागणी आहे. कोणी काय दिले हा प्रश्न नाही. आम्हाला जुने उकरुन काढण्यामध्ये काही रस नाही. आम्हाला महाराष्ट्राचा विकास करण्यामध्ये आणि शेतकऱ्यांचे भले करण्यामध्ये रस आहे.शेतकऱ्यांना स्वतःच्या पायावर आत्मीयतेने उभे करण्याचे, त्यास ताकद देण्याचे आमचे स्वप्न आहे. आम्ही यातून जनतेचा विश्वास संपादन करु शकतो. आम्हाला आमचा पूर्ण पैसा मिळाला आणि विकासाची दिशा दिसली तर भविष्यात काहीतरी मिळेल असा लोकांमध्ये विश्वास निर्माण होतो आणि असा विश्वास प्रथमच या माध्यमातून होणार आहे.

सभापती महोदय, या सरकारने "टीम महाराष्ट्राची" घोषणा केलेली आहे. ही घोषणा ऐकून मला आनंद झाला. कारण "टीम महाराष्ट्र" ही नवीनच संकल्पना आहे कारण आम्ही आयुष्यभर डीम महाराष्ट्र पाहिलेला आहे. या ठिकाणी "टीम महाराष्ट्र" म्हणजे कुणा एकाचे राज्य नाही,

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.....

कोणा एकाचा विकास नाही, कोणा एकाचा महाराष्ट्र नाही. टीम महाराष्ट्रामध्ये विरोधी पक्षाची मदत घेणार आहोत, शासकीय अधिकारी / कर्मचारी, शेतकरी, शेतमजूर, व्यापारी व उद्योजक या सर्व घटकांचा समावेश आहे. सर्वांचा मिळून होणारा हा विकास आहे. आम्हाला एकमेकांवर टीका करण्यात काहीही स्वारस्य नाही. शेतकरी त्यांना काय पाहिजे ते सांगणार आहेत, व्यापारी त्यांना काय पाहिजे सांगणार आहेत, उद्योजक त्यांना काय पाहिजे ते सांगणार आहेत, या सर्वांचा मिळून महाराष्ट्राचा विकास होणार आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, महाराष्ट्र उद्योगक्षेत्रामध्ये पहिल्या क्रमांकावर होता. आपण स्थूल राज्य उत्पन्नाचा चार्ट पाहिला तर 2012-2013मध्ये कृषी उत्पन्नाचा विकास 0.5 टक्के होता. सन 2013-2014 मध्ये 7.7 टक्के झाला आणि सन 2014-15 मध्ये -8.5 टक्के झाला. उद्योगाच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर सन 2012-13 मध्ये 9.2 टक्के आणि सन 2013-2014 मध्ये 4.5 टक्के होता म्हणजे आपण काय प्रगती केली ? सन 2014-15 मध्ये 4.0 टक्के आहे, अजून पूर्ण हिशोब यायचा आहे म्हणजे उद्योगाचा विकास कुठे झाला आहे ? आपले उद्योग वाढविण्याचे सोडाच, पण आहे ते उद्योग बंद पडत आहेत. बंद पडलेले उद्योग सुरु करण्यासाठी सरकारकडे सातत्याने मागणी करीत आहात. बंद पडलेले उद्योग सुरु करुन लोकांना न्याय द्या. बेरोजगारांना काम द्या, तेव्हाच हा महाराष्ट्र पुढे जाईल हे स्वप्न तुमचे, आमचे आणि सर्वांचे आहे म्हणून टीम महाराष्ट्रामध्ये कोणा एकाचा वाटा नाही तर त्यामध्ये सर्वांचा वाटा राहणार आहे.

सभापती महोदय, विदर्भात एखादी योजना आणली तर त्यास आम्ही विरोध करायचा, तुम्ही आणली तर त्यांनी विरोध करायचा, क्रेडीट कोणाला जाईल यासाठी हा विरोध असायचा. या टीम महाराष्ट्रामध्ये कोणाचेच क्रेडीट राहणार नाही, आम जतनेचे क्रेडीट राहणार आहे आणि तेव्हाच "टीम महाराष्ट्र" पुढे जाणार आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

सभापती महोदय, माजी मालगुजारी तलावाच्या दुरूस्ती व नुतनीकरणासाठी 100 कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित करण्याबाबतचा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये केला आहे. महोदय, आम्ही दरवर्षी या तलावांच्या दुरूस्तीसाठी मागणी करतो. माजी मालगुजारी तलावांचा प्रश्न विशेषत: पूर्व विदर्भात आहे. मला काही जण विचारतात की, 'मामा तलाव' म्हणजे मामांनी बांधलेले तलाव काय ? या निमित्ताने मी सांगू इच्छिते की, विदर्भाला 'मामा' तर भेटला नाही, परंतु विदर्भाला मात्र मामा बनविणारे अनेक लोक भेटले. आतापर्यंत विदर्भाला कायमस्वरुपी मागे टाकण्याचेच काम झाले आहे. महोदय, माजी मालगुजारी तलाव हे खऱ्या अर्थाने विदर्भातील सिंचनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. ज्यावेळी विदर्भाचा सिंचन अनुशेष काढला गेला त्यावेळी या तलावांचे पाणी सिंचनात गृहीत धरल्यामुळे विदर्भ हा अनुशेषाच्या बाबतीत मागे राहिला. या बाबतचे दु:ख आम्हाला त्यावेळी होते आणि आजही आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी या तलावांच्या दुरूस्तीसाठी प्रती वर्ष 20 कोटी रुपये प्रमाणे 5 वर्षासाठी 100 कोटी रुपये प्रस्तावित केले होते. मी आमच्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना विचारले की, आपल्या जिल्याला या तरतुदीतून किती रुपये मिळतील ? त्यांनी सांगितले की, 2 कोटी रुपये मिळतील. महोदय, पूर्व विदर्भात 8 हजार माजी मालगुजारी तलाव आहेत. अशा परिस्थितीत 2 कोटी रुपये कोठे कोठे पुरणार आहेत ? परंतु आमच्या सरकारने या माजी मालगुजारी तलावांच्या दुरूस्ती व नूतनीकरणासाठी पहिल्या वर्षात 100 कोटी रुपये आणि पुढील पाच वर्षात एकूण 500 कोटी रुपये दिल्यामुळे आम्हाला खऱ्या अर्थाने आनंद झाला आहे. माजी मालगुजारी तलावांची दुरूस्ती म्हणजे संपूर्ण तलावाची दुरूस्ती करणे होय. मग त्यामध्ये कॅनॉलची दुरूस्ती असेल, फिगर कॅनॉलची दुरूस्ती असेल किंवा गेटची दुरूस्ती असेल. आजपर्यंत विदर्भाचा वन कायद्यातील तरतुदींच्या नावाखाली विकास होऊ शकला नाही. प्रत्येक प्रकल्प वन कायद्याच्या अडचणीमुळे अडविण्याचेच काम केले गेले. परंतु आता वन विभागाने पहिल्यांदा फिडरची कामे करण्यासाठी परवानगी दिली आहे. जंगलातील येवे तलावात सोडून तलाव भरण्याचे काम होणार आहे. माजी मालगुजारी तलावावर केवळ शेतकरी नव्हे तर मच्छीमार सुध्दा अवलंबून आहेत. वारंवार खाऱ्या पाण्यातील मच्छीसाठी आण समुद्रातील

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

मच्छींसाठी लोकांची ओरड होते. परंतु गोड्या पाण्यातील मच्छींसाठी कोणीही ओरडत नाही. परंतु अनेकदा गोड्या पाण्यातील मच्छी खाण्यासाठी लोक आमच्याकडे आग्रह धरतात. परतु या तलावांच्या बाबतीत कधीच विचार होत नव्हता. मी सन्माननीय सदस्यांना सांगते की, खारे कितीही चांगले लागत असले तरी मिठाने जेवण होत नाही आणि गोडाशिवाय तुमचे काही जमणार नाही.

सभापती महोदय, अनेक तज्ज्ञांनी सांगितले की, पुढील 10 वर्षांत पाण्यासाठी लढाई होणार आहे. पाणी अडवा, पाणी जिरवा हा कार्यक्रम जुना आहे. परंतु आम्ही पाणी अडविले नाही आणि जिरविले सुध्दा नाही. पण पैसा मात्र जमिनीत जिरला आहे.

सभापती महोदय, मागच्या सरकारने सांगितले की, सिंचनावर 72 हजार कोटी रुपये खर्च करुन सुध्दा 1 टक्का सुध्दा सिंचन झाले नाही. या विषयी या सभागृहात बरीच चर्चा वा वाद झाला. केवळ पश्चिम महाराष्ट्राचे सिंचन वाढले, पुण्याचे सिंचन वाढले. पण विदर्भ आणि मराठवाड्याला काय मिळाले ? मराठवाडा हा पाण्याच्या बाबतीत कायम दुष्काळी भाग आहे. तो विभाग पिण्याच्या पाण्यासाठी रडतो, हे चित्र आम्ही पाहत आहोत. सोलापूर, कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली या पश्चिम महाराष्ट्रातील एका-एका जिल्ह्यांमध्ये रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून 1-1 लाख विहिरी झाल्या. परिणामी त्या भागात भूगर्भातील पाण्याची पातळी खाली गेली. त्या भागात लोकांनी जमिनीखालील सर्व पाण्याचा उपसा करुन पाणी काढले. त्यातून ऊस आणि फळबागांचे मळे उभे केले. परंतु....

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छिते की, त्या आमच्या सरकारची बदनामी का करीत आहेत ? सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना विचारु इच्छिते की, महाराष्ट्र सरकारने सिंचनामध्ये वाढ झाल्याबाबत जो अहवाल सादर केला आहे तो चुकीचा आहे काय ? त्या अहवालानुसार राज्यात शेततळे मोठ्या प्रमाणावर झाले, पाणी अडवा-पाणी जिरवा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविला गेला. मला वाटते सन्माननीय सदस्यांनी खोटे बोला पण रेटून बोला, हे तत्त्व सोडावयास पाहिजे. राज्यात सिंचन क्षेत्र वाढले आहे. परंतु सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस असत्य वक्तव्य करुन सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. शासनाने जो अहवाल सादर केलेला आहे तो अहवाल सन्माननीय सदस्या सत्तेमध्ये असूनही मानत नाहीत काय ?

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या ठिकाणी मला खुलासा करण्याची आवश्यकता वाटत नाही. परंतु तरी सुध्दा मी खुलासा करणार आहे. मी सांगू इच्छिते की, जे सिंचन क्षेत्र वाढलेले आहे ते जलसंधारणाचे वाढलेले आहे. राज्यात जलसंधारणाचे सिंचन क्षेत्र वाढले हे माननीय श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनीच आम्हाला सांगितले होते. त्यांनी सांगितले की, राज्यात जे 1 टक्के सिंचन वाढल्याचे दिसत आहे ते आम्ही म्हणजेच जलसंधारण विभागाने वाढविले आहे. राज्यात मोठ्या प्रमाणावर धरणे बांधली नाहीत याचा उल्लेख त्यांनी केला. छोट्या छोट्या सिंचन प्रकल्पांमध्ये पाणी अडवून सिंचन वाढविण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांना वाहत्या पाण्याचे जे सिंचन लागते तशी धरणे विदर्भात झाली नाहीत. मोठे धरण केले असेल तर, एका तरी धरणाचे नाव सांगा. महोदय, या निमित्ताने मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देते की, सिंचन हे एकतर्फी नव्हे तर दुतर्फी असते. राज्यात सिमेंट बंधारे, शेततळे, वनतळे करण्यात आले. परंतु या तुलनेत मोठ्या क्षमतेची धरणे राज्य सरकार करु शकलेले नाही. महोदय, मी अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे पुढील 10 वर्षात पिण्याच्या पाण्यासाठी लढाई होणार आहे. त्यावेळी सिंचन तर बाजूलाच राहणार आहे. त्यामुळे आपल्याला भूगर्भातील पाणीसाठा वाढविण्याची आवश्यकता आहे.

महोदय, राज्यातील गावे कायमस्वरुपी टंचाईमुक्त करण्यासाठी राज्य सरकारने सुरु केलेला जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रम उपयोगी पडणार आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीमध्ये जिरविणे आणि भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे ही काळाची गरज आहे. पूर्व आणि पश्चिम विदर्भात विहिरींची संख्या कमी आहे. पूर्व आणि पश्चिम विदर्भातील विहिरींची बेरीज केली तरी सोलापूर जिल्हा हा विहिरींच्या बाबतीत पुढे जाईल, अशी स्थिती आहे. महोदय, आमच्या भागात 10-15 फुटांवर पाणी लागते. सोलापूर जिल्ह्यामध्ये किती खोल गेलो तर पाणी लागेल हा तुमचा-आमच्यासमोर प्रश्न निर्माण झाला आहे. हा परिस्थितीचा प्रश्न आहे. मी तर म्हणेन की, हा भविष्यात येणाऱ्या संकटाच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून पाणी अडविणे आणि ते भूगर्भात जमा करण्यासाठी राज्य सरकारने या वर्षीच्या अर्थसंकल्पात 1 हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

सभापती महोदय, टंचाईमुक्त महाराष्ट्र करणे हे शासनाचे स्वप्न आहे. मी तर म्हणेन की, हे केवळ शासनाचे स्वप्न नसून तुम्हा-आम्हा सर्वांचे स्वप्न आहे. वर्षानुवर्षे आम्ही टँकरच लावणार आहोत काय, वर्षानुवर्षे जनावराचे ताफेच काढणार काय, वर्षानुवर्षे महिला पाण्यासाठी 10-10 कि.मी. पायपीट करणार काय ? हे स्वप्न आम्ही कधीच पाहू शकणार नाही. आमचे म्हणणे आहे की, प्रत्येक गावात पाण्याची सोय झाली पाहिजे. कारण पिण्याचे पाणी आणण्यासाठी पुरुषांना नव्हे तर महिलांना जावे लागते. महिला आपल्या डोक्यावर दोन-दोन हंडे ठेवून तीन-तीन किलोमीटरवरुन पाणी आणतात. त्यामुळे महिलांचे दु:ख तुम्ही-आम्ही सर्वांनी समजून घेतले पाहिजे. त्यामुळे या परिस्थितीत जलयुक्त शिवार अभियानामुळे राज्याला मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे.

सभापती महोदय, काही आमदारांना किंवा प्रसिध्दी माध्यमांना प्रश्न पडला आहे की, राज्याच्या तिजोरीमध्ये खडखडाट असेल तर योजनेचा दणदणाट कसा होईल ? माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी भाषणात सांगितले की, आमच्या सरकारने 3 लाख कोटी रुपयांचे कर्ज काढले आणि आताच्या सरकारने केवळ चार महिन्यात 30 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले आहे. मी त्यांना सांगू इच्छिते की, आम्ही खऱ्या अर्थाने त्यातून या योजना पूर्ण करणार आहोत. शेतकरी व सर्वसामान्य माणसांना पिण्याच्या पाण्यापासून आणि सिंचनाच्या पाण्याच्या समस्येपासून मुक्त करण्याचे आम्ही ठरविले आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सतिश चव्हाण : सभापती महोदय, सभागृहाच्या कामकाजाची वेळ केव्हापर्यंत राहणार आहे ?

**तालिका सभापती** : पुढील निर्देश होईपर्यंत सभागृहाचे कामकाज सुरु राहील.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, जनतेकडून कररुपी वसूल झालेला पैसा आणि कर्जासाठी घेतलेला पैसा शासनाचा नसतो तर आम जनतेचा असतो. त्यामुळे त्याचा हिशेब देण्याचे काम शासनाला करायचे आहे. जनतेच्या हितासाठी, उत्पन्न वाढविण्यासाठी, शेतकऱ्यांचे दु:ख दूर करण्यासाठी व पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी हा पैसा खर्च केला जात आहे. भविष्यात शेतकऱ्याला वाचवायचे असेल तर सिंचनाचे प्रकल्प झाले पाहिजेत. ते खरे मूळ आहे. शेतकरी त्यामुळे कर्जमुक्त होईल आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील. मला सांगा की, महाराष्ट्रातील विदर्भ हा देशामध्ये आत्महत्याग्रस्त आहे याचा कोणाला आनंद आहे ? महाराष्ट्राचा हा कलंक मिटवायचा असेल तर शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची गरज आहे. सिंचनाचे प्रकल्प करण्याची गरज आहे, शेतकऱ्याला चांगले बी-बियाणे देण्याची गरज आहे, खताच्या किंमती कमी करण्याची गरज आहे, सर्व बाबींच्या संदर्भातील कर्जाच्या व्याजाच्या दराचा विचार करण्याची गरज आहे, जेणेकरुन शेतकऱ्याला न्याय देता येईल.

सभापती महोदय, इस्त्रायलमध्ये केवळ 6 इंच पाऊस पडतो. आपल्याकडे त्यापेक्षा 10 पट, 50 पट पाऊस पडतो. परंतु आपण ते पाणी साठवू शकत नाही. इस्त्रायलमध्ये पावसाचे पडणारे सर्व पाणी एकत्रित करुन एका तलावात ठेवले जाते आणि त्यातून मोठ्या प्रमाणातून सूक्ष्म सिंचनाच्या माध्यमातून रस्त्यावर झाडे लावली जातात, शेतकऱ्यांच्या शेताला, बागायतदारांच्या बागांना पाणी दिले जाते. तसेच ते पाणी गायी धुण्यासाठी देखील वापरले जाते. सूक्ष्म सिंचनातून हे सर्व केले जाते. पावसाच्या पडणाऱ्या 6 इंच पाण्यामध्ये इस्त्रायल पुढे जाऊ शकतो. मात्र आपण आपल्याकडे इतका मोठा पाऊस पडून सुध्दा ते पाणी साठवू शकत नाही. आपल्याकडे पावसाळा आला की, पाणी नदीला जाते आणि उन्हाळा आला की, महिला हंडे घेऊन 12-12 कि.मी चालत जाऊन पाण्याचा शोध घेतात असे चित्र असते. हे तुम्ही आम्ही कोणीच नाकारु शकत नाही.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस ....

इस्त्रायलने सूक्ष्म सिंचनातून शेती उभी केली, मोठ्या प्रमाणात पर्यावरणाचा विचार करून रस्त्यावर मोठी झाडे लावली. केवळ तेवढच नाही तर सूक्ष्म सिंचनाकरिता लागणारे पाईप असतील, छोटे छोटे पाट असतील त्यांचे उद्योग सूध्दा तेथे निर्माण केले. घरात मोठ्या प्रमाणात उद्योग सुरू झाले. इस्त्रायल आर्थिक क्षेत्रात गडचिरोली जिल्ह्याइतकाच आहे की काय हे माहीत नाही. पण तो विकासामध्ये मात्र मोठ्या प्रमाणात पुढे गेला आहे हे आपल्याला मान्य करावे लागेल. आपण उपसा सिंचन असेल किंवा इतर सिंचन असेल हे सर्व करताना आता सूक्ष्म सिंचनाकडे वळले पाहिजे ही काळाची गरज आहे. आपण एकमेकांवर टीका करण्याची गरज नाही. आपण पाण्याचा अपव्यय, नासाडी होणे थांबविले पहिजे. पावसाचा लहरीपणा, अतिवृष्टी, अवर्षण याचा विचार केला तर सूक्ष्म सिंचन हा विषय काळाची गरज झाली आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक बाजूचा विचार करून त्यांना भरीव सबसिडी देऊन आपण हा कार्यक्रम राबवावा अशी मी शासनाला विनंती करीत आहे. कारण सूक्ष्म सिंचन करायचे असेल तर त्याकरिता पाईप लाईन आणि इतर व्यवस्था लागणार आहे. मात्र आज शेतकरी पूर्णपणे कफल्लक आहे, त्याच्याजवळ काहीही नाही. त्यामुळे शेतकऱ्याला पूर्ण सबसिडी देऊन मदत करून जेवढे त्याला त्याच्या पायावर उभे करता येईल तेवढे केले पाहिजे. सबसिडीच्या माध्यमातून सूक्ष्म सिंचनाचे कार्यक्रम राबविले गेले पाहिजेत.

सभापती महोदय, सन 2014-15 मध्ये मागच्या शासनाने अर्थसंकल्पात सूक्ष्म सिंचनासाठी 12 कोटी 50 लाख रुपयांची तरतूद केली होती. मी असे म्हणत नाही की, आताचा हा कार्यक्रम आहे. आपण हा कार्यक्रम बऱ्याच वर्षांपासून राबवित आहोत. आपण शेतकऱ्याला बऱ्याच वर्षांपासून सबसिडीच्या माध्यमातून मदत देत आहोत. परंतु आपल्याकडे सूक्ष्म सिंचनाच्या संदर्भात पाहिजे त्या प्रमाणात क्रांती होऊ शकलेली नाही. आपल्याला ही क्रांती करण्याच्या दृष्टीने आता मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना पुढे आणून ही कामे करवून घेण्याची गरज आहे. आपण सन 2015-16 मध्ये 330 कोटी रुपयांची भरीव तरतूद करून हा महत्त्वकांक्षी कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. आपला हा निर्णय शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आहे. अन्यायग्रस्त विभागाला न्याय देण्याच्या दृष्टीने समन्यायी आर्थिक वाटप व्हावे अशी मी शासनाला विनंती करणार आहे. आरोग्य विभागाने

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस ....

महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने मार्च-एप्रिल महिन्यात 12 दिवसांचे महिला आरोग्य अभियान राबवून पहिल्यांदाच महिला आरोग्य तपासणी करून प्रत्यक्षात मदत करून महिलांच्या आरोग्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. महिलांच्या आरोग्याचा प्रश्न नक्की सुटेल. कारण केवळ तपासणी नाही तर हार्ट ॲटॅक, कर्करोग या रोगांच्या संदर्भातील मोठी ऑपरेशन्स करण्यात आली. महिलांना मदत करून त्यांना सर्व रोगांमधून मुक्त करण्याचा कार्यक्रम राबविला आहे. सर्व रोगांपासून मुक्त करून सक्षम महिला उभी करण्याची गरज आहे. महिला सक्षम झाली तर पुढील पिढी सक्षम होते आणि तरच देश पुढे जातो हा विचर ठेवून महिलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले गेले आहे.

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यात फायलेरियाच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. मध्यंतरी फायलेरिया होणे थांबले होते. परंतु आता तो वाढत आहे. फायलेरिया हा आयुष्यभर न जाणारा रोग आहे. तो शरीराला विद्रूप करीत असतो. रोगाच्या वाढत्या प्रमाणानुसार पूर्वी फवारणी केली जात होती. तत्संदर्भात रात्रीची तपासणी करावी लागते म्हणून तशीही केली जात होती. केवळ 8 टक्के एवढेच फायलेरिया रोगाचे प्रमाण होते. परंतु मध्यंतरी फवारणी करणे थांबले, रोगाचे प्रमाणही संपले आणि डॉक्टरही संपले. आमच्यकडे या बाबतीत दुर्लक्ष झाले. चंद्रपूर जिल्ह्यात दुर्दैवाने आता फायलेरिया रोगाचे रोगी 18 टक्क्यांपर्यंत गेले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा तत्संदर्भातील फवारणी करून रोगाचा नायनाट करण्याकरिता शासनाने प्रयत्न करावा अशी मी शासनाला विनंती करते.

सभापती महोदय, सिकलसेल हा रोग झोपडपट्टीत, घाणेरड्या जागेत राहणाऱ्या लोकांना होतो असे म्हणतात. आदिवासीच नव्हे तर दलितांमध्ये देखील या रोगाचे प्रमाण जास्त आहे. झोपड्या किंवा घाण असेल तेथे या रोगाचे प्रमाण जास्त आहे. सिकलसेल हा राज्यात मोठ्या प्रमाणात आहे. शासन सिकलसेलच्या उपचारासाठी जाण्या-येण्याचा खर्च देते. रक्त देताना जाण्या-येण्यासाठी लागणारी पैशाची तरतूद केली आहे. चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया येथील रूग्णांना उपचारासाठी नागपूरला यावे लागते. त्यामुळे ज्या जिल्ह्यात सिकलसेलचे प्रमाण जास्त



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस ....

असेल त्याच जिल्ह्यात सिकलसेलच्या रूग्णांना रक्त देण्याचे काम होण्याकरिता शासनाने व्यवस्था करावी अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, नारी शक्तीचा सन्मान व आदर करीत त्यांचे सक्षमीकरण आणि त्यांना आत्मनिर्भर करण्याच्या संदर्भात मघाशी चर्चा झाली. महिलांचे सक्षमीकरण आणि सबलीकरण आज झालेले नाही तर सन 2000 पासून हा कार्यक्रम राबवित आहोत. परंतु तरीही एकही बीपीएल महिला किंवा बचत गट स्वत:च्या पायावर उभे राहू शकलेला नाही. बीपीएल महिलांना बँकेमध्ये कोणी उभे करीत नाही. एखादी व्यक्ती टाय लावून गेली तर तिला 5 कोटी रूपयांचे कर्ज मिळते. परंतु गरीब महिलेला 5 लाख रूपयांचे कर्ज देण्यासही कोणी तयार होत नाही ही वस्तुस्थिती होती. त्यामुळे शासनाने आता व्यवस्था केली आहे. पूर्वी फक्त अडीच लाख रूपयाचे कर्ज मिळायचे आणि त्यामध्ये पुन्हा सबसिडीचे पैसे काढून घ्यायचे. परिणामी फुटाण्याचेही दुकान काढता येत नव्हते अशी वस्तुस्थिती होती. त्यामुळे शासनाने ठरविले आहे की, आता त्यांना प्रकल्प जेवढ्या किंमतीचा असेल तेवढे कर्ज द्यायचे. महिलांना प्रकल्प उभा करताना त्या संदर्भात तेवढे समजत नाही. प्रकल्प उभा करताना विभागामध्ये कशाची गरज आहे याचा विचार झाला पाहिजे. कोणते बचत गट कोणते प्रकल्प उभे करू शकतात याचा विचार झाला पाहिजे. बीपीएल महिलांना व बचत गटांना आवश्यक तेवढे कर्ज मिळाले पाहिजे आणि त्या कर्जाचे व्याज केवळ 4 टक्के असावे अशी मी मागणी करते. ज्या वस्तूंचे मार्केट असेल त्याच वस्तू तयार केल्या पाहिजेत आणि त्यातील 50 टक्के वस्तू शासनाने विकत घेतल्या पाहिजेत जेणेकरून महिलांच्या बचत गटांना मदत होईल. सभापती महोदय, तत्संदर्भातील विजेचे बील कमर्शियल नसावे. कमर्शियल वीज बिल तेव्हा छोट्या उद्योगांना परवडत नाही. शेतकऱ्यांना जसे विजेचे अनुदान देण्यात येते तसे बचत गटांनाही अनुदान दिले पाहिजे. विजेचे दर कमी केले पाहिजेत. बीपीएल असो किंवा एपीएल असो आपण प्रत्येक कारखान्याला 30 टक्के अनुदान देतो, तसे 30 टक्के अनुदान बचत गटांच्या कोणत्याही उद्योगाला देण्याकरिता शासनाने मदत केली पाहिजे अशी मी मागणी करते.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.......

फॉरॅन्सिक लॅब प्रत्येक जिल्ह्यात निर्माण करण्याचा निर्णय या शासनाने घेतला आहे. हा अतिशय उत्तम निर्णय आहे. भंडारा येथे 3 मुलींचा विहिरीत पडून मृत्यू झाला. त्या मुलींच्या रक्ताचे सॅम्पल्स नागपूर येथे पाठविले गेले. त्यांचा रिपोर्ट योग्य नसल्यामुळे ते पुढे हैद्राबाद, बंगलोर येथे पाठविण्यात आले. अशा प्रकारे एकच सॅम्पल अनेक लॅबमध्ये पाठवावे लागले. परंतु, त्या मुलींचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, हे अद्याप समजलेले नाही. अशा अनेक मृत्यूच्या घटना राज्यात घडल्या आहेत. मात्र, त्याबाबतचे नेमके कारण कळू शकलेले नाही. त्यामुळे अत्याचारग्रस्त, बलात्कारीत, हुंडाबळी यांच्या संदर्भातील आणि अन्य प्रकरणांमधील अहवाल योग्य पध्दतीने यावेत, या साठी नागपूर येथे असलेल्या फॉरॅन्सिक लॅबप्रमाणे सर्व जिल्ह्यात लॅब व्हाव्यात, अशी मागणी अनेक दिवसांपासून करण्यात येत होती. आज त्या मागणीला सरकारने खऱ्या अर्थाने न्याय दिला आहे.

सभापती महोदय, आज सर्वात चिंतेची बाब कोणती असेल तर ती 'सायबर क्राईम' ही आहे. साधारणपणे 95 टक्के प्रकरणे सायबर क्राईमची असतात. हा क्राईम समजून घेण्यास वेळ लागतो. नवीन तंत्रज्ञानामुळे सायबर क्राईममध्ये मोठी गुंतागुंत निर्माण होत असल्यामुळे चौकशी करण्यासही बराच कालावधी जातो. आज महाराष्ट्रात सायबर क्राईम डिटेक्शन सेंटर्स कमी प्रमाणात आहेत. या संदर्भात माझा एक अनुभव आहे.

सभापती महोदय, मला माझ्या मोबाईलवर '092' असा सुरुवातीचा क्रमांक असलेल्या मोबाईवरुन फोन आला. मी घाईमध्ये असल्यामुळे तो फोन उचलला. मात्र, पलीकडून काहीही आवाज आला नाही. त्यामुळे मी सायबर सेलला फोन केला आणि त्यांना घडलेली घटना सांगितली. त्यांनी मला अशी माहिती दिली की, "092 हा कोड पाकिस्तानचा आहे." त्यानंतर त्यांनी मला असे विचारले की, "तुमच्या मोबाईलमध्ये काही महत्त्वाची माहिती साठविलेली आहे का ?" परंतु, सुदैवाने माझ्या मोबाईमध्ये कोणतीही महत्त्वाची माहिती साठविलेली नव्हती. त्यावर त्यांनी मला सांगितले की, "तुमच्या मोबाईलमध्ये महत्त्वाची नसली तरी जी काही माहिती आहे, ती सर्व आता पाकिस्तानमध्ये गेली आहे, त्यामुळे तुम्हाला भविष्यात त्रास होऊ शकतो." माझ्या मोबाईलमध्ये काही महत्त्वाची माहिती नव्हती, हा भाग वेगळा. परंतु, 092 हा कोड पाकिस्तानचा, 093 हा बांगला देशचा, या सारखी माहिती बहुतांश लोकांना नसते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.......

सभापती महोदय, अशाच प्रकारे नागपूर येथील डब्ल्यू.सी.एल. कंपनीमध्ये काम करणारे एक दांपत्त्य होते. त्या मुलीने स्वत:चा फोटा फेसबुकवर अपलोड केला. आठ दिवसानंतर त्या मुलीचा चेहरा आणि अर्धनग्न शरीर, असे बिभत्स चित्र अन्य साईटवर अपलोड करण्यात आले. त्या मुलीचा नवरा माझ्याकडे रडत रडत आला. मी सायबर सेलला फोन केल्यानंतर या प्रकरणाची चौकशी झाली. त्याच मुलीच्या मैत्रिणीने हे कृत्य केले आहे, असे चौकशीतून निष्पन्न झाले.

सभापती महोदय, सायबर क्राईमच्या माध्यमातून अनेक लोकांची फसवणूक होत आहे. राज्यात मोठ्या प्रमाणावर सायबर क्राईम घडत आहेत व अनेक लोक यामुळे आत्महत्या देखील करीत आहेत. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात सायबर लॅब उघडण्याचा निर्णय या सरकारने घेतला आहे, याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, मला या माध्यमातून शासनाला एक विनंती करावयाची आहे. हे गुन्हे कसे घडतात, कोण दोषी आहे, मोबाईल, संगणक, फेसबुक या संदर्भात काय केले पाहिजे, काय करु नये, याबाबतचे ज्ञान लोकांना नसते. राज्यात मोठ्या प्रमाणावर घडणाऱ्या सायबर क्राईमला आळा घालायचा असेल तर सर्वांनाच प्रशिक्षण देऊन अलर्ट केले पाहिजे. काय केले पाहिजे, काय करु नये, याबाबतचा अभ्यास करुन त्याबाबत लोकांचे प्रबोधन केले पाहिजे, अशा प्रकारची विनंती करते आणि माझे दोन शब्द पूर्ण करते.

---------------

...3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कॉंग्रेस पक्षाला याची जाणीव आहे की, जनतेने सन 2014 च्या विधानसभा निवडणुकीत आज जे सत्तारुढ पक्षात आहे, त्यांच्या बाजूने कौल दिला आहे आणि आम्ही तो मान्य केला आहे. आमची ही अपेक्षा नाही की, आमच्या योजना किंवा आमची धोरणे या सरकारने राबविली पाहिजेत. तसे ते करणार नाहीत, याचीही मला कल्पना आहे. पण आपण जनतेला जी आश्वासने दिली आहेत आणि जनतेच्या ज्या काही गैरसमजुती करुन दिलेल्या आहेत, त्या गैरसमजुतीतून तुम्ही सत्तेवर आला आहात. म्हणूनच तुम्ही दिलेली आश्वासने तुम्हीच पूर्ण करावयाची आहेत.

सभापती महोदय, सन 2014 च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे जास्त उमेदवार निवडून आले आहेत. भारतीय जनता पक्षाने निवडणुकीत कोणकोणती आश्वासने दिली होती, त्यांचा जाहीरनामा काय होता, याचा मी अभ्यास केला. भारतीय जनता पक्षाचा जाहीरनामा नव्हता तर 'दृष्टीपत्र' होते. "छत्रपती शिवरायांचा आशीर्वाद, चला देऊ मोदींना साथ, विधानसभा निवडणूक 2014, समृद्ध महाराष्ट्राची हमी देणारे दृष्टीपत्र", असे त्याचे भलेमोठे शीर्षक होते. हा जाहीरनामा महत्त्वाचा आहे. कारण, तुम्ही सत्तेवर आला आहात आणि तुम्हीच तो अंमलता आणला पाहिजे. आमची हीही अपेक्षा नाही की, तुम्ही जाहीरनाम्यात जी आश्वासने दिली आहेत, ती सर्वच्या सर्व पहिल्याच वर्षी पूर्ण करावीत.

सभापती महोदय, भारतीय जनता पक्षाचा जाहीरनामा 17 विषयांचा असून त्यामध्ये 177 कलमी कार्यक्रमही दिलेला आहे. 17 मुख्य विषय असलेले 'दृष्टीपत्र' त्यांनी जनतेसमोर ठेवले आहे. या दृष्टीपत्रामधील ज्या काही ठराविक बाबी आहेत, त्यांची अंमलबजावणी त्यांनी पहिल्याच वर्षी करावयाची आहे. पण जी आश्वासने जनतेला दिली आणि ज्या आश्वासनांवर विश्वास ठेऊन जनतेने तुम्हाला मते दिली आहेत, ती तुम्ही पूर्ण केलेली नाहीत. तुम्ही जनतेची घोर फसवणूक केली आहे आणि म्हणून या अर्थसंकल्पाला विरोध करण्यासाठी मी उभा आहे.

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.......

सभापती महोदय, केंद्रीय अर्थसंकल्प माननीय केंद्रीय अर्थमंत्री श्री.अरुण जेटली यांनी संसदेमध्ये मांडला आणि तो मांडत असताना ते असे म्हणाले की, "कुछ गुलाब खिले हैं, कुछ गुलाब खिल रहे हैं, लेकिन बाग में कांटे कुछ पुराने हैं." अशा प्रकारे त्यांनी युपीए सरकारला दोष दिला आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत भारतीय जनता पक्षाच्या दृष्टीपत्रातील गोष्टी अंमलात आल्या तर "गुलाब फुलले," आणि अमलात आल्या नाही तर "ना गुलाब खिले हैं, ना गुलाब खिल रहे हैं, बजट में सिर्फ कांटे ही कांटे नजर आते हैं," असेच मला म्हणावेसे वाटेल.

या नंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे...

सभापती महोदय, भारतीय जनता पक्षाच्या या दृष्टीपत्रातील तिसऱ्या क्रमांकाच्या विषयाचे शीर्षक फार मजेशीर आहे, आम्ही सत्तेवर आलो तर 'शेतकऱ्यांना सुगीचे दिवस येणार', असे नूद केले आहे. या दृष्टीपत्रातील सर्व कलमे मी वाचत नाही. 10 ते 20 कलमे व काही उप कलमांचा हा कार्यक्रम आहे. यातील दोन विषय मी सांगतो, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होऊ नयेत, त्यांना वृध्दपकाळात मदत व्हावी म्हणून 'अन्नदाता आधार पेन्शन योजना' हे शासन आणणार आहे. या सरकारला यवतमाळ व विदर्भाची काळजी असल्यामुळे सरकार अशी योजना आणणार आहे. शेतकऱ्यांना उत्पन्न मिळाले नाही, पैसा मिळाला नाही तर किमान त्या शेतकऱ्याला पेन्शन तरी मिळाले पाहिजे अशी आमची नैतिक व घटनात्मक जबाबदारी आहे. असे वक्तव्य माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी सभागृहात केले आहे. या योजनेचा बजेटमध्ये उल्लेख दिसून येत नाही....(अडथळा).... मंत्री महोदय श्री.रामदास भाई या योजनेची सुरुवात तरी करायला पाहिजे होती. पाच वर्षात होईल असे आपण म्हणत असला तरी शेतकरी आता मरत आहे. त्यामुळे या योजनेची सुरुवात या वर्षापासून करायला पाहिजे होती. बजेटच्या भाषणातील क्रमांक तीन येथे मोतीरामजी लहाने कृषि समृध्दी योजना नमूद केली आहे. त्याचप्रमाणे क्रमांक चार येथे कृषिपंपाचे ऊर्जीकरण, क्रमांक सात वर कृषि विकासाच्या योजना, क्रमांक 8 वर देशी बी-बियाणांचे जतन व संवर्धन, अशा योजना नमूद केल्या असून शेतकऱ्यांना पेन्शन देण्यात येणाऱ्या योजनेचा बजेटच्या भाषणात उल्लेख दिसत नाही.....(अडथळा)... मंत्री महोदय श्री.रामदास भाई मी 177 कलमांचे सांगितले नाही. शेतकरी आज आत्महत्या करीत आहे.

सभापती महोदय, दुसरी बाब अतिशय मजेशीर आहे, कांदा, कापूस, टोमॅटो यांच्या भावाबाबत सांगितले आहे, कांदा सरकारला रडवितो, सरकार देखील पाडतो हे आपण लक्षात ठेवा. भारतीय जनता पक्षाने निवडणुकीच्या अगोदर असे आश्वासन दिले होते की, कांदा, कापूस, टोमॅटो इत्यांदी शेती मालाचे भाव अनैसर्गिकरित्या कोसळले तर शेतकऱ्यांना भरपाई करता यावी म्हणून केंद्र सरकारच्या धर्तीवर भाव पातळी स्थिरिकरणासाठी कृषी उत्पादन सुरक्षा निधी उभारण्यात येईल. या योजनेसाठी बजेटमध्ये एक रुपयाची देखील तरतूद करण्यात आलेली नाही. आपल्या सरकारचे बजेट चांगले आहे हे कोणत्या आधारावर म्हणावे.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे...

सभापती महोदय, आणखी असे आश्वासन देण्यात आले होते की, ग्रामीण भागातील लोकांना पिण्याचे शुध्द पाणी देण्यात येईल. ही बातमी वर्तमानपत्रात देखील छापून आली होती. ग्रामीण भागातील सामान्य माणून बिसलेरीचे पाणी पितो. निवडणुकीच्या अगोदर ही बातमी वर्तमानपत्रात आली होती, भाजपाने अशी घोषणा केली होती. या पक्षाच्या जाहीरनाम्यात चार क्रमांकावर असे नमूद केले आहे की, सर्वांना शुध्द पाणी देण्यात येईल. योजनेचे नांव पुणेरी भाषेत लिहिले आहे, 'स्वयंभू पाणी योजना'. पुण्यातील व्यक्तीने हे नांव दिले असावे, याबाबत माननीय मंत्री श्री.गिरीष बापट यांना विचारायला पाहिजे. प्रत्येक गावात सौर ऊर्जेवर आधारित या योजनेद्वारे शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येईल. गावातील लोकांनी अशुध्दच पाणी पायचे काय ? पर्यावरण दूषित झाले आहे, पाणी दूषित झाले आहे, त्यामुळे मराठवाड्यातील ग्रामीण भागातील लोकांनी कसे जीवन जगावे, हे सरकार एकही आश्वासन पाळत नाही.

सभापती महोदय, आता एकही पत्रकार येथे नाही. या सरकारने किती पत्रकारांना फसविले. या सरकारने असे सांगितले की, 65 वर्षे वयाच्या वर जे श्रमिक पत्रकार आहेत, त्यांना 1500 रुपये पेन्शन देण्यात येईल. ॲक्रीडेशन किती पत्रकांराचे असते. महाराष्ट्रात असे किती पत्रकार असतील ॲक्रीडेशनचे नियम आहेत, त्यामुळे फार कमी पत्रकांराकडे ॲक्रीडेशन असते. जास्तीत जास्त 2000 पत्रकारांकडे ॲक्रीडेशन असू शकेल. या 2000 पत्रकारांना हे सरकार 1500 रुपये मासिक पेन्शन देऊ शकत नाही. याच पत्रकारांनी तुम्हाला मोठे केले आहे. तुमच्या पक्षाच्या बाजूने लिहिले आहे. मनाची नाही तरी जनाची तरी तुम्हाला वाटायला पाहिजे होती.

सभापती महोदय, भाजपच्या जाहीरनाम्यातील पहिल्या क्रमांकाचा मुद्दा सुरक्षित महाराष्ट्रासाठी गुन्हेगारावर जरब, दहशतवाद, नक्षलवादाचा सामना करताना हुतात्मा झालेल्या व कायम अपंगत्व आलेल्या पोलीस कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांसाठी विशेष आधार योजना. बजेटच्या भाषणात या योजनेवर तरतूद करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, महिलांबाबत भाजपच्या जाहीरनाम्यात फार महत्वाचे आश्वासन देण्यात आले आहे. नोकरी व्यवसाय न करणाऱ्या 60 वर्षे पूर्ण झाल्यानंतर सर्व महिलांसाठी आयुष्यभर मासिक पेन्शन योजना तयार करण्यात आली आहे. ज्या महिला आयुष्यभर गृहिणी होत्या, ज्यांनी नोकरी किंवा कोणताही व्यवसाय केला नाही, आपले कुटुंब सांभाळले, अशा महिलांनी वयाची 60

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे...

वर्षे पूर्ण केल्यानंतर त्यांना आयुष्यभर हे सरकार पेन्शन देणार आहे. पेन्शन योजनेचे नांव पुणेकर व्यक्तीने सुचविले असावे, असे मला वाटते, या योजनेचे नांव 'माहेरचा आधार' असे आहे. महिलांचा आधार कोठे आहे, सर्व महिला निराधार आहेत. असे मी म्हणत नसून सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी आताच महिला सबलीकरणाबाबत त्यांच्या भाषणात सांगितले आहे. महाराष्ट्रातील महिलांची या सरकारने घोर फसवणूक केली आहे. भाजपाने आश्वासन दिले असून त्याची पूर्तता केली जात नाही. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे महिला आधार केंद्र फार चांगल्या पध्दतीने चालवित आहेत. भाजपाने असे सांगितले होते की, जिल्हास्तरावर आधार केंद्र उघडण्यात येतील. महिलांसाठी शासनाकडे कोणतेही धोरण नाही.

सभापती महोदय, मुंबईवर 26/11 चा हल्ला झाला. त्यावेळी आघाडीचे सरकार होते. या वेळी मला स्व.आर.आर.पाटील यांची आठवण येते. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे देखील गृह राज्यमंत्री होते. सरकारने सांगितले होते की, 26/11 सारख्या घटनांचा मुकाबला करण्यासाठी विशेष दल तयार करण्यात येईल. त्यावेळी फोर्स वन ची स्थापना करण्यात आली. त्याचे श्रेय स्व.आर.आर.पाटील यांना द्यावे लागेल. भाजपच्या जाहीरनाम्यात डिझास्र्टर मॅनेजमेंटचा विषय 17 क्रमांकावर आहे. हॅम रेडिओची संकल्पना राबविण्यात येणार आहे. हॅम रेडिओला अतिशय कमी खर्च येतो. यासाठी देखील बजेटमध्ये तरतूद करण्यात आली नाही. एनडीआरएफच्या धर्तीवर स्टेट डिझास्र्टर रिस्पॉन्स फोर्सची स्थापना करण्यात येईल. आघाडी शासनाने फोर्स वनची स्थापना केली होती. आता हे सरकार डिझास्र्टर मॅनेजमेंटची स्थापना करु शकत नाही. या सरकारला काय म्हणावे, किती विरोध करावा. कशाचा ताळमेळ दिसून येत नाही.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते परिवहन मंत्री आहेत, वाहतूक विभाग त्यांच्याकडे आहे. मंत्री महोदय, खूप काम करतात, रिक्षावाल्यांना भेटतात, एस.टी.स्थानकाला भेट देतात. धान्य निवडताना खडा बाजूला काढवा त्या प्रमाणे शिवसेना पक्षाचे मंत्रालय असेल तर त्याला खड्यासारखे बाजूला काढले जाते. त्या खात्यावर अन्याय केला जातो. भाजपच्या दृष्टीपत्रातील क्रमांक 6 मध्ये राज्यातील सर्व एस.टी.स्थानकांवर धर्मशाळा व रात्रीचा निवार बांधण्याबाबत उल्लेख केला आहे. दृष्टीपत्र हे अजब नाव आहे. सर्व लोक जाहीरनामा म्हणतात व भाजप दृष्टीपत्र म्हणते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.........

(....अडथळा....) परंतु, ती दृष्टी चांगली नाही. त्या दृष्टीपत्रात असे नमूद केलेले आहे की, राज्यातील सर्व एस.टी. स्थानकांवर आम्ही धर्मशाळा आणि रात्रीचे निवारा केंद्र बांधू. आपण मला सांगावे की, यासाठी एस.टी. स्थानकावर जागा उपलब्ध असेल, परंतु केवळ परिवहन विभाग माननीय श्री.दिवाकर रावते साहेबांकडे आहे, शिवसेना पक्षाकडे आहे, म्हणून त्या विभागाला निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही....

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे बजेट एकत्र असते. ज्यावेळी विभागवार चर्चा होते त्यावेळी त्या त्या विभागाचे मंत्री चर्चेला उत्तर देतात. आम्ही जर महिलांसाठी एस.टी. स्थानकांवर रात्रीचे निवारा केंद्र बांधले, धर्मशाळा बांधल्या तर त्यामध्ये काय चुकले ? जे काम तुम्ही केले नाही, ते आम्ही करीत आहोत. परंतु, त्यांच्यावर अन्यय होत आहे, असे तुम्ही म्हणू शकत नाही. संपूर्ण राज्याचे बजेट एकत्र असते.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी हरकत घेतली असती तर आम्ही समजू शकलो असतो. परंतु, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांचा काय राग आहे की, त्यांनी हरकत घ्यावी, हे मला कळत नाही.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणातील मुद्दा क्र.28 मध्ये बस स्थानकांच्या नूतनीकरणासाठी 16 कोटी 40 लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. परंतु, हा नियतव्यय देखील प्रस्तावित नाही. अवितरित म्हणजे नियतव्यय उपलब्ध झाला तर तो चिन्हांकित केलेला आहे. मी मघाशी जे सांगितले ते कोणाला कळलेच नाही. अवितरित, शिल्लक राहिला तर म्हणजे अवितरित मधून तो देण्यात येणार आहे. बस स्थानकांच्या नूतीकरणासाठी हा नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे आणि त्यामध्ये शेडसाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. म्हणजे परिवहन मंत्र्यांनी काहीही न करता केवळ फिरत राहणे, एवढेच काम त्यांच्याकडे राहिलेले आहे.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे........

सभापती महोदय, भारतीय जनता पार्टीला शहरी भागातून खूप मते मिळाली. भारतीय जनता पार्टीने शहरवासीयांना आश्वासन दिले होते की, ज्या प्रमाणे मुंबई-पुणे महामार्ग आहे त्या प्रमाणे आम्ही महामार्ग तयार करु. भारतीय जनता पार्टीच्या जाहिरनाम्यातील मुद्दा क्र.14 मध्ये असे नमूद केलेले आहे की, आम्ही मुंबई ते जळगाव, जळगाव ते नांदेड व्हाया बीड, नांदेड ते सोलापूर, सोलापूर ते कोल्हापूर, कोल्हापूर ते रत्नागिरी असा महामार्ग तयार करु. मी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना विचारु इच्छितो की, ही मागणी योग्यच आहे, ही मागणी तुमच्या भारतीय जनता पार्टीच्या जाहिरनाम्यात नमूद केलेली आहे. परंतु, अर्थसंकल्पामध्ये काय म्हटलेले आहे ? अर्थसंकल्पीय भाषणात या महामार्गचा उल्लेखच करण्यात आलेला नाही. अर्थसंकल्पीय भाषणातील मुद्दा क्रमांक 14 मध्ये असे म्हटलेले आहे की, सन 2015-16 मध्ये 5 हजार किलो मीटर लांबीच्या रस्त्यांची सुधारणा करण्याचे उद्दिष्ट आहे आणि त्यासाठी 3,213 कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. आता 3,213 भागिले 5 हजार केले तर प्रती किलो मीटर किती होतात याचा हिशेब आपणच करावा.

सभापती महोदय, आम्ही टोल मुक्त महाराष्ट्र करु, असे तुम्ही सांगितले. मी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना सांगू इच्छितो की, टोल बंद न करण्याबाबत तुम्ही जी कविता सांगितली होती, तीच कविता मी आपल्याला सांगतो. (...अडथाळा...) यांचे हे उलटेच काम चाललेले आहे. टोल बंद न करण्याबाबत तुम्ही अशी कविता केली होती की, टोल बंद न करणारे आपले आघाडी सरकार, आता हे सर्व तुम्हाला सुध्दा लागू होते. ती कविता अशी होती की,....

"रस्त्या रस्त्यावर टोल नाके हात घालून खिसे कापतात,
ढोल वाजवत विकासाचे ताक दाखवून लोणी मारतात,
वाट लावली महाराष्ट्राची, दारी आले तर परत पाठवा,
आपलीच घरे भरणाऱ्यांना कात्रजचा घाट दाखवा."

माननीय श्री.मुंडे साहेब, आता यांना कात्रजचा घाट दाखवावा लागेल. कोठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा. वित्त राज्यमंत्री महोदय, तुम्हाला कात्रजचा घाट दाखवायचा का नाही, याचे उत्तर



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे........

तुम्ही दिले पाहिजे. माननीय श्री.मुंडे साहेब, आपण याबाबतीत निकराने लढू आणि कात्रजचा घाट काय असतो, (...अडथळा....) माननीय वित्त राज्यमंत्री श्री.दिपक केसरकर साहेब, मला तुमच्याबद्दल आदर आहे. परंतु, मला तुमच्याबद्दल एका गोष्टीचा राग व्यक्त करावासा वाटतो. माननीय शिवसेना प्रमुखांबद्दल सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना अतिशय संवेदनशील आहेत. तुम्ही अर्थसंकल्पीय भाषण वाचून दाखविले. ज्या महाराष्ट्र गिताने माननीय शिवसेना प्रमुखांना प्रेरणा दिली ते जय जय महाराष्ट्र गित आपण वाचले, याचा आम्हाला आनंद आहे. त्या गितामध्ये महाराष्ट्राचा अभिमान आहे. आम्हाला ते मान्य आहे.

"सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिवशंभू राजा,
दरी दरीतून नाद गुंजला, महाराष्ट्र माझा."

परंतु, अर्थसंकल्पीय भाषणाची सुरूवात करताना तुम्ही हे गित दुसऱ्या क्रमांकावर वाचले. तुम्ही प्रथम आरएसएसचे गित वाचले. आरएसएसचा अर्थसंकल्पाशी काय संबंध आहे ? महाराष्ट्र गित माननीय शिवसेना प्रमुखांना आवडत होते. माननीय श्री.दिवाकर रावते साहेब सभागृहात आलेले आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, आम्हाला माननीय शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या बद्दल आदर आहे. आपण सर्वांना आदर आहे. माननीय शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांना महाराष्ट्राचा अभिमान असणारे गित आवडत होते, ते गित आपणा सर्वांना आवडते.

"सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिवशंभू राजा,
दरी दरीतून नाद गुंजला, महाराष्ट्र माझा."

माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाची सुरूवात करताना प्रथम हे गित वाचले असते तर आम्हाला अभिमान वाटला असता. परंतु, माननीय वित्त राज्यमंत्री श्री.दिपक केसरकर साहेब, तुम्ही प्रथम माननीय बाळासाहेबांना आवडणारे गित वाचले नाही, तुम्ही प्रथम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची कविता वाचली. त्या कवितेमध्ये कोठेही राष्ट्राभिमान नाही, महाराष्ट्राभिमान नाही. ती फक्त संधीसाधुपणाची कविता आहे.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे साहेबांनी महाराष्ट्र गित म्हणून न कळपणे का होईना शाहीर साबळे यांना आदरांजली वाहिली, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, वित्त राज्यमंत्री महोदय, माझा आक्षेप आहे. आरएसएसच्या कवितेमध्ये काय म्हटलेले आहे ते आपण ऐकावे. त्याचा अर्थसंकल्पाशी काहीही संबंध नाही. कोणी दिली तुम्हाला ही कविता ? कसे स्फुरण चढले तुम्हाला ? तुमचा संघाशी काय संबंध आहे ? ती कविता अशी आहे की,

"संकटे आजवरी आली,
थांबवू न आम्हा शकली
ती अखेर सारी थकली
नमविला तयाने माथा
संधी ही जीवन गाथा."

आली संधी घ्या उरकवून. माननीय शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांची अशी कविता नाही. जय जय महाराष्ट्र माझा आणि तुम्ही अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरूवातीला कोणती कविता वाचली ?

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, ती कविता कोणी लिहिलेली आहे याची सन्माननीय सदस्यांना माहिती नाही. ती कविता शाहीर साबळे यांनी लिहिलेली आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, ती कविता संघाची आहे. भारतीय जनता पक्षाचा उगम संघाच्या प्रेरणेतून झालेला आहे. तेथे एक गित म्हटले जाते. हे गित मी म्हटलेले नाही, हे संघाचे गित आहे. माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरूवातीला ते गित वाचून दाखविले. म्हणून आमचा या गोष्टीला विरोध आहे. या सभागृहात सन्माननीय सदस्यांना जनतेने पाठविलेले आहे....

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आता 6 वाजून 59 मिनिटे झालेली आहेत. आपल्याला रात्री 7.00 वाजता सभागृहाचे कामकाज स्थगित करावयाचे आहे.

..5...

**उप सभापती.......**

आपण माननीय शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा उल्लेख केला म्हणून मी आपल्याला अधिक वेळ बोलण्याची परवानगी दिली. परंतु, आता आपले भाषण पूर्ण झाले नसेल तर आपण ऑनलेग राहावे. सभागृहाचे कामकाज रात्री 7.00 वाजता स्थगित करावे, अशा सूचना सभापती महोदयांनी दिलेल्या आहेत.

यानंतर श्री.भोगले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती**......

आता अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा थांबविण्यात येत आहे. माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे हे ऑन लेग राहतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, 2015 आजच मंजूर होणे आवश्यक आहे. कारण उद्यापासून ग्रामपंचायत निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु होणार आहे.

**उप सभापती :** ठीक आहे. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी विनंती केल्यानुसार महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, 2015 विचारार्थ घेण्यात येत आहे.

------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. IV OF 2015
(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT.)

श्री.दीपक केसरकर ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-4, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.दीपक केसरकर : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-4, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-4 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-4 संमत झाले आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या मंगळवार, दिनांक 24 मार्च, 2015 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक रात्रौ 07 वाजून 03 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 24 मार्च, 2015 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION